**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२००

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. मोहंमद सलिमोद्दीन हफिजोद्दीन, अपिलार्थी

मोहल्ला बडके आली, खुलताबाद, तालुका खुलताबाद,

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा शाखा व्यवस्थापक,

बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. शाखा खुलताबाद,

जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहायक महाव्यवस्थापक,

बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. औरंगाबाद,

जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कमीटी खुद्दामीन दर्गाहजात हद्दे कलाँ या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडून नोंदणीकृत केल्या गेलेल्या समितीसंदर्भात सन १९९८ ते २००८ या कालावधीशी संबंधीत काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास बँकेकडून कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक सरव्यवस्थापक, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. औरंगाबाद यांच्याकडे दिनांक २२-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अपिलार्थीस कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा पुनरुच्चार केला व आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास व त्यावरील अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय त्यांना आजतागायत कळविला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी त्यांना लागू नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केली आहे ते प्राधिकरण म्हणजे, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. मुंबई

यांची खुलताबाद जिल्हा औरंगाबाद येथील शाखा आहे. ही बँक को-ऑप. बँक आहे व या बँकेवर केंद्रशासनाचे नियंत्रण आहे, त्यामुळे अपिलार्थीस या संदर्भात केंद्रीय माहिती आयोगाकडे अशा प्रकारचे अपील करता येईल. याहीपेक्षा महत्वाचे असे आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात नागरी सहकारी बँकाना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत असा दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाचा हा निर्णय पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद सलिमोद्दीन हफिजोद्दीन, मोहल्ला बडके आली, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा व्यवस्थापक, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. शाखा खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक महाव्यवस्थापक, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०१

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. लक्ष्मण देवराम देशमुख, अपिलार्थी
सुभाष कॉलनी, वॉर्ड नं. ६, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा व्यवस्थापकीय संचालक विशेष तथा कार्यकारी
संचालक, दि पिपल्स को-ऑप. बँक लि. शाखा श्रीरामपूर,
तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : वसूली अधिकारी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

विचाराधीन अपील, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे म्हटले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे वसूली अधिकारी, दि पिपल्स को-ऑप. बँक लि. शाखा श्रीरामपूर यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या कथित कर्ज प्रकरणाशी संबंधित काही कागदपत्रांची मागणी केली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले व सरव्यवस्थापक दि पिपल्स को-ऑप. बँक लि. शाखा श्रीरामपूर यांना अपिलार्थीस त्यांच्या मागणीप्रमाणे तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, दि पिपल्स को-ऑप. बँक लि. ही बँक दिनांक ०३-०७-२००८ रोजी नाशिक मर्चंट को-ऑप. बँक लि. या बँकेमध्ये विलीन झाली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात नागरी सहकारी बँकाना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत असा दिनांक १३-०१-२००९ रोजी दिलेला निर्णय पाहता, मूळात अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहितीची मागणी केली आहे त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नसल्याचे दिसून येत आहे त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण देवराम देशमुख, सुभाष कॉलनी, वॉर्ड नं. ६, श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक विशेष तथा कार्यकारी संचालक, दि पिपल्स को-ऑप. बँक लि. शाखा श्रीरामपूर, तालुका श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०२

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. अजित जगदीश मणियार, अपिलार्थी

रा. अशोक चौक, संगमनेर, तालुका संगमनेर,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा व्यवस्थापक, दि संगमनेर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि.

संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १५-०१-२००८ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले असल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या बँकेशी संबंधित एकूण वीस विविध मुद्दयावर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन बँकांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नसल्याचे त्यांना कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी दि संगमनेर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. संगमनेर या बँकेस लागू होत नाहीत. कारण या बँकेस शासनाकडून कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य दिले जात नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी केलेला युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ (डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक लि. अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग, विदर्भ, नागपूर व इतर तीन) च्या संदर्भात नागरी सहकारी बँकाना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत असा दिनांक १३-०१-२००९ रोजी दिलेला निर्णय पाहता, दि संगमनेर मर्चन्टस्

को-ऑप. बँक लि. संगमनेर हिचे स्वरुप देखील नागरी सहकारी बँकेसारखेच असल्याने नागरी सहकारी बँकांना लागू नसलेल्या तरतूदी याही बँकेला लागू होत नसल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अजित जगदीश मणियार, रा. अशोक चौक, संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि संगमनेर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. संगमनेर, तालुका संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४०

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. उगमचंद छोगमलजी सुराणा, अपिलार्थी
कादराबाद, अंबड मार्ग,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सरव्यवस्थापक, औरंगाबाद जालना ग्रामीण बँक,
शाखा जालना मुख्य, मस्तगड, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अध्यक्ष तथा पुनर्विचार अधिकारी,
औरंगाबाद जालना ग्रामीण बँक,
मुख्य कार्यालय, ३५ जीवनश्री, सेक्टर ' जी ' टाऊन सेंटर,
सिडको, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सरव्यवस्थापक, महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अध्यक्ष, महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १४-०६-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे. या अर्जाच्या सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास असे अवगत करण्यात आले की, औरंगाबाद जालना ग्रामीण बँकेचे नांव आता महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक असे बदललेले असून या बँकेची स्थापना भारत सरकारच्या दिनांक २५ मार्च, २००८ रोजीच्या अधिसूचना क्रमांक ३९४, वित्त मंत्रालय (बँकीग डिव्हीजन), या आदेशान्वये झाली असून या बँकेवर केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे नियंत्रण आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी भारत सरकारच्या संदर्भिय कागदपत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे आयोगाच्या कार्यकक्षेत येत नसल्याचे दिसून येत आहे. केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विषयावर सुनावणी घेऊन माहिती अधिकारांतर्गत आदेश देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नसल्यामुळे अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी केंद्रीय माहिती आयोग यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित व्दितीय अपील सादर करावे.

केंद्रीय माहिती आयोगाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :

केंद्रीय माहिती आयोग,

रुम नं. ४१५, चौथा मजला, ब्लॉक नं. - IV, जुना जे. एन. यू. कॅम्पस,

नवी दिल्ली - ११० ०६६

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उगमचंद छोगमलजी सुराणा, कादराबाद, अंबड मार्ग, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोदावरी ग्रामीण बँक, मुख्य कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४१

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
अहमदनगर शहर सहकारी बँक,
नवी पेठ, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द केले आहे. माहिती अधिकार अधिनियम बँकाना लागू होत नाही असे

सांगून अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिला असल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये म्हटले आहे.

सुनावणीच्या सुरुवातीस श्री. एस. व्ही. अदवंत, ॲडव्होकेट यांनी आयोगास लेखी युक्तिवाद सादर केला. माहिती अधिकार अधिनियम २००५ नागरी सहकारी बँकाना लागू होत नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळून लावण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर त्यांनी रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचा देखील हवाला दिला आहे.

राज्य माहिती आयोगाच्या नागपूर खंडपीठाच्या अपील क्रमांक ५४७/०७, दिनांक १९-१०-२००७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक १३-०१-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकाना लागू होत नाही असा निर्णय दिला असून राज्य माहिती आयेगाच्या नागपूर खंडपीठाचा निर्णय रद्द केला आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबईच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या वरील निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, अहमदनगर शहर सहकारी बँक, नवी पेठ, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४२

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. शरद भवरीलाल शर्मा, अपिलार्थी

रा. जाधवगल्ली, गंगापूर, तालुका गंगापूर,

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : सरव्यवस्थापक, दि वैजापूर मर्चंट को.ऑप बँक लि. वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सरव्यवस्थापक, दि वैजापूर मर्चंट को.ऑप बँक लि. वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेला त्यांचा दिनांक १३-०४-२००९ रोजीचा अर्ज सादर केला असून या अर्जामध्ये त्यांनी

आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे अपील क्रमांक २६४२/२००७ हे, या अर्जाव्दारे ते मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले आज रोजीचे विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २६४२/२००७, दिनांक ०५-०६-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २६४२/२००७, दिनांक ०५-०६-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शरद भवरीलाल शर्मा, रा. जाधवगल्ली, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, दि वैजापूर मर्चंट को.ऑप बँक लि. वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४३

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ सरव्यवस्थापक, अपिलार्थी

दि वैजापूर मर्चंट को.ऑप बँक लि. वैजापूर,

तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, प्रतिवादी

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,

औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. शरद भवरीलाल शर्मा

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेला त्यांचा दिनांक १३-०४-२००९ रोजीचा अर्ज सादर केला असून या अर्जामध्ये त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे अपील क्रमांक २६४३/२००७ हे या अर्जाव्दारे ते मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेले आज रोजीचे विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २६४३/२००७, दिनांक २४-०७-२००७ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २६४३/२००७, दिनांक २४-०७-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सरव्यवस्थापक, दि वैजापूर मर्चंट को.ऑप बँक लि. वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४४

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. देविदास नामदेव सिरसट, अपिलार्थी
रमाई निवास, विवेकानंद नगर, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा व्यवस्थापक,
श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि. बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि. बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने विचाराधीन अपिलाशी संबंधित मूळ अर्जाव्दारे व्यवस्थापक, श्री. छत्रपती राजर्षी शाहू

अर्बन को-ऑप. बँक लि. बीड यांच्याकडे दिनांक २६-०४-२००७ रोजी त्रयस्थ पक्ष दिपक देविदास सिरसट (मयत) यांच्या कर्जासंदर्भात दिनांक २४-०२-२००३ ते ३१-०३-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती.

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात नागरी सहकारी बँकाना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत असा दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने दिलेल्या आदेशानुसार माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी अपिलार्थीने ज्या प्राधिकरणाकडे माहिती मागविली आहे त्या प्राधिकरणास लागू होत नाहीत हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देविदास नामदेव सिरसट, रमाई निवास, विवेकानंद नगर, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४५

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, अपिलार्थी
८, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी जवळ, देवपूर,
धुळे - ४२४ ००५

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शाखाधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी
नोकरांची सहकारी बँक लि., धुळे, शाखा तळोदा,
जिल्हा नंदुरबार

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा चेअरमन, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी
नोकरांची सहकारी बँक लि., धुळे

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सरव्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि. धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०८-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने विचाराधीन अपील त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने आयोगाकडे केल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन १९९७-९८ पासून पुढील कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. परंतु प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील चेअरमन धुळे जिल्हा सरकारी नोकराची सहकारी बँक धुळे यांच्याकडे केल्याचे दिसून येथे. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

चेअरमन, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि., धुळे यांनी आयोगास त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केला आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, अपिलार्थीने सदरचे अपील बँकेचे चेअरमन यांना जन अपिलीय अधिकारी समजून दाखल केले आहे. या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी हे बँकेचे चेअरमन नसून बँकेचे सरव्यवस्थापक यांची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे. अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपील योग्य त्या प्राधिकरणास उद्देशून न केल्यामुळे अपिलार्थीच्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतला नाही.

आयोगास या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः या टप्प्यावर सुनावणी होणे गरजेचे वाटते. सबब, संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य न झाल्यास, अपिलार्थी सदर आदेश त्यांना प्राप्त झालेल्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वर काशिराम शिरसाठ, ८, फॉरेस्ट कॉलनी, नगांवबारी जवळ, देवपूर,

धुळे - ४२४ ००५.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि., धुळे, शाखा तळोद, जिल्हा नंदुरबार यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सरव्यवस्थापक, धुळे व नंदुरबार जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी बँक लि., धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४६

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. गौतम संतोष पारेराव, अपिलार्थी

संपादक, दै. युगपरिर्वतन एक्सप्रेस कार्यालय,

भिमनगर, गुरुकुल हायस्कूलजवळ,

साक्री रोड, धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

ग. स. बँक, मुख्य शाखा, धुळे

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०८-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही अभिप्राय दिले नाहीत किंवा त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने

त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे असे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या बँकेमध्ये फेब्रुवारी ते मार्च २००६ या कालावधीत करण्यात आलेल्या भरती प्रकरणासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागविली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिलेली पोच अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक २०-०६-२००६ रोजीचा कथित प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. त्यामुळे त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊ शकली नाही.

अपिलार्थीच्या दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय घेणे उचित राहील असे आयोगाचे मत आहे. सबब, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश मान्य न

झाल्यास, अपिलार्थी सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक २०-०६-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. (अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची झेरॉक्स प्रत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे)

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौतम संतोष पारेराव, संपादक, दै. युगपरिर्वतन एक्सप्रेस कार्यालय, भिमनगर, गुरुकुल हायस्कूलजवळ, साक्री रोड, धुळे.

२ जन माहिती अधिकारी, ग. स. बँक, मुख्य शाखा, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४७

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री.ख्वाजा समिउल्ला, अपिलार्थी

५, अहबाब कॉलनी, कटकटगेट रोड,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सहायक महाव्यवस्थापक,

बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा चेअरमन आणि प्रशासक,

बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि.

मुख्यालय ७८-मोहमदअली रोड, मुंबई

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांना लागू होत नसल्याचे कळविल्याने या निर्णयाविरुध्द अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ हा सहकारी बँकेस लागू होत नसल्याने माहिती देण्याचे नाकारले. यावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०६-२००७ रोजी निर्णय घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याप्रमाणे आपला निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनी युक्तिवाद केला.

अपिलार्थीने आपल्या युक्तिवादामध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ नागरी सहकारी बँकेला लागू होत नसल्याचे प्रतिपादन केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी काही

माहितीसाठी दिनांक ३०-०४-२००७ रोजी मूळ अर्ज केला व दिनांक ०४-०६-२००७ रोजी प्रथम अपील अर्ज केला आहे, ते प्राधिकरण म्हणजे, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. होय. ही बँक मल्टीस्टेट सहकारी बँक असल्याने यावर राज्य शासनाचे नियंत्रण नाही. या बँकेवर केंद्रशासनाचे नियंत्रण असल्याने आणि याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने त्यांच्याकडील रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात नागरी सहकारी बँकाना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी लागू होत नाहीत असा दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय दिलेला आहे. हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागितली आहे त्या प्राधिकरणास माहिती अधिकार अधिनियम लागू होत नाही असे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री.ख्वाजा समिउल्ला, ५, अहबाब कॉलनी, कटकटगेट रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक महाव्यवस्थापक, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा चेअरमन आणि प्रशासक, बॉम्बे मर्कन्टाईल को-ऑप. बँक लि. मुख्यालय ७८-मोहमदअली रोड, मुंबई यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६९७

निर्णय दिनांक ०२-०५-२००९

१ श्री. बालाजी निवृत्ती चिद्रावार, अपिलार्थी
घर नं. ११-९-३४, इंदिरा गांधी गृहनिर्माण संस्था मर्यादित,
शनिमंदिर जवळ, नवीन नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा व्यवस्थापिका, गोदावरी नागरी सहकारी बँक मर्यादित,
वजीराबाद, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सदर अपील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड यांच्या दिनांक २४-०९-२००७ रोजीच्या निर्णयाविरुध्द केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणतीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी ह्या व्यवस्थापिका, गोदावरी नागरी सहकारी बँक मर्यादित, वजीराबाद, नांदेड या आहेत.

मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ च्या संदर्भात दिनांक १३-०१-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकाना लागू होत नाही असा निर्णय दिला आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार गोदावरी नागरी सहकारी बँक मर्यादित, वजीराबाद, नांदेड हे प्राधिकरण माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येत नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०२-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बालाजी निवृत्ती चिद्रावार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका घर नं. ११-९-३४, इंदिरा गांधी गृहनिर्माण संस्था मर्यादित, शनिमंदिर जवळ, नवीन नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापिका, गोदावरी नागरी सहकारी बँक मर्यादित, वजीराबाद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, बिसेन नगर, नवा मोंढा, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८५

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. मोबीन पठाण मोहीयोद्दीन पठाण, : अपिलार्थी
व्दारा, ए. एम. के. ऑटो पार्टस, हडको कॉर्नर,
प्लॉट नं. ९, एन-१३, हर्सूल रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठाण शिक्षण संस्था,
प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, जगदंबा प्रतिष्ठाण शिक्षण संस्था,
प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना,

त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न दिला गेल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. वसीमखान मुसाखान पठाण यांच्याशी संबंधित सन १९९८ सालची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही व यासंदर्भात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा दिनांक ०१-१०-२००७ रोजीचा कथित अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले. यावर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्याप्रीत्यर्थ त्यांच्याकडे असलेली पोस्टाची पावती आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती मागविली आहे. त्यामुळे आयोगास या टप्प्यावर अपिलार्थीच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेता सुनावणी होणे गरजेचे वाटते. तसेच शिक्षण संचालनालयाने त्यांचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/ २००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ च्या

पत्रकाव्दारे प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) / शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे.

सबब असे आदेशित करण्यात येते की, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी, अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व याच कालावधीमध्ये यासंदर्भातील आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) नुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधीत दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ३० दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व याच कालावधीमध्ये यासंदर्भातील आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोबीन पठाण मोहीयोद्दीन पठाण, व्दारा, ए. एम. के. ऑटो पार्टस, हडको कॉर्नर, प्लॉट नं. ९, एन-१३, हर्सूल रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जगदंबा प्रतिष्ठाण शिक्षण संस्था, प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, जगदंबा प्रतिष्ठाण शिक्षण संस्था, प्राथमिक शाळा, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८६

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. बबन रामभाऊ राऊत, : अपिलार्थी
मु. पो. नांदर, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदर,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पैठण, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी माहिती अधिकार अधिनियमामध्ये दिलेल्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी

यासंदर्भात अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही अथवा अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही अशा प्रकारे संबंधित अधिका-याने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा भंग केला असल्याने संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य तात्काळ पुरविण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना, १२ वा वित्त आयोग, यशवंत ग्रामसमृध्दी व दलीत वस्ती सूधार योजनेसंदर्भात सन २००४ ते मार्च २००७ या कालावधीतील झालेल्या सिव्हील कामाच्या तांत्रिक मान्यता आणि त्यावर झालेल्या खर्चाच्या अभिलेख्याची व काम पूर्ण झाल्याचा दिनांक या मुद्दयांसंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यांनी या अपील अर्जावर दिनांक ०३-१२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांना पत्र लिहून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि ही प्रत अपिलार्थीस प्राप्त झाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१२-२००७ व दिनांक ३१-०१-२००८ रोजी त्यांनी मागणी केलेली माहिती व्यक्तिशः पुरविली आहे.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः घेऊनही माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ सही देण्यास नकार दिला. यासंदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयाची दिनांक ०५-१२-२००७ व दिनांक ३१-०१-२००८ रोजीची दोन पत्रे आयोगास दाखविली. या पत्राचे अवलोकन करता या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक नमूद नाही तसेच या पत्रावर अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त झ ााल्याप्रीत्यर्थ पोचही दिली नसल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी एक बाब निश्चितपणे दिसून येत आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जो प्रतिसाद तीस दिवसाच्या आत देणे भाग आहे तो त्यांनी दिनांक ०५-१२-२००७ व दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिला आहे. या पत्राची वैधता देखील, या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा जावक क्रमांक नसल्याने, संशयास्पद आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे हे पाहता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. विशेषतः अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने ही माहिती पोस्टाने मागितली असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः देण्याचे कोणतेही कारण असू शकत नाही ही बाब, व जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०५-१२-२००७ व ३१-०१-२००८ रोजीचे संशयास्पद पत्र पाहता हा संशय दृढच होत आहे. अपिलार्थीस आता सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात् असे आढळून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अपील अर्जावर दिनांक ०३-१२-२००७ रोजी निर्णय घेतला

आहे, तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, याबाबत जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे विचारणा केली असता त्यांनी आयोगासमोर कोणताही युक्तिवाद केला नाही किवा त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची प्रत त्यांना आयोगास सादर करता आली नाही. याही उपर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे स्पष्ट केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या निर्णयाची प्रत त्यांना अग्रेषित केली होती व ही प्रत त्यांना आज आयोगाकडील सुनावणीच्या दिवशी प्राप्त झाली आहे. यावरुन या प्रकरणी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी देखिल या प्रकरणी बनावट कागदपत्रे तयार केल्याचे दिसून येत आहे. संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांच्या अशा प्रकारच्या सचोटीचा अभाव असलेल्या वर्तनाबाबत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सिध्द केलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पोस्टाने व विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबधीत जन माहिती अधिकारी (ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदर, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमित होताच ९० दिवसाच्या आत करुन आपला यासंदर्भातील अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बबन रामभाऊ राऊत, मु. पो. नांदर, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदर, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८७

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ सौ. रेखा श्रीधर डहाळे व : अपिलार्थी
श्री. श्रीधर किसन डहाळे, रा. नाकोडा अपार्टमेंट,
गुलजार टॉकीजजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,
सेलगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बदनापूर, तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न पुरविल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१२-२००५, ०५-०३-२००७ व ३०-०५-२००७ अशा तारखा लिहिलेल्या दोन प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांनी दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा संचिकामधील टिपणीचा गोषवारा, ग्रामपंचायत स्थापना दिनांक व मसुदा, कोणकोणते ठराव पास झाले, सरपंच व ग्रामसेवक यांची नांवे, दुकानाच्या गाळ्याचा बांधकाम परवानगी तपशील व कोणकोणत्या जातीच्या व्यक्तीस गाळे दिले गेले त्यांची नांवे व सध्या हे गाळे कोणाच्या नावावर आहेत, त्यांनी केलेली कारवाई व नामांतर का करण्यात आले नाही त्याची सविस्तार कारणे, गाळा क्रमांक १ चे नामांतर का करण्यात आले नाही याची सविस्तर कारणे - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००७ रोजी निर्णय दिला. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यास विलंब लागल्याचे अनुमान काढले आहे. मात्र अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश त्यांनी या प्रकरणी पारित केले नाहीत. यानंतर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून

अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले व ग्रामपंचायत सेलगाव, तालुका बदनापूर येथील गाळा क्रमांक १ च्या मालकीचे नामांतर करण्यासंदर्भात आयोगास विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४-१०-२००७ रोजी माहिती देऊन ती माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी घेतली आहे. अपिलार्थीच्या गाळ्याच्या मालकी नामांतराबाबत त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या गाळ्याविषयी माहिती मागितली आहे तो गाळा त्यांच्या पत्नीचे भाऊ श्री. संतोष अंबादास दहीवाल यांना लिलाव करुन नगरपरिषदेने भाडेतत्वावर दिलेला आहे. गाळाधारकाला अशा प्रकारे प्राप्त झालेल्या गाळ्याची परस्पर विक्री अथवा हस्तांतर करता येत नाही तसे त्यांनी अपिलार्थीस लेखी कळविले आहे. तथापि अपिलार्थीने श्री. संतोष अंबादास दहीवाल यांच्याशी परस्पर व्यवहार करुन हा गाळा घेतला आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. मात्र हस्तांतरणाचा हा व्यवहार अवैध असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीची विनंती मान्य केली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या दोन अर्जावर एकच प्रथम व व्दितीय अपील केले आहे. त्यांच्या मूळ अर्जावर ०५-१२-२००७, ०५-०३-२००७ व ३०-०५-२००७ असे वेगवेगळे दिनांक नमूद केले आहेत. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून गाळा

हस्तांतरण का झाले नाही या मुद्दयावरील माहिती देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही, दोन अर्जातील उर्वरित माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे व ती अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिक-याकडून पुरविली गेली आहे. अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जांव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जांव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. रेखा श्रीधर डहाळे व श्री. श्रीधर किसन डहाळे, रा. नाकोडा अपार्टमेंट, गुलजार टॉकीजजवळ, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सेलगांव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बदनापूर, तालुका बदनापूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८८

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, : अपिलार्थी
मु. ताडकळस, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अधीक्षक कृषि अधिकारी, कार्यालय, विभागीय
कृषि सह संचालक, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००७ रोजी दिलेली माहिती अपूर्ण असून या माहितीमध्ये जात प्रमाणपत्रे, अपंगात्वाची प्रमाणपत्रे, धरणग्रस्ताचा दाखला, स्वातंत्र्य सैनिकाची प्रमाणपत्रे इत्यादी माहिती त्यांना प्राप्त झाली नाही या कारणास्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी २००२ ते ऑगस्ट २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातील लिपीक, वरिष्ठ लिपीक पदावरुन पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कर्मचा-याचे नांव, प्रथम नियुक्तीचा दिनांक, जेष्ठतासूचीतील अनु.क्र., जातनिहाय वर्गवारी, अपंग, स्वातंत्र्य सैनिक, धरणग्रस्त, अस्थिव्यंग, बहिरे, दृष्टीदोष, विकलांग इत्यादीचे बाबत सादर केलेल्या व नंतर सादर केलेल्या जातीच्या व अपंगत्वाच्या प्रमाणपत्राच्या प्रती तसेच पदोन्नती देतांना करण्यात आलेल्या मंजूर टिपणीच्या झेरॉक्स प्रती आणि पदोन्नती देतांना ज्या नियमांचा आधार घेतला होता त्या नियमांच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-११-२००७ रोजी प्रथम अपील केले.

मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून दिनांक २८-१२-२००७ रोजी माहिती दिली गेली. या आधारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक २३-०१-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून संबंधित कर्मचा-यांची जात प्रमाणपत्रे, तसेच स्वातंत्र्य सैनिक, धरणग्रस्त व अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र यासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांना मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विस्तृत प्रमाणात आणि त्रयस्थ पक्षासंदर्भात असल्याने आणि ही माहिती त्यांच्या स्तरावर उपलब्ध नसल्याने त्यांना प्रथमतः अपिलार्थीस ही माहिती नाकारावी किंवा कसे याबाबत निर्णय घेण्यास विलंब लागला. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावर जी माहिती उपलब्ध आहे ती घेऊन जाण्याविषयी कळविले. तथापि त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे पसंत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी ठेवली असता अपिलार्थी हे उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २८-१२-२००७ रोजी उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन गेले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते तयार असून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी हेतूतः कधीही नाकारले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीने पदोन्नत कर्मचा-यांच्या बाबत काही प्रमाणपत्रे मागितली होती. तथापि कर्मचा-यांना पदोन्नती देतांना अपंग, स्वातंत्र्य सैनिक, धरणग्रस्त अशी प्रवर्गामध्ये पदोन्नती दिली जात नसून कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या बिंदू नामावलीनुसार पदोन्नती दिली जाते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रवर्गनिहाय पदोन्नतीवर आधारित असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविली नाही. आता ही माहिती अपिलार्थीस देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ' माहितीचा विषय ' या सदराखाली ' लिपीक, वरिष्ठ लिपीक यांच्या पदोन्नतीबाबत ' असे म्हटले असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांचा गैरसमज होणे स्वाभाविक आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन वाचले असता त्यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे जानेवारी २००२ ते ऑगस्ट २००७ या कालावधीत पदोन्नती दिल्या गेलेल्या सर्व कर्मचा-यांची जात प्रमाणपत्रे, अपंगत्वाची प्रमाणपत्रे व त्यांच्या मूळ नियुक्ती देतांना त्यांच्याकडील स्वातंत्र्य सैनिक, इत्यादी बाबत दिलेले प्रमाणपत्र याबाबत माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय हे प्रादेशिक स्तरावरील कार्यालय आहे. लिपीक स्तरावरील नेमणूका त्यांच्या कार्यालयाकडून केल्या जातात. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. यास्तव, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी जानेवारी २००२ ते ऑगस्ट २००७ या कालावधीमध्ये लिपीक व वरिष्ठ लिपीक या पदावरील पदोन्नती दिलेल्या कर्मचा-यांची यादी प्रथमतः शोधून काढावी व त्या यादीतील कर्मचा-यांच्या अपिलार्थीने मागणी केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. तथापि या प्रकरणी माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्याने ती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षांचा युक्तिवाद लक्षात घेणे आयोगास गरजेचे वाटत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सार्वजनिक असल्याने ती अपिलार्थीस देय होत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, मु. ताडकळस, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१८९

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. प्रदीप बळवंतराव डासाळकर, : अपिलार्थी
रामनगर पोलीस कॉलनी २५६ च्या समोर,
नवीन जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस
उत्पादक पणन महासंघ मर्यादित, विभागीय कार्यालय,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी
कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, विभागीय
कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लेखापाल, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने केले असल्याचे या अर्जामध्ये नमूद केले असून आपल्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची मागणी त्यांनी या अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-२००७ मधील हंगामाच्या कालावधीमधील वेस्टेज विक्रीसंदर्भात एकूण तीन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने त्यांना माहिती प्राप्त होऊ शकली नाही असे स्पष्ट करुन त्यांचे अपील विचारार्थ दाखल करुन घेण्याच्या योग्यतेचे नसल्याचे अपिलार्थीस कळविले. याच पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ११-०१-२००८ पर्यंत केल्यास अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचे आश्वासीत केले आहे. जन अपिलीय अधिकारी

यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, अपिलार्थीने त्यांच्याकडे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा न केल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत, असे स्पष्ट करुन अपिलार्थीने सदरचे शुल्क भरल्यास ते अपिलार्थीस माहिती देण्यास तयार असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, रुपये २० इतके त्यांच्या कार्यालयात, या शुल्काचा पूर्ण तपशील देऊन, भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती ' नाही ' असे नमूद केले आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची कृती बरोबर आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांनी अपिलार्थीस पुरविला आहे. अपिलार्थीस दिनांक १८-१२-२००७ रोजी पत्र पाठविल्याचा योग्य तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. या सर्व बाबी पाहता अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. कोणत्याही अर्जदारास जर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसतील, तर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी हे सूचित करतील त्याप्रमाणे प्रथमतः भरणे हे त्यांना अनिवार्य आहे, हे पाहता

अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदीप बळवंतराव डासाळकर, रामनगर पोलीस कॉलनी २५६ च्या समोर, नवीन जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९१

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. अंबादासराव प्रल्हादराव देशमुख कहाळेकर, : अपिलार्थी
रा. ३-३-३, बालाजी हॉस्पिटल,
चिखलवाडी, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कहाळा बु.
तालुका नायगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नायगांव, तालुका नायगांव,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन

माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०७-२००७ रोजी माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मागणीप्रमाणे माहिती न देता अपूर्ण व खोटी माहिती दिली त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय अद्यापपावेतो न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास पुढे अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण व चुकीची माहिती दिल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती योग्य व अचूक स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे कहाळा बु. तालुका नायगांव जिल्हा नांदेड येथील गट क्रमांक १ येथील चतु:सीमेत गावठाणामध्ये नसलेल्या व एन. ए. न झालेल्या पूर रेषेत असलेल्या जमिनीवर बेकायदेशीर बांधकाम होत असल्याबद्दल एकूण ११ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक /०८/२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन काही माहिती पुरविली. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ज्या गट क्रमांकावर ग्रामपंचायततर्फे अनधिकृत बांधकाम केले जात आहे तो गट त्यांच्या मालकीचा

असून त्यांची कोणतीही परवानगी न घेता ग्रामपंचायतीने या जमिनीवर बेकायदेशीर रस्ता, घरकुल आणि समाजमंदिर अशा प्रकारची बांधकामे केली आहेत. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे. ही माहिती अपूर्ण व चुकीची कशी आहे याचे विवेचन त्यांनी आयोगास केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक १६-०८-२००७ रोजी पोस्टाने माहिती पुरविली असून त्याप्रीत्यर्थ पोस्टाची पावती त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय का घेतला नाही असे जन अपिलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर दिनांक ०१-१०-२००७ रोजी सुनावणी ठेवली गेली होती असे आयोगास अवगत केले. तथापि सुनावणी का होऊ शकली नाही याची कारणे त्यांना ज्ञात नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मालकीच्या भूखंडावर ग्रामपंचायत कहाळा बु. यांच्यातर्फे अनधिकृतपणे केल्या जाणा-या बांधकामासंदर्भात एकूण ११ मुद्याव्दारे माहिती मागविली आहे. या ११ मुद्दयापैकी मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३, ४, ८ अंशतः व मुद्दा क्रमांक ९, १० व ११ या मुद्दयांवरील माहिती मूळात अपिलार्थीस देय होत नाही कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नाही. अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असून त्याव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे मत व अभिप्राय त्यांना या मुद्दयाव्दारे विचारल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास

माहिती देणे या प्रक्रियेमध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबाबत, निर्णयाबाबत स्पष्टीकरण अथवा खुलासा देणे अभिप्रेत नाही हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील वर नमूद केलेल्या मुद्दयांशी संदर्भित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याचे सिध्द होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती चुकीची पुरविली आहे. याव्दारे अपिलार्थीने " या बांधकामास आपण परवानगी दिली आहे काय " अशी माहिती मागितली होती. मूळात अशा प्रकारची माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि यासंदर्भात अपिलार्थीस ग्रामसेवक, ग्रामपंचायत कहाळा बु. यांनी, " आपल्या मालकीच्या जमिनीवर बांधकाम करीत नाही " असे चुकीचे उत्तर दिले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे अपिलार्थीने " वरील अनधिकृत बांधकामाची देयके आपणास मंजूर करण्याचा अधिकार कोणत्या नियमाप्रमाणे आहे " अशी माहिती जन माहिती अधिका-यास विचारली आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस " ग्रामपंचायत हद्दीतील बांधकामे ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय मंजूरीने करण्यात आली आहेत " असे दिशाभूल करणारे उत्तर अपिलार्थीस दिले आहे. बांधकाम झाल्यानंतर बांधकामाची बिले देण्यासंदर्भात निश्चितपणे कोणत्या पध्दतीचा अवलंब केला जातो व ती पध्दत जिल्हा परिषदेच्या संहितेमध्ये निश्चितपणे कोणत्या कलमाच्या आधारे केली जाते या कलमाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस देणे भाग होते परंतु त्यांनी तसे केले नाही. सबब या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी जिल्हापरिषदेच्या कंत्राटदाराची बिले अदा करण्यासंदर्भात ठरविण्यात आलेली पध्दती आहे त्या कलमाची प्रत अपिलार्थीस द्यावी असे त्यांना

सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९, १० व ११ व्दारे अपिलार्थीने " वरील अनधिकृत बांधकामास कोण जबाबदार आहे, त्यांच्याविरुध्द आपण काय कार्यवाही करणार, जनतेच्या व सरकारच्या पैशाचा गैरवापर झाला आहे असे आपणास वाटत नाही काय ? त्या पैशाची आपण वसूली करणार काय ? " अशा प्रकारची भविष्यातील व जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. जी वर स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

मुद्दा क्रमांक ५, ६ व ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे ही माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये मान्य केले आहे हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयांचा परामर्श येथे घेण्यात येत नाही.

थोडक्यात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती यांचे वरीलप्रमाणे केलेले पृथःकरण पाहता आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ व ८ अंशतः शी संबंधित माहिती वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे द्यावी लागेल ती त्यांनी सात दिवसाच्या आत देण्याचे आज सुनावणीमध्ये मान्य केले आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ८ अंशतः व्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-०७-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या पत्रामध्ये दिनांकाचा व जावक क्रमांकाचा उल्लेख न केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही दृष्टहेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर कोणतीही कारवाई आयोग आदेशित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व ८ अंशतः शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद (वि. बा. बोरगे)

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंबादासराव प्रल्हादराव देशमुख कहाळेकर, रा. ३-३-३, बालाजी हॉस्पिटल, चिखलवाडी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कहाळा बु. तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव, तालुका नायगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९२

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. प्रदिप भा. चिन्नावार, : अपिलार्थी
चिन्नावार हॉस्पिटल, राजेंद्रनगर, मेनरोड, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
वनपरिक्षेत्र कार्यालय, मांडवी, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दिनांक २४-०१-२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्रोटक माहिती देऊन संपूर्ण माहिती पुरविण्याबाबत टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०२-११-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना व नियमित रोजगार हमी योजनासंदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन व अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून सशुल्क माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी उर्वरित माहिती दिनांक २५-०१-२००८ रोजी अपिलार्थीस व्यक्तिशः दाखविली आणि या माहितीची अपिलार्थीने पाहणी केली व त्यांचे या संदर्भात पूर्णपणे समाधान झाले आहे, असे आयोगास अवगत केले. त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२००८ रोजीच्या लेखी जबाबाची सत्यप्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. या जबाबाची सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठी राज्य माहिती आयुक्त यांनी अपिलार्थीशी त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या

भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधला असता, अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली संपूर्ण माहिती आता प्राप्त झाली असल्याचे व त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रदिप भा. चिन्नावार, चिन्नावार हॉस्पिटल, राजेंद्रनगर, मेनरोड, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), वनपरिक्षेत्र कार्यालय, मांडवी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९३

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. गणेश हिरामण पिंपळे, : अपिलार्थी
अणणाभाऊ साठे चौक, वॉर्ड क्रमांक २, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, हदगांव, तालुका हदगांव
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी हे जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळत असल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील जाणीवपूर्वक फेटाळून लावले आहे. या प्रकरणामध्ये संपूर्ण भ्रष्टाचार झाला असल्यामुळे माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत आहेत व अपिलीय अधिकारी देखील त्यामध्ये गुंतले असल्यामुळे त्यांच्याकडूनही यासंदर्भात काही कार्यवाही होऊ शकत नाही त्यामुळे संबंधितांवर योग्य ती कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वीज मीटरबाबत या विषयावर रिलायन्स टॉवरला दिलेल्या वीज कनेक्शनबाबत एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रिलायन्स टॉवरला मिळालेले वीज कनेक्शन कोणत्या नियमान्वये मिळाले आहे, सदर टॉवरला श्रीमती बलदवा यांनी कोणत्या आधारावर कनेक्शन दिले आहे, तसे कनेक्शन देण्याची तरतूद आहे काय, मीटरपासून दुसरे कनेक्शन देता येते का, रिलायन्स टॉवरला तसा वीज वापरण्याचा अधिकार आहे काय व दुस-याच्या वीज मीटरवरुन वीज वापरण्याचा जी. आर. आहे काय - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि हे अपील कालबाह्य झाल्याच्या कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१२-२००७ रोजी फेटाळून लावले. यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नगरपरिषद, हदगावकडून कोणतेही नाहरकत प्रमाणपत्र न घेता रिलायन्स कंपनीला मीटरमधून कनेक्शन दिले आहे त्याबाबत त्यांना माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही. तथापि या विषयासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस वेगळ्या इतर संदर्भाव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे रिलायन्स टॉवरला श्रीमती बलदवा यांच्या मीटरमधून वीज पुरविली गेली नसून श्रीमती बलदवा यांच्या मालकीच्या भूखंडावर रिलायन्स कंपनीने सदरचा टॉवर उभारला आहे. या टॉवरला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने रितसर नियमाचे पालन करुन स्वतंत्र वीज कनेक्शन दिले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील रिलायन्स टॉवरला मिळालेले वीज कनेक्शन कोणत्या नियमान्वये मिळाले हा मुद्दा वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. कारण या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबत खुलासा व काही मुद्दयावर त्यांचे अभिप्राय मागविले आहेत. जे अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाहीत. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १ शी संबंधित व तसेच अपिलार्थीचे समाधान होण्याच्या दृष्टीने वीज कनेक्शन मंजूर करतांना त्यांचे कार्यालयातर्फे जी कार्यपध्दती अवलंबिली जाते व ती कार्यपध्दती ज्या विहीत

अभिलेख्यावर उपलब्ध आहे त्या अभिलेख्याची सत्यप्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पुरवावी जेणेकरुन अपिलार्थीचे समाधान होऊ शकेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती सात दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यास ते तयार आहेत असे आयोगास अवगत केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरीलप्रमाणे स्पष्ट केलेली अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व निर्णयामध्ये स्पष्ट केलेली त्यांना देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश हिरामण पिंपळे, अण्णाभाऊ साठे चौक, वॉर्ड क्रमांक २, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

मर्यादित, हदगांव, तालुका हदगांव जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९४

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. रामराव नागनाथराव रत्नागिरे, : अपिलार्थी
पोलीस स्टेशनजवळ, कुंडलवाडी, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कुंडलवाडी,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय आयुक्त तथा विभागीय नगरपरिषद
संचालनालय, विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा पुनरुच्चार केला आहे. या अपील अर्जासोबत अपिलार्थीने वेगळा अर्ज जोडला असून या अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, मुख्याधिकारी, नगरपरिषद, कुंडलवाडी यांनी अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली नाही व ती माहिती त्यांना देण्यासाठी मुद्दाम टाळाटाळ करत आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कै. नागनाथराव रत्नागिरे यांच्याविषयी सन १९७० ते ऑगस्ट १९९९ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, कै. रत्नागिरे यांचे हजेरीपट, अर्जित रजा घेतलेला कालावधी, रजेचे मंजूरी आदेश, विनंती अर्ज इत्यादीसंदर्भात माहिती मागविली होती. ही माहिती सर्वसाधारणपणे अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे, तथापि असे असूनही अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-१२-२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील मान्य केले व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणताही कालावधी निश्चित करुन दिलेला नाही. कोणतीही माहिती न मिळाल्याने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागविली आहे तो त्रयस्थ पक्ष म्हणजे त्यांचे मयत वडील असून त्यांच्या वडिलांना नगरपरिषदेकडून अनुज्ञेय लाभ अद्यापपावेतो मिळाले नसल्याने त्यांनी ही माहिती नगरपरिषदेकडून मागितली आहे. त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक २८-०१-२००९ रोजी रुजू झाले असून या प्रकरणाची त्यांना कल्पना आल्यानंतर त्यांनी जास्तीत जास्त मेहनत करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती शोधून काढली आहे. तसेच त्यांनी आयोगास त्यांच्या युक्तिवादामध्ये पुढे असे आश्वासीत केले की, अपिलार्थीच्या गा-हाण्याचा निपटारा करण्याचा त्यांचा प्रयत्न राहील व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात येईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. तसेच अपिलार्थीच्या गा-हाण्याचा निपटारा करण्याचे त्यांनी आयोगास आश्वासीत केले आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती जर सदर कागदपत्रे जतन करुन ठेवण्याचा कालावधी व्यपगत झाल्याने

नष्ट केली गेली असेल तर ही कागदपत्रे नष्ट केल्याचा पुरावा त्यांनी अपिलार्थीस या माहितीबरोबर जोडावा.

उपरोक्त प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सोनवणे (सध्या मुख्याधिकारी, कंधार नगरपरिषद या पदावर कार्यरत) यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. सोनवणे (सध्या मुख्याधिकारी, कंधार नगरपरिषद या पदावर कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामराव नागनाथराव रत्नागिरे, पोलीस स्टेशनजवळ, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कुंडलवाडी, तालुका बिलोली, जिल्हा यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१९५

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ सौ. लता दाभाडकर : अपिलार्थी
व इतर नागरिकातर्फे श्री. सतीश कुलकर्णी व
जयंत वडगांवकर, रा. चाणक्यचाळ, देहेडकरवाडी,
जुना जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक, नगर भूमापन कार्यालय,
जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांनी माहिती न दिल्याने तसेच त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय

देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने विचाराधीन अपील त्यांनी आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" १) मा. अपर जिल्हाधिकारी, जालना यांचे आदेशानुसार क्षेत्र दुरुस्ती करण्यात आलेल्या सन २००४ मधील (जानेवारी ते डिसेंबर २००४) देहेडकरवाडी जुना जालना येथील क्षेत्र दुरुस्ती आदेशाच्या संपूर्ण संचिका टिप्पणी पृष्ठ व पृष्ठ क्रमांक टाकूण मिळणेबाबत, २) या कालावधीत संचीका हाताळणा-या अधिकारी व कर्मचा-यांची नावे ३) क्षेत्र दुरुस्तीपूर्वीचे P. R. card ची झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन मिळणेबाबत. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये दोन इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या शुल्काचा अपिलार्थीने दिनांक २२-११-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये, अपिलार्थीच्या या भूखंडाच्या संदर्भाने माहितीसाठी आवश्यक त्या भूखंडाचा भूमापक क्रमांक न दिल्याने माहिती उपलब्ध होऊ

शकत नाही असे अपिलार्थीस एका पृष्ठाच्या पत्राव्दारे कळविले. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, ते या पदावर दिनांक १२-०६-२००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने माहिती मागितली त्यावेळी श्री. चव्हाण नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते व ते सध्या निलंबीत आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याने व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संबंधित भूखंडाच्या भूमापन क्रमांकाचा उल्लेख न केल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देणे त्यांना शक्य नव्हते. जर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना या कारणास्तव माहिती देणे शक्य नव्हते तर त्यांनी अपिलार्थीस त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्याप्रमाणे कळविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासंदर्भात प्रथम प्रतिसाद, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-११-२००७ रोजीच्या दिलेल्या निर्णयाच्या दिवशीच दिला आहे. अपिलार्थीस माहिती देता येत नसल्याचे त्यांनी, अपिलार्थीकडून दोन रुपये इतके माहितीपोटीचे शुल्क घेऊन कळविले आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस माहितीसाठीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी कळविण्याची त्यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने सचिव (महसूल) यांना त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीकडून त्यांना दिलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये दोन इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती आज व्यक्तिशः त्यांच्या घरी पाठवून दिली असल्याचे आयोगास अवगत केले. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी श्री. चव्हाण (सध्या निलंबीत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांना दिलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये दोन इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. लता दाभाडकर व इतर नागरिकातर्फे श्री. सतीश कुलकर्णी व जयंत वडगांवकर, रा. चाणक्यचाळ, देहेडकरवाडी, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०६

निर्णय दिनांक ०४-०५-२००९

१ श्री. महंमद एकबाल पिता अब्दुल हबीब, : अपिलार्थी
रा. गवळीपुरा, स्टेशन रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मिळण्यासाठी अर्ज केला असता त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १४-०२-२००८ रोजी या संदर्भात समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमानुसार निर्णय न

देता अपिलार्थीची दिशाभूल करुन प्रकरण निकाली काढले त्यामुळे अपिलार्थीने सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे नांदेड येथील सर्व्हे नंबर १६० च्या प्रकरणी एन. डी. एम. आर. २०/८६ मोजणी दिनांक ०३-०५-१९८६ मोजणी ८५ (२) प्रमाणे मोजणी नक्कल मिळण्याबाबत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रितसर अर्ज केला होता. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर नकलाचे शोध घेण्याचे काम चालू असल्याचे कळविले. या शोधकामास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास किती वेळ लागेल याची माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेले प्रकरण बरेच जुने असल्याने त्यांच्या अभिलेख कक्षात शोध घेऊनही प्रकरण मिळाले नाही व त्यामुळे अपिलार्थीस नक्कल पुरविता येत नाही असे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. यावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जुन्या कालावधीतील असल्याने ती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती भूखंडाच्या उप विभागाच्या मोजणीशी संबंधीत असून अशा प्रकारच्या मोजणीशी संबंधित अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी पाच वर्षे व मोजणीच्या नकाशाचा कालावधी बारा वर्षे इतका आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयात शोध घेऊनही त्यांना उपलब्ध न झाल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले असून अपिलार्थीस हे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी प्रथम अपील अर्जामध्ये त्याचा उल्लेख केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अपिलार्थीने या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांना " सदर नक्कल शोधण्यासाठी किती वेळ लागेल याची माहिती " ही माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारची माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होऊ शकत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध असेल त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करणे इतपतच सीमित प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रक्रियेमध्ये कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भविष्यकाळातील माहिती मागविणे तसेच त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारणे अभिप्रेत नाही. त्यामुळे मूळात या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार

'माहिती'चा विषय होऊ शकत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महंमद एकबाल पिता अब्दुल हबीब, रा. गवळीपुरा, स्टेशन रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५१

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. अर्जून रावसाहेब नवपुते, अपिलार्थी

मु. गाडीवाट, पो. घारदोन, तालुका औरंगाबाद

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही त्यामुळे त्यांनी दिनांक १५-११-२००७ रोजी जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील केले असता अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे माहितीपोटीचे शुल्क रुपये ९३०६ इतके भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये शुल्काचा तपशील व अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या पृष्ठांची संख्या ही माहिती त्यांनी पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ या कालावधीतील रोजगार हमी योजना व कामासाठी धान्य कार्यक्रमांतर्गत केल्या गेलेल्या एकूण सहा गावातील कामांची अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका आणि मजुरांच्या हजेरी रजिस्टरच्या प्रती यांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपात असल्याचे त्यांना कळवून त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या अभिलेख्याची पाहणी करण्याचे त्यांना सूचित केले व याबाबत आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती रुपये दोन प्रतिपृष्ठ या दराने अपिलार्थीस देण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत त्यांच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ९३०६ इतक्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे परत अपिलार्थीस आश्वासीत केले. या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीस चलन तयार करुन दिले होते. अपिलार्थीस आवश्यक त्या रकमेचा तपशील प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-११-२००७ रोजी रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना, त्यांच्याकडील दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झ ालेल्या या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्याने त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून पाहून जाण्यासाठी व त्यातील आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती प्रतिपृष्ठ दोन रुपये या दराने देण्याची तयारी त्यांनी दर्शविली होती. तसेच त्यांच्याकडील दिनांक १३-११-२००७ रोजीच्या पत्राप्रमाणे माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये ९३०६ भरण्याचे सूचित केले. या पत्राबरोबर त्यांनी कोषागारात शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रतही अपिलार्थीस दिली होती. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केला नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. जरी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये जरी विहित मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद अवैध आहे कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क संपूर्ण तपशीलासह अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे कळविणे आवश्यक होते. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती पाहून जाण्याचे सूचित केले व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती प्रतिपृष्ठ रुपये दोन या दराने देण्याची तयारी दशविली. जन माहिती अधिकारी यांचा हा प्रतिसाद काहीसा सकारात्मक असला तरी तो अधिनियमातील तरतुदीनुसार पूर्णतः वैध नाही. अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास ती माहिती अर्जदारास देण्यापोटी लागणा-या शुल्काचा संपूर्ण तपशील जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे देणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी रुपये ९३०६ इतके शुल्क अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर कळविले आहे तसेच जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १३-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना द्याव्या लागणा-या माहितीच्या पृष्ठांच्या संख्येचा उल्लेख नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १३-११-२००७ रोजीचे पत्र देखील अवैध ठरत आहे.

उपरोक्त प्रकरणी जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे उघडपणे नाकारले नसले तरीही त्यांनी अपिलार्थीस वेळोवेळी दिलेला प्रतिसाद हा वर उल्लेखिलेल्या कारणाने अवैध ठरत असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी आयोगाकडे मागितला आहे. परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २९-११-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांना ८ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते त्याचा विचार करता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन

द्यावी.  या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी उघडपणे नाकारले नसल्याने अथवा ही माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अर्जून रावसाहेब नवपुते, मु. गाडीवाट, पो. घारदोन, तालुका - जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५२

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. प्रसाद एकनाथ खिस्ती, अपिलार्थी
रंगारहट्टी, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (माहिती अधिकारी),
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी क्युबिक मीटरमध्ये दिलेली माहिती खोटी आहे. प्रत्यक्ष झालेले काम आणि माहितीमध्ये तफावत असल्याने त्यांनी व्दितीय अपील आयोगाकडे केले आहे. तसेच त्यांनी या अपील अर्जामध्ये पुढे आयोगास अशी विनंती केली आहे की, प्रत्यक्ष कामाची मोजणी करुन क्युबिक मिटरमधील माहिती देण्याचे आदेशित व्हावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैठण नगरपरिषद हद्दीमध्ये श्री. तोतला यांचे दुकान ते गुरव यांचे घर व पतंगे यांचे घर ते दाणेकर यांचे घरापर्यंत केलेला रस्ता किती मीटर आहे, संबंधीत गुत्तेदारास किती बिल दिले आहे, चेक नंबर व एम. बी. प्रत व अंदाजपत्रकाप्रमाणे कामाचा तपशील, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती, त्यांना २४ रुपये इतके शुल्क आकारुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-१२-२००७ रोजी आदेश देऊन या आदेशाव्दारे अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची असून प्रत्यक्षतः झालेले काम व जन माहिती

अधिकारी यांनी कळविलेली माहिती यामध्ये तफावत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी उपलब्ध माहिती सशुल्क पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी प्रतिसाद देऊन आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. मात्र या प्राप्त माहितीवर अपिलार्थीचा आक्षेप असून अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीस देण्यात आलेल्या मोजमाप पुस्तकामध्ये असलेली मापे व वस्तुस्थिती यामध्ये फरक असून वास्तवापेक्षा जास्त परिमाणाची मापे त्यामध्ये नोंदविल्याचे दिसून येते. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात त्यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध होती त्या स्वरुपात त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत ती अपिलार्थीस दिलेली आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीपुरते या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य विहित मुदतीत योग्य प्रकारे बजावल्याचे दिसून येते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर जर काही आक्षेप असतील तर त्यांनी अशा आक्षेपांची तक्रार संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई अथवा तत्सम इतर सक्षम प्राधिकरणाकडे करुन आपल्या गा-हाण्याचा निपटारा करुन घ्यावा असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत त्यांच्याकडील उपलब्ध माहिती प्राप्त झाली असून अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये आयोगास अशी विनंती

केली की, या कामाची प्रत्यक्षतः मोजणी करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित व्हावे. अशा प्रकारे कामाची फेरतपासणी करुन नव्याने माहिती तयार करुन अपिलार्थीस पुरविण्याची तरतूद अधिनियमातील तरतुदीमध्ये नसल्याने अपिलार्थीची ही विनंती देखिल आयोग अमान्य करीत आहे.

वरील सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रसाद एकनाथ खिस्ती, रंगारहट्टी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५३

निर्णय दिनांक  ०५-०५-२००९

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, अपिलार्थी
ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट,
जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भोकरदन,
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अर्जामध्ये अपिलार्थीने सदर अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकारात मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे केले असल्याचे म्हटले आहे व त्यांना एन. एम. आर. क्रमांक ३७४२ व ३७४४ च्या साक्षांकीत प्रतीची आवश्यकता असल्याचे पुढे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एन. एम. आर. क्रमांक ३७४२ व ३७४४ दिनांक १९-१२-१९८५ च्या साक्षांकीत प्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित मस्टर्स २२ वर्षापूर्वीचे जुने असल्याने ते शोधून सुध्दा त्यांना आढळले नसल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-१०-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश न देता जन माहिती अधिकारी यांच्या गोपनीय अहवालात माहितीच्या अधिकारातील माहिती देण्यासाठी असमर्थता दर्शविणे याबाबतची नोंद घेण्यासाठी आदेश दिले. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. कारण ही माहिती प्राप्त

झाल्याने, प्राप्त माहितीच्या आधारे त्यांना कामगार न्यायालयात न्याय मिळू शकेल व एका व्यक्तीस कामावर हजर करुन घेता येईल.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा संबंध त्यांच्या युनियनकडील मजूर श्री. भिमराव विठ्ठल इंगळे यांच्याशी असून श्री. भिमराव विठ्ठल इंगळे यांना १९८५-८६ या कालावधीतील एकूण ७१ मस्टरच्या प्रती पुरविल्या आहेत. फक्त अपिलार्थीने मागणी केलेल्या २९ मस्टरच्या प्रती त्यांना त्यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही उपलब्ध होऊ शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या मस्टरच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या आहेत ते मस्टर जतन करुन ठेवण्याचा कालावधी हा कायमस्वरुपी असा असतो. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या मस्टरच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन देणे त्यांना अनिवार्य आहे. एखादे कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्याचे अभिलेखे गहाळ झाल्यास त्या प्रकरणाची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी पोलिसात तक्रार नोंदविणे भाग होते. तथापि या प्रकरणी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी आजतागायत केलेली नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत पुनःश्च शोध घेऊन अपिलार्थीस ही माहिती तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या कालावधीत त्यांना या माहितीसाठीच्या प्रतींचा शोध न लागल्यास त्यांनी या प्रकरणी आपली तक्रार योग्य प्रकारे पोलिस स्टेशनमध्ये नोंदवावी आणि या तक्रारीची एक प्रत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर, लक्कडकोट, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५४

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. लक्ष्मण नारायण पाटील, अपिलार्थी
मु. पो. उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा चिटणीस, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, उंडणगांव,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, उंडणगांव,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने चिटणीस, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांनी खोटी व चुकीची माहिती दिल्याने सदर अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या आर्थिक व्यवहाराविषयी सन २००६ ते ऑगस्ट २००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" नारायण आहिरे यांना २,६८,००० /- रु. संस्थेने कसे व कोठून दिले ? संस्थेकडे हा पैसा कोठून आला ? देणगी असेल तर देणगीदाराचे नावे देणे व २००६-२००७ लेखा परिक्षण स्टेटमेन्ट देणे. "

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती तसेच अपिलार्थीने या अर्जामध्ये ' माहिती टपालाव्दारे किंवा व्यक्तिशः आवश्यक आहे किंवा कसे ' या मुद्दयासमोर, संस्थेचा प्रमुख संस्थापक म्हणून विनामूल्य, असे त्यांचे अभिप्राय दिले आहेत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती संस्थेचे सन २००६-२००७ या वर्षाचे लेखा परीक्षण झाल्यावर पुरविण्यात येईल असे आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात, सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडून, अपिलार्थीस दिनांक १४-११-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून या पत्राव्दारे सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांनी अपिलार्थीचे अपील, या प्रकरणी ते जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले गेले नसल्याने त्यांना परत पाठविले.

सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्या पत्राने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज केला त्यावेळी तयार नव्हती त्यामुळे त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संस्थेचे लेखा परीक्षण झाल्यावर माहिती देण्याचे आश्वासीत केले. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे विनामूल्य माहितीची अपेक्षा केली होती त्यामुळे यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर करण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून संस्थेचे प्रमुख संस्थापक म्हणून विनामूल्य माहिती अपेक्षित केल्याचे दिसून येते, जे पूर्णतः चूक आहे. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून संस्थेने श्री. नारायण आहिरे यांना रुपये २,६८,००० इतके पैसे कसे व कोठून दिले ? संस्थेकडे हे पैसे कोठून आले, देणगी असल्यास देणगीदाराचे नांव, सन २००६-२००७ चा लेखा परीक्षण अहवाल ही माहिती मागितली आहे. या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील सन २००६-२००७ चा लेखा परीक्षण अहवाल हा भाग व देणगीदाराचे नाव वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण उर्वरित मुद्यांव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षिले आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट

केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून देणगीदारांची नावे व २००६-२००७ चा लेखा परीक्षण अहवाल या दोन मुद्दयावर माहिती देय आहे. त्यापैकी अपिलार्थीने ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली त्यावेळी २००६-२००७ चे लेखा परीक्षण झाले नव्हते व तसे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविले आहे. त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस देणगीदारांची नावे कळविणे भाग होते. मात्र त्यांनी अपिलार्थीस ही नावे कळविली नसल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज पाहिला असता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे चुकीच्या पध्दतीने प्रथम अर्ज केला आहे. अपिलार्थीने माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना अवलंबविलेली पध्दत चुकीची दिसून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ते संस्थेचे कोणतेही पदाधिकारी असले तरी, त्यांनी विनामूल्य माहिती मिळण्याची मागणी करणे सर्वस्वी चुकीचे आहे. आज रोजी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व तिचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांना देय असलेल्या माहितीशी ती सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांना अद्यापही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाबाबतही असे म्हणता येईल की, या प्रकरणी सहायक धर्मादाय आयुक्त यांचा जन अपिलीय अधिकारी या नात्याने कोणताही संबंध पोहोचत नसतांना देखिल त्यांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागवितांना अशा प्रकारच्या तांत्रिक चूका केल्या असल्याने अपिलार्थीस वरीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण नारायण पाटील, मु. पो. उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था, उंडणगांव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १५५/०८ व १५६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५५ व १५६

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. सुभाष शरद पितांबरे, अपिलार्थी
शिवनगर, रेल्वे गेट जवळ, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रशासकीय अधिकारी, कार्यालय जिल्हा शल्य
चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,
जालना

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने एकाच अर्जावर राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात व औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यालयामध्ये एकाच प्रकारचे दोन वेगवेगळे अपील अर्ज सादर केले आहेत. दोनही

अपिलाशी संबंधित माहितीचा अर्ज एकच असल्याने या दोनही अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २९-०४-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, ते दिनांक २०-१०-२००७ रोजीचा दिलेला तक्रार अर्ज मागे घेत आहेत व याबाबत त्यांचे काहीही म्हणणे नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने दिनांक २०-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने याच मूळ अर्जावर राज्य माहिती आयोगाच्या मुंबई व औरंगाबाद येथील कार्यालयात वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे दोन स्वतंत्र अपिले सादर केली आहेत. आता अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्जच मागे घेतला असल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले तथ्यहीन होत आहेत. सबब ही दोनही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्रमांक १५५/२००८, दिनांक ०८-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १५६/२००८, दिनांक ०७-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुभाष शरद पितांबरे, शिवनगर, रेल्वे गेट जवळ, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, कार्यालय जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५७

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | सौ. ताराबाई शांतीलाल बसैये,<br>जिल्हा परिषद सदस्या (उंडणगाव सर्कल)<br>मु. पो. उंडणगाव, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन अपिलीय अधिकारी | : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : मुख्याध्यापक सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला, उंडणगांव |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थींचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना चौकशी अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी चुकीची व खोटी माहिती दिली असून त्यांना सावित्रीबाई कन्या प्रशाला, उंडणगांव मध्ये बोगस संख्या व नापास केलेल्या मुलींना पास केल्याबद्दल चौकशीनंतर केलेल्या कार्यवाहीची सत्य माहिती हवी आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा विषय, ' परीक्षा न देता (वर्ग ९ वा अ + ब) पास केलेल्या १२ मुलींची माहिती ' हा होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून केले होते. या प्रकरणी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली नव्हती त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे न पाठविता तो शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांनी त्यांना दिनांक १०-१२-२००७ रोजी पत्र देऊन अपिलार्थीस परत काही माहिती पुरविली. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजी प्रथमत: व तदनंतर दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे या प्रकरणाशी संबंधित माहिती दिली असून सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला उंडणगांव यांच्या शाळेसंबंधात त्यांना काही तक्रारी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणात चौकशी करुन या प्रकरणाच्या चौकशीमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या आहेत.

त्रयस्थ पक्ष सौ. ए. ए. जाधव, मुख्याध्यापक यांनी असा युक्तिवाद केला की, सदर माहिती त्यांच्या कार्यालयातील शाळेतील शिक्षक अपिलार्थीमार्फत मागवित असून त्यांना मुख्याध्यापक या पदी नेमणूक हवी होती. मात्र विचाराधीन शाळा ही कन्या प्रशाला असल्याने (मुलींची शाळा असल्यामुळे) या पदावर त्यांची नेमणूक होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलार्थी अशा प्रकारची माहिती श्रीमती बसैये यांच्यामार्फत वारंवार मागवून त्यांना त्रास देत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००७ आणि दिनांक १०-१२-२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी सावित्रीबाई फुले कन्या प्रशाला, उंडणगांव या शाळेची यांची चौकशी करुन या चौकशीमध्ये त्यांना आढळलेल्या त्रुटी मुख्याध्यापकांना कळविल्या व त्या त्रुटी पूर्ततेचा अंतीम अहवाल मुख्याध्यापकाने शिक्षणाधिकारी यांना सादर केला आहे. या सर्व पत्रव्यवहारांच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्या आहेत. अपिलार्थीच्या मते हा अहवाल चुकीचा व खोटा आहे. हा अहवाल चुकीचा व खोटा कसा आहे याचा अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणताही ऊहापोह केला नाही. तसेच आज देखील आयोगाच्या सुनावणीसाठी

हा मुद्दा युक्तिवादाव्दारे स्पष्ट करण्यासाठी ते अनुपस्थित आहेत हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. ताराबाई शांतीलाल बसैये, जिल्हा परिषद सदस्या (उंडणगाव सर्कल) मु. पो. उंडणगाव तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५९

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, अपिलार्थी

गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,

तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याने त्यांनी केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आदेश देऊनही त्यांना कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येईल की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१-०६-२००६ ते १४-०९-२००७ या कालावधीशी संबंधित एकूण तीन मुद्दयासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई अंतर्गत सार्व उपविभागास दिनांक ०१-०६-२००६ ते १४-०९-२००७ या कालावधीमध्ये किरकोळ, हातपावतीवर दिलेली रक्कम, रकमेचे शासकीय आदेश, ती रक्कम देण्यासाठी मंजूर केलेले अंदाजपत्रक व या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून किती कामांचे तुकडे पाडले, तुकडे पाडलेली संख्या, प्रत्येक तुकड्याची किंमत, निविदा क्रमांक, दिनांक तसेच तुकडे पाडण्याचे शासकीय आदेश - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी अधिनियमातील कलम ८ (१) प्रमाणे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-११-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांना रजिस्टर्ड पोस्टाने अचूकपणे विनामूल्य माहिती पुरविण्याचे व टाळाटाळ न

करण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असल्याने व ती माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने त्यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (१) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांची सदरची कृती ही चुकीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक तीनशी संबंधित माहिती निरंक आहे त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक एक व दोन इतकीच माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखासंहितेमधील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित तरतुदींच्या झेरॉक्स प्रती त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५

दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या उपविभागाशी संबंधित असल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे अधिक उचित ठरले असते तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न केल्याने व अपिलार्थीस माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर आता ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६०

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. एच्. एम्. वर्मा, अपिलार्थी

' डेक्कन प्राईड ' अपार्टमेंट फ्लॅट नं. ४, नाथ प्रांगण,

शिवाजीनगर रोड, जानकी हॉटेलसमोर,

गारखेडा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता, नगररचना,

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहायक संचालक, नगररचना,

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडून असंबध्द व दिशाभूल करणा-या परिपत्रकाचा संदर्भ देऊन हवी असलेली माहिती लपविली त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बिल्डर आणि सदनिका खरेदीदार यांचे हक्क, कर्तव्य आणि त्यांच्या आपसातील व्यवहारिक संबंध या विषयावर एकूण दोन मुद्दयाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" (१) इमारतीचा मंजूर नकाशा आणि सविस्तर वर्णन पाहून सदनिका (फ्लॅट) पसंत करुन ती विकत घेण्याचा करार केल्यानंतर / विकत घेतल्यानंतर, सदनिका खरेदीदाराची संमती नसतांना त्यांचा विरोध असतांना, बिल्डरला इमारतीच्या संरचनेत फेरफार किंवा अतिरिक्त बांधकाम करण्याचा अधिकार आहे का ? (२) अशा स्थितीत (फ्लॅट मालकांचा विरोध असतांनाही) नगर रचना कार्यालय, बिल्डरने दाखल केलेल्या सुधारित नकाशाला (Revised Plan) मंजूरी देऊ शकते का ? तसे असेल तर कोणत्या कायद्याच्या कलमान्वये नगर रचना कार्यालयाला हा अधिकार आहे ? (कृपया कायद्यातील कलमाचा उतारा देऊन त्या आधारे पाहिजे असलेली माहिती द्यावी)."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, माहिती अधिका-याकडे उपलब्ध असलेली माहिती मिळण्याकरिता अर्ज करणे या अधिनियमामध्ये अपेक्षित आहे. एखाद्या प्रकरणी एखाद्या मुद्दयावरील मत जाणून घेण्यासाठी अथवा कोणती कार्यवाही केली जाईल याविषयी अर्ज केला असेल तर त्यावर शासकीय माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी यांच्याकडून कार्यवाहीची अपेक्षा करता येणार नाही, असे कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने

अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी आदेश पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीमतः असे नमूद केले आहे की, योग्य त्या पुराव्यासह सुधारित बांधकाम परवानगी प्रकरण निकाली काढण्यापूर्वी लेखी आक्षेप दाखल केल्यास सुधारित बांधकाम परवानगी देतांना त्याची दखल घेणे आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशामध्ये अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात कोणतेही आदेश पारित केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्या युक्तिवादाच्या प्रीत्यर्थ त्यांनी महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम, १९६३ च्या कलम ७ चा आधार घेऊन असे प्रतिपादन केले की, कोणत्याही बांधकाम नकाशास सुधारित परवानगी देतांना त्यांना इमारतीच्या सदनिकाधारकाच्या संमतीशिवाय या इमारतीमध्ये कोणतेही फेरफार करता येणार नाही अथवा भर घालता येणार नाही अशी कायद्याने तरतूद असतांना डेक्कन प्राईड फ्लॅट नं. ४, जानकी हॉटेलसमोर, गारखेडा येथे मात्र संबंधित बिल्डरने अनधिकृत बांधकाम केले आहे व त्या अनधिकृत बांधकामास मनपाने परवानगी दिली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मागणी केलेल्या माहितीव्दारे अपिलार्थीस त्यांचे मत अपेक्षित आहे. अशा प्रकारचे मत देण्याची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदीमध्ये अभिप्रेत नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, विकास नियंत्रण नियमावली-नुसार नियम क्रमांक ६.२.२ मध्ये मालकी हक्काची अधिकृत कागदपत्रे स्पष्ट केली आहेत आणि बांधकाम परवानगी देतांना ही कागदपत्रे तपासण्यात येतात व मूळात या प्रकरणी अपिलार्थीची ही मालकी असल्याचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता संबंधित बिल्डरने केल्याने त्यांनी या बांधकामास परवानगी दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. कलम २ (च) मध्ये " माहिती " या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहे.

कलम २ (च)

" "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो."

या व्याख्येचे अवलोकन करता माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच त्यांनी अर्जदारास पुरविणे अभिप्रेत असल्याचे दिसून येते. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे मत अथवा अभिप्राय, कारणे, खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागविणे मूळात अभिप्रेत नाही त्यामुळे याबाबत

अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अवैध ठरत आहे व परिणामी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

एवढे जरी असले तरी अपिलार्थीच्या यासंदर्भात मूळ तक्रारीचा विचार करता असे आढळून येते की, औरंगाबाद महानगरपालिकेने बांधकाम परवागनी देण्यासाठी केलेले नियम व महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत अधिनियम १९६३ यांची एखाद्या पातळीवर सांगड घालणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. ही सांगड घातल्यास अपिलार्थी ज्या प्रकारची तक्रार या प्रकरणी करत आहेत अशा प्रकारच्या तक्रारींना भविष्यात वाव राहणार नाही. या बाबी लक्षात घेऊन अपिलार्थीस त्यांच्या प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका किंवा इतर तत्सम प्राधिकरणा-कडे वेगळ्याने तक्रार दाखल करावी लागेल. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांनी या प्रकरणी अपिलार्थीने संदर्भित केलेल्या बांधकामाच्या संदर्भात सखोल चौकशी करणे आवश्यक राहिल असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या बांधकामास सुधारित बांधकाम परवानगी देतांना त्यांच्या कार्यालयामार्फत कोणकोणत्या मुद्दयावर तपासणी झाली त्या चेकलीस्टची प्रत अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थीच्या मनातील शंका दूर होण्यास मदत होईल असे आयोगास वाटते त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या बांधकामास सुधारित परवानगी देतांना तयार केलेल्या चेकलीस्टची एक प्रत त्वरित व विनामूल्य पुरवावी असे त्यांना माहिती प्राप्त होण्यासाठी मदत करण्याच्या दृष्टीने सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१.	अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	०५-०५-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. एच्. एम्. वर्मा, ' डेक्कन प्राईड ' अपार्टमेंट फ्लॅट नं. ४, नाथ प्रांगण, शिवाजीनगर रोड, जानकी हॉटेलसमोर, गारखेडा, औरंगाबाद.

२	जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगररचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६१

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. दिपक विठ्ठलराव भुसारे, अपिलार्थी
मु. वाघला, पो. पोखरी, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाघला,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी पत्र न पाठविल्यामुळे त्यांच्या प्रथम अपील अर्जावर

सुनावणी झाली नाही व त्यावर कोणतेही आदेश प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, वाघला ग्रामपंचायतने सन २००१ ते २००६ या कालावधीमध्ये ज्या शासकीय योजना राबविल्या त्या योजनाकरिता शासनाने दिलेला निधी, खर्च झालेला निधी व योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी, ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले. सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी असे दिले आहे की, त्यांच्या पूर्वीच्या कर्मचा-याने त्यांना चार्ज न दिल्यामुळे ते ती माहिती पुरवू शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०७-०२-२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत करुन प्राप्त माहितीवर त्यांचे असे अभिप्राय व्यक्त केले की, त्यांना प्राप्त झालेली ही माहिती अपूर्ण आहे कारण या माहितीमध्ये लाभार्थ्यांच्या यादीचा समावेश नाही. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी याच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्रावर आक्षेप घेऊन, जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी माहिती उपलब्ध नव्हती तर ती त्यांनी दिनांक ०७-०२-२००८ ला

अपिलार्थीस कशी दिली असा प्रश्न उपस्थित केला आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अपिलार्थीचा अर्ज आल्यानंतर त्यांना संबंधित ग्रामसेवक श्री. भालेराव यांच्याकडून ब-याच उशीराने अभिलेखे हस्तांतरीत केले गेले आहेत. या अभिलेख्याच्या आधारे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००८ रोजी माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पंचायत समिती स्तरावर उपलब्ध असते कारण या योजनेमध्ये लाभार्थ्यांचा समावेश असतो, अशा प्रकारच्या योजना पंचायत समिती स्तरावरुन राबविल्या जातात. तथापि आता आवश्यक ती माहिती पंचायत समितीकडून प्राप्त करुन घेऊन ते ती अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील संपूर्ण घटनाक्रमामध्ये ग्रामपंचायत वाघला येथील तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. भालेराव यांनी या प्रकरणी सध्याचे कार्यरत असलेले ग्रामसेवक यांना विलंबाने कार्यभार हस्तांतरीत केल्याने सध्याचे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. अशा प्रकारे श्री. भालेराव यांनी त्यांचा कार्यभार बदली झाल्यानंतर मुदतीत हस्तांतरीत न करता दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व याचबरोबर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची दखल न घेता कोणताही निर्णय न देऊन तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर श्री. सुर्यवंशी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यपध्दतीची नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. भालेराव) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करावी.

औरंगाबाद

दिनांक ०५-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिपक विठ्ठलराव भुसारे, मु. वाघला, पो. पोखरी, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाघला, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६२

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड, अपिलार्थी
विष्णूनगर, आकाशवाणीच्या पाठीमागे,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०५-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपिलाशी संबंधित माहितीची त्यांना

आवश्यकता नाही, सदर माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने अशा प्रकारची विनंती आयोगास केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक १६२/२००८, दिनांक २९-०१-२००८ हे खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १६२/२००८, दिनांक २९-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०५-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राधाकृष्ण राजाराम गायकवाड, विष्णूनगर, आकाशवाणीच्या पाठीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४१

निर्णय दिनांक ०५-०५-२००९

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, अपिलार्थी
मु. बाबरगांव, पो. पेंडापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र. वि.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र. वि.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेशित करुनही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. माहिती देण्यासाठी टाळाटाळ व विलंब केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे दंडात्मक कारवाई व्हावी व तसेच अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे त्यांना तात्काळ सर्व माहिती मोफत पुरविण्याचे आदेशित करावे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशीही विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर माहिती पुरविली नाही, माहिती दडवून ठेवली, सेवाविषयक गंभीर प्रकरणात सुध्दा माहिती अधिका-याने निष्काळजीपणा केला त्यामुळे त्यांचे अनेक प्रकारे आर्थिक व मानसिक नुकसान झाले असल्याने अपिलार्थी नुकसानभरपाईस पात्र आहे त्यामुळे कायद्यातील तरतुदीप्रमाणे त्यांना नुकसानभरपाई मिळण्याचे देखील आदेश पारित करावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-११-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-२००५ ते १६-११-२००७ या कालावधीशी संबंधित ' आस्थापना विभागाकडून सेवापुस्तक गहाळ झाल्याबाबत ' या विषयावर एकूण १४ मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक १५-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या प्रतींच्या संदर्भात रुपये ६० इतके शुल्क शासकीय कोषागारात चलनाव्दारे जमा करण्याचे सूचित केले. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४-०१-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी

अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली. तथापि अपिलीय अधिका-यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे पदवीधर प्राथमिक शिक्षक असून प्राथमिक शाळा बाबरगांव येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. अपिलार्थीचे सेवापुस्तक गहाळ झाले असल्याकारणाने जिल्हा परिषदेतर्फे चौकशी केली असता अपिलार्थीची मूळ सेवापुस्तिका व सेवापुस्तिकेची दुसरी प्रत दिनांक १६-१०-२००४ रोजी मुख्याध्यापक, मुलींची केंद्रीय प्राथमिक शाळा, गंगापूर यांच्याकडून त्यांनी हस्तगत केल्याचे आढळले व या प्रकरणाची चौकशी करता यामध्ये अपिलार्थी हे दोषी आढळून आल्याने त्यांना आता जिल्हा परिषदेच्या दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली असून ती माहिती अपिलार्थीस दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०१-२००८ रोजी माहिती पुरविली असून ही माहिती अपिलार्थीस दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्राप्त झाली आहे. ती अपिलार्थीस त्यांनी, आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त

झाली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत तसेच त्यांनी त्यांचा प्राप्त माहितीवरील लेखी युक्तिवाद आयोगास अद्यापपावेतो न पाठविल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती त्यांना मान्य असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही असद्‌हेतूने टाळाटाळ केल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे आयोग जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई आदेशित करत नाही. अपिलार्थीने त्यांना या प्रकरणी झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासाबाबत राज्य माहिती आयोगाकडे नुकसानभरपाई मागितली आहे. तथापि त्यांच्या या दाव्याप्रीत्यर्थ त्यांनी कोणताही वैध पुरावा आयोगाकडे सादर केलेला नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०५-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, मु. बाबरगांव, पो. पेंडापूर, व्हाया वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६३

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. माधवराव भगवानराव कुलकर्णी, अपिलार्थी
मु. हिस्सि, पो. गुगळी धामणगांव, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे प्रथम

अपील केले असता त्यांनी या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ते स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचा वैध पुरावा सादर करण्याचे सूचित केले व याचबरोबर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठीच्या एका प्रतीचे दोन रुपयाप्रमाणे जी रक्कम होईल ती रक्कम चलनाव्दारे भरल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात येईल असे आश्वासीत केले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तसेच यासंदर्भात अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याबाबतचा कोणताही वैध पुरावा जन माहिती अधिकारी आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०९-२००७ रोजी सुनावणी घेऊन दिनांक १७-०९-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना तोंडी सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी तोंडी सूचित केल्याचे सुनावणीच्या इतिवृत्तावरुन दिसून येते. यानंतर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दिनांक २३-११-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता ती

माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने अमान्य केले असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे तर जन माहिती अधिकारी यांचा कोणताही प्रतिनिधी अद्याप त्यांना भेटला नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना सदर माहितीची आवश्यकता असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी व आवश्यक ती माहिती पोस्टाव्दारे विनामूल्य मिळावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक ०६-०९-२००७ च्या सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे त्यांनी दिनांक २३-११-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांच्या प्रतिनिधीमार्फत देऊ केली होती. तथापि अपिलार्थी यांनी ती माहिती स्वीकारण्यास नकार दिला. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ सदर माहिती घेऊन जाणारे त्यांच्या कार्यालयातील शिपाई श्री. आर. जी. कुलकर्णी यांच्या प्रवासभत्त्याच्या बिलाची प्रत त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०७-२००७ च्या पत्राव्दारे जरी प्रतिसाद दिला असला तरी हा प्रतिसाद वैध नाही कारण या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क, व अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या संभाव्य माहितीच्या पृष्ठांची संख्या याचा तपशील, जो माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे आवश्यक होते, तो दिलेला नाही. तसेच

त्यांनी या पत्राव्दारे अपिलार्थी हे स्वातंत्र्य सैनिक असल्याचा वैध पुरावा त्यांच्याकडे मागितला आहे. अपिलार्थी हे समाजातील कोणत्याही स्तरातील व्यक्ती असले आणि त्यांनी अर्जामध्ये त्यांच्या नामाभिमान अथवा हुद्दयाचा उल्लेख केला असला तरी याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे पुरावा मागण्याचे कोणतेही कारण नव्हते, कारण ही बाब माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्ज करतांना विचारात घेतली जात नाही. अधिनियमातील कलम ३ प्रमाणे प्रत्येक भारतीय नागरिकास अशा प्रकारे माहिती मागण्याचा हक्क आहे.

अपिलार्थीच्या दिनांक २३-०८-२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०९-२००७ रोजी सुनावणी घेतली, तथापि त्यावर कोणताही आदेश पारित केला नाही. त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे आदेश पारित करावेत व त्याची प्रत अपिलार्थी आणि इतर सर्व संबंधितांना देण्यात यावी. या प्रकरणी अशा प्रकारे आदेश जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिल्या न जाता त्यांनी फक्त सुनावणीचे इतिवृत्त त्यांच्या कार्यालयात नोंदविल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलावर निर्णय देण्याची अशा प्रकारची कृती सर्वथा चुकीची आहे.

जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २३-११-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती देऊ केली असता अपिलार्थीने ती स्वीकारली नाही व त्यांच्या या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी ही माहिती अपिलार्थीकडे घेऊन गेलेल्या शिपायाच्या प्रवासभत्ता बिलाची प्रत सादर केली आहे. तथापि यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील शिपाई अपिलार्थीकडे गेला व त्यांनी अपिलार्थीस माहिती देऊ केली हे सिध्द होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने माहिती मागितली असता ही माहिती कार्यालयातील शिपायाव्दारे त्यांच्याकडे पाठविण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते. संबंधित शिपायाने याबाबतचा पंचनामा देखील केलेला नाही. त्यामुळे वैध पुराव्याअभावी, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-११-२००७ रोजी माहिती देऊ केली होती, मात्र ती अपिलार्थीने स्वीकारली नाही, हा युक्तिवाद आयोग ग्राह्य धरत नाही. या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसाच्या आत न कळवून अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०९-२००७ पर्यंत अपिलार्थीस माहिती पुरविण्यात येईल असे आश्वासत करुनही अपिलार्थीस मात्र प्रत्यक्षत: दिनांक २३-११-२००७ रोजी माहिती देऊ केली.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आपले कर्तव्य विहित मुदतीत व योग्य प्रकारे पार न पाडून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त (कृषि), पुणे, यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त (कृषि), पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा-नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माधवराव भगवानराव कुलकर्णी, मु. हिस्सि, पो. गुगळी धामणगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे - ०५ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६४

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. चामे अंकुश रामचंद्र अपिलार्थी
मु. पो. चिखली, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्रीनिवास निवासी मतिमंद विद्यालय,
औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे केलेले आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित व त्रयस्थ पक्ष श्रीमती मुद्रिका विश्वनाथ शिंगडे यांच्यासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-१०-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे संबंधित संस्थेला सूचित केले. मात्र या मुदतीत अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास पाठविला आहे. यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी यांना २५,००० रुपये दंड लावण्यात यावा, त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी व त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळेस ते अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्याकरिता सोबत घेऊन गेले होते. तथापि अपिलार्थी हे त्यावेळी उपस्थित न राहिल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही. अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता त्यावेळी या माहिती संबंधीचे अभिलेखे हे मा. न्यायालयाकडे दाखल केले असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत

पुरविता आली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी घेऊन गेले होते. अपिलार्थीस स्वतः ही माहिती पाहण्याची इच्छा असल्याने त्यांनी ही त्यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती अपिलार्थीस आठ दिवसामध्ये विनामूल्य देण्यास ते तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याने अपिलार्थीस आयोगाकडे सदर अपील दाखल करण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते व मूळात ही माहिती अपिलार्थीस दाखविण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन दिली त्यावेळी सुध्दा अपिलार्थी हे ती माहिती पाहण्यासाठी उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्यावर केलेले आरोप निरर्थक आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती व ती माहिती न्यायालयाकडे त्यांनी पाठविली होती तर अशा वेळी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज मा. न्यायालयाकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना भाग होते. अथवा न्यायालयामध्ये दाखल केलेले संबंधित अभिलेखे तात्पुरते परत मागवून त्यातून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अपिलार्थीस पुरविणे सहज शक्य होते. तथापि त्यांनी अशा प्रकारे कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये ही माहिती त्यांच्यासोबत घेऊन गेले. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात प्रतिसाद दिला असून माहिती देण्यासाठी

त्यांना असद्हेतूने टाळले अथवा अपिलार्थीपासून दुष्टहेतूने माहिती दडविल्याचे सिध्द होत नाही. मात्र अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जास प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००७ रोजीच्या अर्जास विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देण्याची चूक त्यांच्या हातून झाल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ ची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाच्या मराठवाडा ग्रामीण बँक, औसा शाखा येथील चेकबुक व पासबुक याची मागणी केली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशा प्रकारे त्रयस्थ पक्षाच्या माहितीच्या कागदपत्राचे मूळ स्वरुपात हस्तांतरण त्रयस्थ पक्षाच्या परवानगीशिवाय करणे अनुज्ञेय नाही. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देय होत आहे. त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व या अपील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चामे अंकुश रामचंद्र मु. पो. चिखली, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीनिवास निवासी मतिमंद विद्यालय, औसा, तालुका औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६८

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. तुळशीराम सांडु पुंगळे हिवरेकर, अपिलार्थी
मु. पो. हिवरा (राळा), तालुका बदनापूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, जालना (दक्षिण)

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले असल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०७-०२-२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून

या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती मिळाली आहे व मिळालेल्या माहितीने त्यांचे समाधान झालेले असून त्यांची याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी त्यांचे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीस या प्रकरणी जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असली तरी ती विलंबाने प्राप्त झाल्याचे व त्याचबरोबर अपिलार्थीच्या दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याचे देखील येथे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त झाली असल्याने व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे अथवा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्राचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०६-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तुळशीराम सांडु पुंगळे हिवरेकर, मु. पो. हिवरा (राळा), तालुका बदनापूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, जालना (दक्षिण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (रोहयो), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४८

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ सौ. कौशल्या विश्वनाथराव नाईकवाडे, अपिलार्थी

रा. पालम, जिल्हा परभणी

सध्या रा. विष्णूपूरी बिल्डींग, स्नेहनगर, श्रीनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पालम,

तालुका पालम, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,

तालुका पालम, जिल्हा परभणी

त्रयस्थ पक्ष : श्री. मारुती पंडितराव नाईकवाडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती एकूण तीन मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मारोती पंडितराव नाईकवाडे यांचे ग्रामपंचायत रजिस्टरला लावलेले घर क्रमांक १९६४/२ हे कधी, कोणी व कोणत्या ठरावाव्दारे लावण्यात आले याची माहिती, घर नावे लावण्यासाठी जाहीर प्रगटन करणे आवश्यक होते काय ? व नमुना नंबर ८ कोणत्या कागदपत्राचे आधारे दिला त्याची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी आयोगाकडे लेखी युक्तिवाद सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थीच्या पतीचा भाऊ पंडित नाईकवाडे यांनी ग्रामपंचायत सदस्य म्हणून धारण केलेल्या पदाच्या आधारे अपिलार्थीच्या मालकीच्या घरावर स्वतःच्या मुलाचे नाव लावले आहे म्हणजे अशा प्रकारे त्यांच्या मालकीचे घर स्वतःच्या मुलाच्या नावावर करुन त्यांचा विश्वासघात केला आहे. स्वतःच्या मालकीच्या घरावर हक्क प्रस्थापित करण्यासाठी अपिलार्थीस स्वतःचे नाव लावून हवे आहे.

त्यामुळे त्यांनी मालकी हक्कात झालेल्या बदलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. परंतु ही माहिती त्यांना ग्रामसेवक व गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी दिली नाही त्यांच्या अर्जावर अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती पुरविली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीच्या मुलाला दिली असून या मुलाची सही त्यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रावर घेतली आहे. अपिलार्थीच्या मूळ प्रश्नाबाबत त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ मालकी हक्कात फेर क्रमांक २३८७ व ठराव क्रमांक ९ च्या आधारे दिनांक १७-०३-२००९ रोजी बदल केला गेला असून सदर ठरावाची नक्कल व फेरची नक्कल, तत्कालीन ग्रामसेवकाचे व त्यांच्यानंतर कार्यरत झालेले ग्रामसेवक या दोघांचेही आता निधन झाले असल्याने, त्यांच्याकडील माहिती ज्या कपाटामध्ये ते ठेवत असत ती कपाटे पंचाच्या समक्ष फोडले असता, त्यामध्ये देखील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना आढळून आली नाही. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या मालकी हक्काच्या बदलाची नोंद नमुना नंबर ८ मध्ये आता घेण्यास ते तयार आहेत. ती नोंद त्यांच्याकडे खरेदीखताची अथवा वाटणीची प्रत सादर केल्यानंतर ते करुन देतील.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी सकृतदर्शनी अपिलार्थी यांच्या म्हणण्यामध्ये तथ्यांश असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मालमत्ता क्रमांक १९६४/०२ मधील झालेला बदल कोणत्या कागदपत्रांच्या आधारे केला आहे त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. संदर्भिय मालमत्तेच्या हक्कामध्ये फेर क्रमांक २३८७ व ग्रामपंचायतचा ठराव क्रमांक ९, दिनांक १७-०३-२००९ रोजीच्या पत्राच्या आधारे केल्याचे दिसून येत आहे. मात्र या दोनही कागदपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता उपलब्ध नाहीत कारण त्यांना या प्रती त्यांच्याकडे पूर्वीच्या ग्रामसेवकाकडून प्राप्त झाल्या

नाहीत तसेच त्यांच्या पूर्वीचे दोनही ग्रामसेवकांचे आता निधन झाले असल्याने या प्रती आता उपलब्ध होऊ शकणार नाहीत. सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने मालमत्ता क्रमांक १९६४/०२ च्या मालकी हक्कासंदर्भात अर्ज केल्यास त्यावर त्यांनी प्रचलीत नियमाप्रमाणे यथायोग्य कार्यवाही करुन अपिलार्थीच्या अर्जावर योग्य तो निर्णय घ्यावा. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आयोगाच्या समक्ष हस्तांतरीत केली आहेत. त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती न देता अपिलार्थीच्या मुलास माहिती दिली असा युक्तिवाद आयोगासमोर केला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे याप्रीत्यर्थ सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन करता दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेली सही ही त्यांच्या मुलाची नसल्याचे अपिलार्थीने आयोगास स्पष्ट केले. तसेच अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या पत्राच्या झेरॉक्स प्रतीचे अवलोकन करता या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जावक क्रमांकाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०३-०७-२००७ रोजीचे कथित पत्र आयोग अवैध ठरवित आहे. आयोगाकडे अशा प्रकारे अवैध कागदपत्रे तयार करुन स्वतःच्या बचावाप्रीत्यर्थ सादर करुन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील नितांत सचोटीचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. कौशल्या विश्वनाथराव नाईकवाडे, रा. पालम, जिल्हा परभणी सध्या रा. विष्णूपूरी बिल्डींग, स्नेहनगर, श्रीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३५

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,

सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,

नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००७ रोजी शीघ्र पोस्टाने पाठविली असून ही माहिती अपिलार्थीस दिनांक २२-०७-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाल्याची त्यांच्या पोच पावतीची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. सदर पत्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक ३०-०४-२००९ रोजी लिहिले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊनही त्याचा उल्लेख अथवा प्राप्त माहितीच्या दर्जावर त्यांचे कोणतेही अभिप्राय राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नोंदविले नसल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याने अपिलार्थीचे

विचाराधीन व्दितीय अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३६

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणतीही विशिष्ट विनंती केली नसून जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची नावे, पदनामे व त्यांच्या कार्यक्षेत्रातील उपविभागीय कार्यालयाची नावे व पत्ते याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १३-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४ इतके त्यांच्या कार्यालयात त्यांना भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४ इतके दिनांक ०५-०९-२००७ रोजी भरुन आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेतली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पुराव्यावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत.

अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांचे कोणतेही अभिप्राय नोंदविले नाहीत. या सर्व बाबी लक्षात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३७

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित उपविभाग, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे कोणत्याही विशिष्ट प्रकारची विनंती केली नसून आपल्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट व माहूर तालुक्यात कार्यरत असलेल्या स्टोन क्रेशरची माहिती स्टोन क्रेशरच्या नावागावासहीत व तालुक्यासहीत संपूर्ण माहिती तसेच प्रत्येक स्टोन क्रेशरवर असलेल्या विद्युत मोटारी संदर्भात त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध असलेली काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २५ /- इतके भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली हीच माहिती त्यांना दिनांक २९-०२-२००८ रोजी त्यांनी दिनांक ०८-०२-२००८ रोजी त्यांच्याकडे अर्ज केल्यानंतर त्यांना पुरविण्यात आली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे दिनांक २६-०७-२००७ रोजीचे कथित प्रथम अपील त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊ शकले नाहीत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक २६-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलाची झेरॉक्स प्रत आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडली आहे. तथापि या प्रतीवर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाचा शिक्का अथवा संबंधित लिपिकाची सही नाही. हा अपील अर्ज अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी आवश्यक तो पुरावा यासोबत आयोगाकडे सादर केलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली हीच माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी अपिलार्थीस दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या अर्जासंदर्भात पुरविली आहे व याची आयोगाने खातरजमा करुन घेतली आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे लक्षात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित उपविभाग, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३८

निर्णय दिनांक ०६-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सहायक अभियंता कार्यालयाची नावे, पत्ते व माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांची नावे, पत्ते ही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ०४-०६-२००७ रोजीचा व दिनांक ०९-०७-२००७ रोजीचे अनुक्रमे प्रथम अर्ज व प्रथम अपील त्यांना मूळात प्राप्त झाले नाहीत. अपिलार्थीने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना आयोगाच्या नोटिशीसोबत देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन प्रथमतः ज्ञात झाली. यावरुन त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००९ रोजी आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांना पुरविली असल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना अनुक्रमे

माहितीसाठीचा व अपील अर्ज पाठविल्याप्रीत्यर्थ पोस्टाच्या पावतीची झेरॉक्स प्रत सादर केली आहे. तथापि ती झेरॉक्स प्रत साक्षांकीत नाही. ती झेरॉक्स प्रत सत्यप्रत असल्याबाबत कोणीही साक्षांकीत केलेली नाही हे पाहता, आवश्यक त्या वैध पुराव्याअभावी जन माहिति व अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. त्याचबरोबर आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजेच आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर संपूर्ण माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५४
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. भास्कर देवराव येवले, : अपिलार्थी
मु.पो.ता.राहुरी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
राहुरी नगर पालिका,राहुरी,जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, राहुरी,
जि.अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक,
नगर परिषद, राहुरी,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न दिल्याने व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.०८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती रजिस्टर्ड टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जावर त्यांनी केलेली कारवाई व महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६८ चे कलम २२९ नुसार केलेली कार्यवाही - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०७.११.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १५.१०.२००८ रोजी पूर्णतया माहिती दिली असून अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीचा तपशील व महाराष्ट्र नगरपरिषद,अधिनियम १९६५ च्या कलम २२९ नुसार करण्यात येत असलेली कार्यवाही देखील त्यांनी अपिलार्थीस अवगत केली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही टाळाटाळ केली नाही. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती अधिकाराखाली कायम अर्ज करीत असतात, आतापर्यंत त्यांच्या १२ ते १५ अर्जांना प्रतिसाद म्हणून त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या निवासस्थानाच्या पाण्याच्या टाकीमध्ये नजिकच्या भूखंडातील चिंच आणि बोरीच्या झाडांचा पालापाचोळा पडल्यामुळे व ते पाणी दुषित होत असल्यामुळे त्या झाडाच्या फांद्या तोडून टाकण्याची अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विनंती केली होती. त्याप्रमाणे नगरपरिषदेचे कर्मचारी फांद्या तोडण्यास गेले असता, दुसऱ्या ग्रामस्थांनी यास विरोध केल्यामुळे नगरपरिषदेतर्फे या झाडाच्या फांद्या तोडल्या जाऊ शकल्या नाहीत. या सर्व प्रकरणामध्ये हे झाड ज्या जमिनीमध्ये आहे, ती जमीन जलसंपदा खात्याची असल्याचे नगरपालिकेच्या निदर्शनास आले. तथापि या बाबतचा कोणताही सबळ पुरावा त्यांच्याकडे नसल्याने ते जलसंपदा खात्याकडे विचारणा करण्यासाठी गेले असता, जलसंपदा खात्याने त्यांना, या बांधकामाची हद्द निश्चित करण्याचे काम त्यांच्या विभागाकडून केले गेले असल्याचे सांगण्यात आले. या सर्व बाबी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या आहेत. अपिलार्थीच्या दि. ०८.०९.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देण्याकरिता एकूण ५ दिवसांचा विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे केले आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध नसल्याने त्यांना ही माहिती संबंधितांकडून प्राप्त होण्यामध्ये व या कालावधीमध्ये दोन सार्वजनिक सुटया असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यास थोडा विलंब लागला, परंतु अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी कधीही नाकारले नाही. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत कोणत्याही अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यासाठी जो कालावधी अधिनियमातील तरतुदीद्वारे निश्चित केला गेला आहे, त्या कालावधीमध्ये सार्वजनिक सुटयांचाही समावेश आहे. इत:पर अर्जदारास माहिती देताना, सार्वजनिक सुटया, अर्जदारास माहिती देय असणाऱ्या कालावधीमधून वगळू नयेत, याची जन माहिती अधिकारी यांनी यथायोग्यरित्या नोंद

घ्यावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने, माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे जे सहायक जबाबदार आहेत, त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर अशा प्रसंगांची पुनरावृत्ती होणार नाही, याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाल्याचे म्हटले आहे, त्यांचे म्हणणे या प्रकरणी सिध्द होत आहे, मात्र त्यांना आता जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली असल्याने व या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे निदर्शनास न आल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती पुरविली असल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांच्या या प्रकरणाशी संबंधित सहायकाना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर देवराव येवले,मल्हारवाडी रोड,मु.पो.ता.राहुरी, जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,नगर परिषद, राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, राहुरी,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५५
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. हरीश रमेश छजलाणी, : अपिलार्थी
रा.हरीमळा,दरेवाडी, सोलापूर रोड,अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शासकीय जिल्हा रुग्णालय,
अहमदनगर,जि.अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा शल्य चिकित्सक,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजणअनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून जाणूनबुजून वंचित ठेवून माहिती उपलब्ध होण्यासाठी अडथळा निर्माण केला आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करावी व त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येऊन जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासापोटी रु. २५,०००/- नुकसान भरपाई देण्याचे आयोगाने आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.१७.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांची आजी कै. जमुनाबाई गिरीधारीलाल छजलानी, सेवानिवृत्त सफाईकामगार, जिल्हा रुग्णालय यांच्यासंदर्भात एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कै.जमनाबाई गिरीधारीलाल छजलानी या सफाई कामगार म्हणून नोकरीत रुजू झाल्याची तारीख, त्यांच्या नियमित सेवानिवृत्तीची तारीख,प्रॉव्हीडंड फंड खाते क्रमांक, सदर फंडामध्ये दरमहा जमा होणारी रक्कम व या रकमेवरील व्याजदर व दि.३१.०३.१९९९ अखेर सदर फंडामध्ये एकूण जमा झालेली व शिल्लक असलेली रक्कम, शासनाकडून त्यांना देय होणारी विमा रक्कम, निवृत्तीनंतर त्यांना मिळणाऱ्या ग्रॅच्युईटी रकमांचा तपशील त्यांना देय होणाऱ्या घरभाडे भत्ता व इतर भत्त्याच्या फरकाची रक्कम व त्यांच्या शिल्लक रजेचा तपशील -या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला कोणताही निर्णय पारित केला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीची पूर्वकल्पना सर्व संबंधितांना आयोगाकडील दि.२९.०४.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनीद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. साठे, सहायक अधीक्षक,जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांना व अपिलार्थीचे वकील श्री.गांधी यांना दि.०४.०५.२००९ रोजी ठीक ०३.३५ वा.कल्पना देऊनही जन

माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी सुनावणीसाठी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आयोगास उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थपक्षाच्या सेवानिवृत्तीच्या अनुषंगाने काही माहिती मागितली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस पुरविली नाही. अपिलार्थीने जरी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती मागितली असली तरी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाईची शासनाकडे शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.या कालावधीत त्यांचा कोणताही खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाईची शासनाकडे शिफारस का करण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरीश रमेश छजलाणी,रा.हरीमळा,दरेवाडी, सोलापूर रोड,अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी, शासकीय जिल्हा रुग्णालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकित्सक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५६
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. मधुकर रामभाऊ कोरडे, : अपिलार्थी
रा.कोरडेवस्ती,मिरजगाव, ता.कर्जत, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा कृषि अधीक्षक,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय कृषि सहसंचालक,पुणे
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि उपसंचालक,अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना राज्य माहिती आयोग, औरंगाबाद यांनी दि. ०३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिदिनी रु.२५०/-प्रमाणे रु.२५,०००/- दंड केला होता, मात्र ही रक्कम जिल्हा कोषागारात संबंधिताने भरलेली नाही. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास विशेष अशा स्वरुपाची कोणतीही विनंती केली नसल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.०६.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे राज्य माहिती आयोगाच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पारित केलेल्या दि.१९.१०.२००७ रोजीच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी शास्तीची रक्कम जिल्हा कोषागारात भरली आहे किंवा कसे याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०५.२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अद्यापपर्यंत श्री. निंबाळकर, तत्कालीन तालुका कृषि अधिकारी,कर्जत यांनी चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. ०६.०६.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १६.०९.२००८ रोजीच्या पत्राद्वारे उत्तर देऊन अपिलार्थीस या प्रकरणाची तत्कालीन स्थिती अवगत केली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय पारित केला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने, राज्य माहिती आयोगाने आदेशित करुनही तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, कर्जत जि.अहमदनगर श्री. निंबाळकर यांनी शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात जमा केली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविल्याची कार्यवाही केली असल्याचा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूलतः त्यांच्या अर्जामध्ये

मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०५.२००८ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमापुरते या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. एवढे जरी असले तरी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जो विषय आयोगाच्या निदर्शनास आणला आहे, त्या विषयाकडे आयोगास दुर्लक्ष करता येणार नाही. अपिलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, आयोगाने ज्यावेळी शास्तीचे आदेश दिले, त्यावेळी श्री. निंबाळकर हे, तालुका कृषि अधिकारी,कर्जत या पदावर कार्यरत होते. त्यांची बदली आता कृषि संचालक,दक्षता पथक यांच्या कार्यालयात झाली असून त्यांनी शासकीय कोषागारात शास्तीची रक्कम भरणा करण्यासंदर्भात या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय यांच्या कार्यालयाने कृषि आयुक्तालयाच्या संचालक (दक्षता पथक) यांना देखील विचारले आहे. तथापि श्री. निंबाळकर यांच्यावर रु.२५०००/- शास्ती लावल्याच्या आदेशावर निश्चितपणे केलेली कार्यवाही आता आयोगास ज्ञात होऊ शकत नाही, ही बाब आयोगाने गांभीर्याने घेतली असून सचिव (कृषि), मंत्रालय यांना असे सूचित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी श्री. निंबाळकर तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, कर्जत, जिल्हा अहमदनगर (सध्या कृषि संचालक, दक्षता पथक येथे कार्यरत) यांच्याकडून सदर शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये राज्य माहिती आयोगाच्या दि. १९.१०.२००७ रोजीच्या आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत भरली जाईल, असे पहावे.

विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सचिव (कृषि), मंत्रालय यांनी श्री. निंबाळकर, तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, कर्जत जिल्हा अहमदनगर (सध्या कृषि संचालक, दक्षता पथक येथे कार्यरत) यांच्याकडून आयोगाने दि.०३.११.२००७ रोजी आदेशित केल्याप्रमाणे शास्तीची रक्कम शासकीय कोषागारामध्ये हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याच्या आत भरली जाईल, असे पहावे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मधुकर रामभाऊ कोरडे,रा.कोरडेवस्ती,मिरजगाव ता.कर्जत जि.नाशिक.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि उपसंचालक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय कृषि सहसंचालक,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (कृषि), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५७
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५७
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. गजानन विष्णू लोंढे, : अपिलार्थी
रा.ढोरजळगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अध्यक्ष,
मजले चिंचोली ग्रामसेवा मंडळ, मजले चिंचोली
ता.जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
मजले चिंचोली ग्रामसेवा मंडळ, मजले चिंचोली
ता.जि.अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सचिव,
मजले चिंचोली ग्रामसेवा मंडळ, मजले चिंचोली
ता.जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.०७.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्या अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही दखल न घेतल्याने, कोणतेही उत्तर न पाठविल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती प्राप्त व्हावी व रु.२०००/- इतकी नुकसान भरपाई मिळावी, अशी आयोगाकडे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.२०.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेने दि. २२.१०.२००७ रोजी बी.एस्सी,बी.एड्. सहशिक्षक या पदासाठी घेतलेल्या मुलाखती व नेमणूकासंदर्भात निवड समितीबाबत,संस्थेच्या बँक खात्याच्या सर्व पासबुकांच्या प्रती व संस्थेच्या मासिक, वार्षिक सभा आणि बैठकीच्या इतिवृत्ताच्या झेरॉक्स प्रतींची मागणी केली होती. अपिलार्थीने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २१.०२.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविला होता. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिला गेल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. संस्थेच्या सचिवांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज प्राप्त झाला नसल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी त्यांच्या संस्थेकडे केली आहे तिची कल्पना त्यांना आयोगाकडून आज रोजीच्या सुनावणीस उपस्थित

राहण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या नोटीससोबतच्या प्रतीवरुन आली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीचे तीस दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, संस्थेच्या सचिवांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज दि. २१.०२.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविला असल्याचा पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता हे सिध्द होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही, या युक्तिवादास फारसा मोठा आधार राहत नाही. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते ३० दिवसांच्या आत अपिलार्थीस देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने संस्थेकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाबाबतचा कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी प्रथम अपील अर्ज केला होता किंवा कसे या शंकेस वाव देण्यासाठी भरपूर वाव राहत आहे.या शंकेचे निरसन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ७ मुद्यांद्वारे काही माहिती अपेक्षित केली आहे. या ७ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ अंशतः व मुद्दा क्र.२ अंशतः ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मुद्दा क्र.१ मधील, 'उमेदवारांची निवड केली आहे काय', व मुद्दा क्र. २ मधील 'मुलाखती घेण्यासाठी सक्षम निवड समिती होती काय', या दोन मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. या मुद्यांद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/अभिप्राय मागितले आहे, जे अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या संदर्भातील तरतुदींशी सुसंगत नाही. मात्र मुद्दा क्र. १ व २ मधील उर्वरित व मुद्दा क्र. ३ ते ७ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार

अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेला मुद्दा क्र. १ अंशतः व २ अंशतः हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना रु.२०००/- इतकी नुकसान भरपाई मिळण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि त्यांच्या या विनंतीप्रित्यर्थ त्यांनी कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये जोडला नाही, तसेच नुकसान भरपाईचा इतर कोणताही तपशील आयोगास देण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीची नुकसान भरपाईची मागणी आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ अंशतः व २ अंशतः वगळता उर्वरित संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन विष्णू लोंढे,रा.ढोरजळगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,मजले चिंचोली ग्रामसेवा मंडळ, मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष,मजले चिंचोली ग्रामसेवा मंडळ, मजले चिंचोली ता.जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५८
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राधाकिसन मगनराव वाघ,<br>रा.रांजणखोल (गांधीवाडी)<br>ता.राहाता,जि.अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,राहाता,<br>जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,राहाता,<br>जि.अहमदनगर | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,राहाता,जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्याची तोंडी आश्वासने देऊन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. अद्यापपर्यंत त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती न दिल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्याची कार्यवाही करावी व त्यांनी मागणी केलेल्या नावांच्या याद्या दि. १ मार्च, २००१ पासून दि.७ जानेवारी २००८ पर्यंतची संपूर्ण माहिती मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.०७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - मौ. रांजणखोल ता.राहाता या परिसरात झालेल्या सर्व्हेप्रमाणे दारिद्रयरेषेखालील लोकांची संख्या, त्यापैकी अंत्योदय योजना,बी.पी.एल. व अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या, शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलाप्रमाणे दारिद्रयरेषेत असूनसुध्दा लाभात नाहीत, अशा लोकांची संख्या व त्यासंदर्भात असलेल्या नावांची यादी- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दि. ०१.०३.२००१ ते ०७.०१.२००८ या कालावधीशी संबंधित असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि तदनंतरही माहिती प्रत्यक्षात प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतिमतः दि. ३०.०६.२००८ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे आवश्यक ती माहिती दाखविण्यात आली तथापि त्यावेळी अपिलार्थीने ही माहिती त्यांना नका असल्याचे व त्यांना बी.पी.एल.,अंत्योदय व अन्नपूर्णा या योजनेच्या सन २००१ च्या लाभार्थ्यांची नावाची यादी आठ दिवसात मिळाल्यास याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहणार नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर लिहून दिले. परंतु तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्रथम सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना दाखविण्यात आली होती, परंतु त्यांनी या माहितीची

त्यांना आवश्यकता नसल्याने त्यांना ही माहिती टपालाद्वारे पाठविलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेली संपूर्ण माहिती आयोगास दाखविली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सन १९९७-९८ मध्ये झालेल्या सर्व्हेनुसार दारिद्रयरेषेखाली किती आहेत व शासनाने वेळोवेळी केलेल्या बदलानुसार दारिद्रयरेषेखालील असूनसुध्दा शासनाच्या विविध योजनांचा लाभ प्राप्त होत नसलेल्या लाभार्थ्यांची संख्या व नावांची यादी दि. १.३.२००१ ते ७.१.२००८ या कालावधीची माहिती मागितली आहे. या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, त्यांच्याकडे प्रत्येक योजनेमधील लाभार्थ्यांची यादी तयार असून हे सर्व लाथार्थी दारिदेयरेषेखालील व्यक्ती आहेत.

सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ०७.०१.२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यावर तीस दिवसांच्या आत अर्जदारास प्रथमतः त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क तपशीलवारपणे कळविणे व त्यांनी शुल्क भरणा केल्यानंतर अर्जदारास कलम ७ च्या तरतुदीनुसार माहिती देण्यासंदर्भात कार्यवाही करणे जन माहिती अधिकारी यांचे अपेक्षित कर्तव्य आहे. या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेले कर्तव्य योग्यरित्या पार न पाडल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर अशा प्रसंगाची पुनरावृत्ती त्यांनी टाळावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्य मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राधाकिसन मगनराव वाघ,रा.रांजणखोल (गांधीवाडी) पो. टिळकनगर ता. राहाता, जि. अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय, राहाता, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,राहाता,जि.अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५९
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल, : अपिलार्थी
रा.अहमदनगर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपपोलीस अधीक्षक (गृह),
पोलीस मुख्यालय,अहमदनगर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक,
अहमदनगर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय), अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास कसूर केला असून त्यांना माहिती प्राप्त झालेली माहिती असमाधानकारक, दिशाभूल करणारी आणि अत्यंत मोघम स्वरुपाची आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.१३.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांना दि. २३.१०.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीसंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २५.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तदतुदीनुसार प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यावर दि. २०.०४.२००९ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. ०२.०५.२००९ रोजी पारित केले. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीमध्ये मान्य केल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि. २३.१०.२००८ रोजी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर युक्तिवाद केला. अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये निर्णय दिलेला नाही. तसेच त्यांना पुरविण्यात आलेल्या माहितीमध्ये त्यांचा भाऊ श्री. संतोष उध्दवराव कुक्कडवाल यांच्या जबाबाची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही. ती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०९.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पूर्ण माहिती पुरविली असून अपिलार्थीस त्यांचे बंधू श्री. संतोष कुक्कडवाल यांच्या जबाबाची प्रत ते ताबडतोब देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे एकूण चार मुद्यांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.१०.२००७ रोजी केलेल्या तक्रारीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती अपेक्षित होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जरी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस पुरविली असली तरी, एखाद्या अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रार अथवा अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असेल तर, अर्जदाराने केलेला तक्रार/अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराच्या आणि इतर कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अर्जदारास देणे अपेक्षित आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे संतोष कुक्कडवाल यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या जबाबाच्या सत्यप्रतीची जरी माहिती मागितली नसली तरी जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस श्री. संतोष कुक्कडवाल यांनी श्री. सचिन कुक्कडवाल यांच्याशी समझोता करतेवेळी त्यांनी दिलेल्या जबाबाची प्रत अपिलार्थीस देणे संयुक्तिक राहिल, असे आयोगास वाटते. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी श्री. संतोष कुक्कडवाल यांनी या प्रकरणी दिलेल्या जबाबाची प्रत अपिलार्थीस तात्काळ विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने सुनावणी घेतल्यासंदर्भात अपिलार्थीने घेतलेल्या आक्षेपाबाबत जन

अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, त्यांनी दि. २५.०७.२००८, ०९.०३.२००९, ०८.०४.२००९ व २०.०४.२००९ रोजी सुनावणी ठेवली असता अपिलार्थी हे दि. २०.०४.२००९ रोजी सुनावणीस उपस्थित राहिले व त्याच दिवशी त्यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय दिला व आपले आदेश दि. ०२.०५.२००९ रोजी पारित केले आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर उशिराने सुनावणी होण्यासाठी अपिलार्थी हे देखील काही अंशी जबाबदार असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर त्यांनी दिलेल्या निर्णयाबाबत आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रकांत उध्दवराव कुक्कडवाल,रा.सिताराम सारडा विद्यालयाजवळ, तोफखाना, अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),पोलीस अधीक्षक कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६०
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. शिवाजी बाबूराव सुद्रिक, : अपिलार्थी
रा.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय,
अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि. ०८.०५.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता प्राप्त

झालेली असून त्यांची या प्रकरणी कोणतीही तक्रार राहिलेली नाही व विचाराधीन अपील क्र. ३६०/०८ ते मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थी त्यांचे विचाराधीन अपील मागे घेत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.३६०/०८, दि.२३.१०.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिवाजी बाबूराव सुद्रिक,रा. भुतकरवाडी, वरद कॉलनी, सावेडी,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार,उपविभागीय अधिकारी कार्यालय,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६१
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. भारत बाबूराव आरगडे, : अपिलार्थी
रा.सौदाळा,ता.नेवासा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी , : प्रतिवादी
तहसील कार्यालय,नेवासा,
जि.अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नेवासा,
जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर विलंबाने माहिती पुरविली असून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारचा निर्णयही दिला नाही व माहितीही दिली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असून जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाहीची त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.२८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कामगार तलाठी कार्यालयासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"कामगार तलाठी कार्यालयातून मिळणारे सर्व कागदपत्रांची प्रोसिजर काय आहे? उदा.७/१२,८अ,उत्पन्न दाखले इ. त्यांची कायदेशिर फि किती? सदरील कागदपत्रे किती दिवसात देणे कायदेशिररित्या बंधनकारक आहे?" सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही.सदर सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्यासमोर हजर असल्याचे व माहिती मिळण्यासाठी त्यांनी लेखी अर्ज सादर करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार न केल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याच्या सूचना आयोगाच्या कार्यालयातून दि.२९.०४.२००९ रोजीच्या सूचनापत्राबरोबरच जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. सपाट, नायब तहसीलदार यांच्यामार्फत दि.०४.०५.२००९ रोजी ठीक ०४.४५ वा. दूरध्वनीद्वारे सूचित करुनही जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये अपेक्षिलेल्या माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यवस्थितपणे केलेली नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस नेमक्या कोणत्या कागदपत्रांची व कोणत्या मुद्यावर माहिती हवी आहे, याचा पुरेसा बोध होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थीस कामगार तलाठी कार्यालयातील ७/१२ चे उतारे, ८-अ व इतर दाखले देण्यासंदर्भातील कार्यवाहीबाबतची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी भरावी लागणारी फी व ही कागदपत्रे किती दिवसांत कामगार तलाठी कार्यालयाकडून प्राप्त होऊ शकतात या २-३ मुद्यांवर माहिती अपेक्षित आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती पाहता, ही माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जाशी विसंगत असल्याचे व तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या पत्राद्वारे दिली आहे, त्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कोणत्याही क्रमांकाची व दिनांकाची नोंद नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती निश्चितपणे कधी दिली ,याचा बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती पाहता, या मध्ये ८-अ,७/१२ चे उतारे, अर्जदारास किती दिवसांत मिळू शकतात, या मुद्यावर कोणतीही माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील फक्त काही अभिलेख्यांचा पुरवठा करण्यासाठी कथित उपलब्ध दरपत्रक देत असल्याचे नमूद केले आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची, माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीसंदर्भात

त्यांचे कर्तव्ये पार पाडण्याची अशाप्रकारची कार्यपध्दती पाहता, ती निश्चितपणे माहिती अधिकार अधिनियमाच्या वृध्दीस पोषक नाही आणि माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ उद्देशाला काही प्रमाणात तडा देणारी आहे, अशी आयोगाची खात्री झाली आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक तो प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर महसूल आयुक्त,नाशिक यांना प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त महसूल,नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भारत बाबूराव आरगडे, रा.सौदाळा,पो.भेंडा,ता.नेवासा,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६२
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. चंद्रभान पुंजा लाडके, : अपिलार्थी
रा.देडगाव, ता.नेवासा,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तहसीलदार,नेवासा,
जि.अहमदनगर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, नेवासा,
जि.अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय नेवासा,जि.अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.११.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी हे उडवाउडवीचे उत्तरे देऊन माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयातील "पोट खराबा कमी केल्याबद्दल कोणतेही आदेश आढळून येत नसल्याचे"म्हटले आहे, परंतु या बाबी स्पष्ट करणाऱ्या आदेशाची कोणतीही नोंद केली नाही,

त्यामुळे असा आदेश अथवा नोंदी असल्यास त्याच्या नकला अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.११.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. देडगाव तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर येथील ग.नं.१७७ पैकी स.नं.७९ मधील ७/१२ च्या उताऱ्यावर ३० आर.इतके पोटखराबा क्षेत्र कमी का केले, तसेच कोणत्या कामगार तलाठी यांच्या काळात झाले, त्यांचे नाव व पत्ते आणि पोटखराबा कोणत्या आदेशानुसार केले, त्या आदेशाची नक्कल आणि पोटखराब कमी करता येते की नाही, ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ३१.०७.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व ७/१२ चे उतारे अपिलार्थीस पुरविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.११.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उपलब्ध माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी अपिलार्थी हे उपस्थित आहेत. आज रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याच्या लेखी सूचना आयोगाच्या कार्यालयातील दि.२९.०४.२००९ रोजीच्या सूचनापत्राद्वारे व दूरध्वनीद्वारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. पाटोळे लिपीक यांचेमार्फत दि.०४.०५.२००९ रोजी ठीक दु. ०४.५० वा. तोंडी सूचना देऊनही जन माहिती व अपिलीय

अधिकारी अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत, याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या जमिनीच्या पोटखराब क्षेत्राविषयी माहिती मागितली आहे, ती माहिती त्यांना आजही आवश्यक आहे, कारण त्यांनी ही जमीन श्री. बाळकृष्ण नाना हरकळे यांच्याकडून खरेदी केली असून खरेदी करताना त्यांनी जमिनीचे क्षेत्र ७ हेक्टर ९ आर.पोटखराब ३० आर इतके होते, तथापि सदर पोटखराब संबंधित कामगार तलाठयाने कमी केल्याचे त्यांना नुकतेच आढळल्याने हे पोटखराब कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दर्शविले, याची माहिती त्यांना आवश्यक आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, त्यांनी खरेदी केलेल्या क्षेत्रामधून काही क्षेत्र कमी दाखवून हे क्षेत्र अपिलार्थीने ज्या जमीन मालकाकडून जमीन खरेदी केली होती, त्यांच्या ७/१२ च्या उताऱ्यावर दाखविण्यात आले आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण ४ मुद्याद्वारे माहिती मागितली असून अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "वरील पोटखराब कमी करता येते का?" ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रश्नावर अभिप्राय अपेक्षित केल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्याची तरतुद आहे. या अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे स्पष्टीकरण, खुलासे अथवा अभिप्राय मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी ते अर्जदारास देणे, अशाप्रकारच्या प्रक्रियांचा समावेश नाही. मात्र उर्वरित तीन मुद्यांवरील माहिती

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ वगळता उर्वरित तीन मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३१.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम पुरविलेली माहिती ही अपूर्ण असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली हा अपिलार्थी यांचा युक्तिवाद सिध्द होत आहे व याचबरोबर त्यांच्या अशा कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्याचेही सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशाचप्रकारच्या कार्यपध्दतीचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये केला आहे, या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी "जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वीही दिघी येथील स्वस्त धान्य दुकानदारासंदर्भात माहिती अधिकारासंदर्भात विलंबाने माहिती दिलेली आहे" असे आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयातील अशाप्रकारच्या त्यांच्या अभिप्रायावरुन जन माहिती अधिकारी यांच्या बेजबाबदार कार्यशैलीचे दृढीकरण होत आहे. सबब महसूल (आयुक्त) नाशिक यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.४ वगळता उर्वरित मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त नाशिक यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चंद्रभान पुंजा लाडके,रा.देडगाव,ता.नेवासा,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तहसील कार्यालय,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नेवासा,जि.अहमदनगर यांना या निकाल-पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६३
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. निलेश सत्यवान म्हसे, : अपिलार्थी
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण),अहमदनगर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालयीन अधीक्षक,
जिल्हा परिषद,सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात येत आहे. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने आयोगाकडे असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.०८.२००८ रोजी प्रथमतः व एका मुद्यावरील माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००८ रोजी द्वितीय अपील

सादर केल्यानंतर दि. ३०.१२.२००८ रोजी विनामूल्य प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांची कोणतीही तक्रार नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ४ मुद्यांपैकी ३ मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २१.०८.२००८ रोजी प्राप्त झाली आहे व एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस दि. ३०.१२.२००८ रोजी म्हणजेच, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली आहे व आता प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थी हे समाधानी आहेत. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती सुरुवातीसच का दिली नाही, अशी जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता,संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ती माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती व संबंधित नस्ती गहाळ झाली होती. व तदनंतर त्यांनी कसोशीने शोध घेतल्यानंतर ही माहिती प्राप्त होताच जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाप्रमाणे अपिलार्थीस मुद्दा क्र. ४ शी संबंधित माहिती त्यांनी दि. ३०.१२.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस सुरुवातीस अर्धवट माहिती देण्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या या कृतीचे हे समर्थन जरी सकारात्मक दृष्टीचे असल्याने ते स्वीकारार्ह वाटत असले तरी त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत अर्धवट माहिती दिल्याची वस्तुस्थिती, प्रत्यक्षात कायम राहत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अभिलेखे जतन करुन ठेवण्याच्या पध्दतीमधील उणिवांमुळे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे वेळीच उपलब्ध होऊ शकले नाहीत, ही वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती दिल्याबद्दल आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन इतःपर अशा प्रसंगांची पुनरावृत्ती होणार नाही, याची त्यांनी दक्षता घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. निलेश सत्यवान म्हसे,इरिगेशन कॉलनी, फकीरवाडा,औरंगाबाद रोड,अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, जिल्हा परिषद,सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,जिल्हा परिषद,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६४
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

१ श्री. अरुण सोपानराव वाबळे, : अपिलार्थी
रा.गुहा ता.राहुरी,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. आर.बी.मोगल

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत माहिती मिळाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. आर.बी.मोगल, कार्यकारी अभियंता यांच्या सेवापुस्तिकेच्या भरलेल्या सर्व पृष्ठांच्या छायाप्रती व त्यांच्या सेवापुस्तिकेतील एकंदरीत किती पाने भरली आहेत - या मुद्यावर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०१.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेच्या प्रतींची माहिती मागितली आहे, ती सेवापुस्तिका त्यांना प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.१२.२००८ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने व त्रयस्थ पक्षाने ही माहिती उघड करण्याचे नाकारल्याने फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी यांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असल्याचे दिसून येते व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या असे निदर्शनास आणून दिले की, दि. १२.०१२.२००८ रोजी त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेऊन त्यांनी माहिती देण्याचे दि. १२.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे नाकारले आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाचे म्हणणे विचारात घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली आहे, ती पूर्णतया सार्वजनिक स्वरुपाची

माहिती असून सेवापुस्तिकेमध्ये शासकीय कर्मचाऱ्याच्या नेमणूकीपासून ते सेवानिवृत्तीपर्यंतच्या सर्व रजा,बदल्या इत्यादी बाबींची नोंद घेतलेली असते. ही नोंद ज्या कागदपत्रांच्या आधारे घेतलेली असते, ती कागदपत्रे शासनाच्या इतर विभागातही अनेक नस्त्यांमध्ये विविध पातळीवर उघडपणे उपलब्ध असतात. त्यामुळे केवळ अपिलार्थीने वैयक्तिक स्वरुपाची माहिती मागितली, या कारणावरुन अपिलार्थीस माहिती उघड करण्याचे नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती, हे बरोबर असल्याचे सिध्द होऊ शकत नाही. याचबरोबर ही माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८(१) च्या कोणत्याही तरतुदींचा भंग होणे या प्रकरणी संभवत नसल्याने जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा निर्णय चूक आहे.

आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

प्रसंगावशात, आयोगास असे आढळून आले आहे की, संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या कार्यालयामार्फत दि.२९.०४.२००९ रोजीच्या लेखी सूचनापत्राबरोबरच त्यांच्या कार्यालयातील श्री. बनकर, हेड क्लार्क यांच्यामार्फत दि.०४.०५.२००९ रोजी दु. ०४.०५ वा.दूरध्वनीवरुन आज रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना देऊनही जन माहिती अधिकारी हे स्वतः उपस्थित न राहता, त्यांनी आपल्या कार्यलयातील प्रथम लिपीकास आयोगासमोर पाठविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी चुकीची असून मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाकडे होणाऱ्या सुनावणीस संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय गैरहजर राहणार नाही, अशा अर्थाच्या सूचना त्यांनी त्यांच्या स्तरावर एका परिपत्रकाद्वारे पारित कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ०८-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण सोपानराव वाबळे,रा.गुहा ता.राहुरी,जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६५
निर्णय दिनांक ०८-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अंकुश भास्कर मुतडक,रा.राजुर ता.अकोले,जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा सचिव, सत्यनिकेतन संस्था,राजूर,ता.अकोले, जि.अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सत्यनिकेतन संस्था,राजूर,ता.अकोले, जि.अहमदनगर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०८.०५.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पत्र पाठवूनही त्यांनी देखील माहिती दिली नाही आणि वेळोवेळी स्मरणपत्र पाठवूनही माहिती देण्यास जन माहिती

अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेशी संबंधित जून, २००४ ते दि. ०५.०१.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- संस्थेला या कालावधीमध्ये प्राप्त झालेला निधी आणि तो कसा खर्च केला, याची वार्षिक आकडेवारी आणि या कालावधीमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती कशाप्रकारे केली जाते,किती मानधन दिले जाते,भरती झालेल्या कर्मचाऱ्यांकडून पैसे घेण्यात येतात का, येत असल्यास किती घेतले जातात, संस्थेअंतर्गत किती शाळा व महाविद्यालये आहेत व त्यांना अन्न व  भाजीपाला पुरवठा करण्यासाठी निविदा काढण्यात येते का, येत नसल्यास का काढण्यात येत नाही व आतापर्यंत माहिती व अपिलीय अधिकारी यांचे बोर्ड का लावण्यात आले नाही - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व "कागदोपत्री पुरावे अपेक्षित असतील तर त्या कागदपत्रांच्या उपलब्धतेसाठी रु. ८४०/- डिपॉझिट संस्थेत जमा करावे" असे सूचित केले.  मात्र या "माहिती"ने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी दिलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना दिली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांना अपूर्ण वाटते. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी सात दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्या शाळेचे विद्यार्थी आहेत, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी त्यांना शाळेमध्ये चर्चा करण्यासाठी बोलाविण्यात आले होते. मात्र ते चर्चेसाठी न आल्याने त्यांनी दि. ०७.०३.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली. अपिलार्थीस त्यांनी शाळेमध्ये चर्चेसाठी बोलाविले असल्याबाबतचे जन माहिती अधिकारी यांचे एखादे पत्र आहे का,अशी त्यांना विचारणा केली असता,त्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारचे कोणतेही लेखी पत्र न दिल्याचे आयोगास कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ मधील, 'भरती झालेल्या कर्मचाऱ्यांकडून पैसे घेण्यात येतात काय', मुद्दा क्र. ४ मधील, 'त्यांना अन्न,भाजीपाला पुरवठा करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या का, येत नसल्यास का काढण्यात येत नाही व माहिती अधिकारी आणि अपिलीय अधिकारी यांचे बोर्ड का लावण्यात आले नाहीत', या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये अशाप्रकारच्या माहितीचा समावेश होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील अशाप्रकारच्या प्रश्नांद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, जी अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील हे मुद्दे वगळता उर्वरित मुद्यांवरील माहिती ही अधिनियमातील

तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. यापैकी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ वगळता उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. ०७.०३.२००८ रोजी अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. कारण त्यामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहितीचा समावेश नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीस दिवसांच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. ०४.०२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देय असताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०७.०३.२००८ रोजी म्हणजेच तीस दिवसांच्या विलंबाने दिली आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे पुरावे जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर, त्यांना पूर्ण संधी देऊनही, उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती व ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०३.०३.२००८ रोजी स्वतः उपस्थित राहिले होते. परंतु त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यांनी दि.०३.०३.२००८ रोजी याच माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज सादर केला होता.या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची पोचसही आहे. त्यामुळे अपिलार्थी हे जन माहिती अधिकार

यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी उपस्थित राहिल्याचे सिध्द होत आहे. अशा परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय तीस दिवसांचा विलंब लावला असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय तीस दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याप्रित्यर्थ त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे ३० दिवसांकरिता एकूण रु. ७,५००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात हे आदेश निर्गमित होताच जून, २००९ पासून नियमितपणे जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**"००७० इतर प्रशासनिक सेवा,६० इतर सेवा, ८०० इतर जमा रक्कम १८ माहितीचा अधिकार ००७०-००६-१ "**

प्रसंगावशात, संबंधित संस्थेच्या अध्यक्षांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व शाळांमध्ये अद्यापपर्यंत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे बोर्ड दर्शनीभागात लावण्यात आले आहेत किंवा कसे, याबाबत स्वतः खात्री करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना एकूण रु.७५००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०८-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंकुश भास्कर मुतडक ,रा.राजुर ता.अकोले,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,सत्यनिकेतन संस्था,राजूर,ता.अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(नोंदणीकृत टपालाने)

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ,सत्यनिकेतन संस्था, राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपकोषागार अधिकारी, अकोले,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१५०

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. नरवाडे प्रशांत गणपतराव, अपिलार्थी
मु. पो. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना किनवट कृषि कार्यालयातील कृषि पर्यवेक्षक श्री. जगन राठोड व श्री. गोविंद राठोड यांनी केलेल्या कामांची माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. जगन राठोड व श्री. गोविंद राठोड यांनी सन २००५-२००७ या कालावधीमध्ये केलेल्या कामांची वेगवेगळ्या मुद्दयाशी संबंधित माहितीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले व तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५३० इतके भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तदनंतर अपिलार्थीने दिनांक ३१-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता अपिलार्थीस दिनांक १७-१२-२००७ रोजी त्यांनी पूर्णतः माहिती दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची पोचसही असलेली कागदपत्रे आयोगास सादर केली आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५३० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे त्यांनी

सूचित केले आहे, तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने केलेला नाही. एवढे असूनही अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज केल्यानंतर त्यांना ११२ पृष्ठांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाबाबत आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये वा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही उल्लेख केलेला नाही किंवा याबाबत तोंडी अभिप्राय व्यक्त करण्यासाठी आज अपिलार्थी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नरवाडे प्रशांत गणपतराव, मु. पो. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३१०/०८ व ३११/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१० व ३११

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ३१०/०८ व ३११/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा,
चैतन्यनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, सना एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर
सोसायटी मार्फत सना उर्दू प्राथमिक शाळा,
चैतन्यनगर, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲन्ड एज्युकेशन संस्था,
नोमानीया नगर, तरोडा (बु.) नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपिलाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

**अपील क्रमांक ३१०/०८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता विहित मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्राथमिक शाळेकरिता दिनांक १२ जून २००७ च्या दैनिक वरखे ताजा दैनिकात दिलेल्या जाहिरातीप्रमाणे शिक्षकांची पदे भरण्यासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीच्या तपशिलाची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या पदासाठी मुलाखत दिलेल्या उमेदवारांच्या नावाची यादी, शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती - इत्यादी मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, दिनांक १२-०५-२००७ रोजीच्या दैनिक वरखएताजा या दैनिकात दिलेल्या जाहिरातीसंदर्भात एकही उमेदवार हजर न झाल्याने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक १०-०८-२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाव्दारे कळविली असून अपिलार्थीस ही माहिती दिनांक ११-०८-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. या पृष्ट्यर्थ अपिलार्थीच्या रजिस्टर्ड पोस्ट पावतीची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे दाखवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-

०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००७ राजी सुनावणी ठेवली होती, मात्र सदर सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली असून अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक १९-११-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे हजर झाले नाहीत. यासंदर्भात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक २२-११-२००७ रोजीच्या पत्राची एक प्रत त्यांनी सादर केली असून त्यामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील प्रस्तावित सुनावणीस, राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याने त्यांना हजर राहणे कायदेशीररित्या बंधनकारक नाही असे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली असून ती माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २२-०९-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-११-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि अपिलार्थी हे, आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्याचे कारण दर्शवित या सुनावणीस गैरहजर राहिले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न होण्यासाठी अपिलार्थीची या सुनावणीसाठीची गैरहजेरी हे कारण प्रमुख असल्याचे दिसून येते. मात्र अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करतांना प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न ठेवता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याचा त्यांच्यावर खोटा आरोप ठेवल्याचे येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २२-११-२००७ रोजी लिहिलेल्या पत्रामध्ये ते सुनावणीस हजर राहू इच्छित नसल्याचे स्पष्ट केले आहे, हे पाहता अपिलार्थीस आवश्यक ती

माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे आणि त्यांनी आयोगाला विसंगत विधाने करुन आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. या सर्व बाबी विशेषतः अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याचे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३१०/२००८ फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ३११/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता विहित मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केली. त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या प्राथमिक शाळेस जिल्हा परिषदेच्या शिक्षण प्राथमिक विभागाकडून सन १९९९-२००० ते सन २००२-२००३ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या वेतनेतर अनुदानाच्या खर्चाच्या तपशिलाची माहिती मागितली होती. या माहितीबरोबरच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शालेय शिक्षण समितीच्या याच कालावधीतील ठरावाच्या सत्यप्रती आणि खर्चाचे ऑडिट रिपोर्ट, यांचीही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या

माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस दिनांक १९-११-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात सुनावणीस हजर राहण्याचे सूचित केले. तथापि या सुनावणीस हजर न राहता, अपिलार्थीने, सदर पत्र त्यांना प्राप्त होण्यापूर्वीच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याने त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस हजर राहण्याचे कायदेशीर बंधन नाही, असे कळवून सदर सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले व तदनंतर दिनांक ११-०१-२००८ रोजी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६० इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले होते. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविले. परंतु या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले व अपिलाच्या सुनावणीस देखील अपिलार्थी हे गैरहजर राहिले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्यास ते तयार आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक तो प्रतिसाद विहित मुदतीत

दिला आहे. परंतु अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे न भरल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक ३१-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नाहीत असे नमूद केले आहे त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी जन माहिती अधिकारी हे सूचित करतील त्याप्रमाणे प्रथमतः शुल्क भरणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आजही सशुल्क पुरविण्याची तयारी आयोगासमोर दर्शविली आहे हे पाहता अपिलार्थीस माहिती उपलब्ध न होण्यासाठी आवश्यक त्या शुल्काच्या भरण्याअभावी ते स्वतः जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३११/२००८ फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, चैतन्यनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, सना वेल्फेअर ॲन्ड एज्युकेशन संस्था,

नोमानीया नगर, तरोडा (बु.) नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३१२/०८ व ३१३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१२ व ३१३

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ३१२/०८ व ३१३/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मातोश्री अनुसया माध्यमिक
विद्यालय, सोनखेड, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, अनुसया शिक्षण मंडळ,
मार्फत मातोश्री अनुसया माध्यमिक विद्यालय,
सोनखेड, तालुका लोहा, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : सचिव, अनुसया सेवाभावी संस्था, कंधार, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपिलाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेली  दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता ती माहिती देण्यास मुख्याध्यापकाने जाणीवपूर्वक टाळाटाळ केल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अनुसया शिक्षण मंडळ, सोनखेड यांच्याकडे वरील दोनही प्रकरणी अपील अर्ज केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्या अपील रजिस्ट्री परत केल्या, या कारणाने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या, एकाच जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वेगवेगळ्या अर्जाव्दारे त्यांच्या शाळेशी संबंधित दोन वेगवेगळ्या स्वरुपाची माहिती मागितली होती.  अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती पाहून जाण्याचे अपिलार्थीस सूचित केले.  जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, अनुसया शिक्षण मंडळ, सोनखेड यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपिले केली.  अपिलार्थीने ज्या पाकिटामार्फत त्यांचा अपील अर्ज त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे केला त्या पाकिटावर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या संस्थेचे नाव व पत्ता चुकीचा लिहिला असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जांचा जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकार केला नाही.  अशा प्रकारे त्यांच्या अपील अर्जांचा स्वीकार न केला गेल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे या दोनही प्रकरणी दोन स्वतंत्र अपिले सादर केली आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी होणे आयोगास गरजेचे वाटते.  आता शिक्षण संचालनालयाने त्यांचे

आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना शिक्षण संस्थांच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले असल्याने, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशांनी समाधान न झाल्यास, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३१२/०८ व अपील क्रमांक ३१३/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या दोनही अपील अर्जांवर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद
दिनांक ११-०५-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मील

कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मातोश्री अनुसया माध्यमिक विद्यालय, सोनखेड, तालुका लोहा, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यां-ना, अपिलार्थीच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या दोन प्रथम अपील अर्जांच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, अनुसया सेवाभावी संस्था, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३१४/०८, ३१५/०८ व ३१६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१४, ३१५ व ३१६

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, — अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

<u>अपील क्रमांक ३१४ व ३१६/०८</u>

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी, धर्माबाद
मार्फत उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

<u>अपील क्रमांक ३१५/०८</u>

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका
धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी — प्रतिवादी
तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी, धर्माबाद
मार्फत उर्दू हायस्कूल, धर्माबाद,
तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तीनही अपिलाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी दाखल झालेली तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून अपिलार्थीने एकाच संस्थेकडे तीन वेगवेगळया अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली आहे, व या प्रकरणांशी संबंधित तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे एकच असल्याने व अपिलार्थीने आयोगाकडे एकाच दिवशी ही अपिले केली असल्याने या तीनही अपिलांची सुनावणी आज रोजी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमानुसार माहिती मागितली असता संबंधित जन माहिती अधिका-यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाव्दारे अपील अर्ज पाठवून दिले असता अपील क्रमांक ३१४/०८ व ३१५/०८ प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलांची रजिस्ट्री परत केली व अपील क्रमांक ३१६/०८ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील प्रकरण प्रलंबित ठेवले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन तीनही स्वतंत्र अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपील क्रमांक ३१४/०८ व ३१६/०८ या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या अर्जांव्दारे मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांच्या संस्थेशी संबंधित काही माहिती मागितली होती व अपील क्रमांक ३१५/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांच्याकडे काही माहिती मागितली होती. या तीनही प्रकरणामध्ये अपील क्रमांक ३१४/०८ व ३१६/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी एकच आहेत व अपील क्रमांक ३१५/०८ शी संबंधीत जन माहिती अधिकारी हे वेगळे आहेत. अधिनियमाव्दारे विहित

केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यंच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपील क्रमांक ३१४/०८, ३१५/०८ व ३१६/०८ शी संबंधित प्रथम अपिले अनुक्रमे दिनांक २३-१०-२००७, ०३-११-२००७ व २५-१०-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली. मात्र या अपील अर्जांवर कोणताच निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

अपील क्रमांक ३१४/०८ व ३१६/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी एकच आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक २१-०८-२००७ रोजीचा त्यांना एकच अर्ज प्राप्त झाला असून अपिलार्थीने याच दिनांकास केलेला कथित दुसरा अर्ज त्यांना अद्यापपर्यंत अपिलार्थीकडून प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा जो अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला आहे त्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती तयार करुन ठेवली आहे. अपिलार्थीचा अपील क्रमांक ३१४/०८ शी संबंधित माहितीचा मूळ प्रथम अर्ज त्यांच्याकडे ज्यावेळी प्राप्त झाला त्यावेळी त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६४७ इतक्या रकमेचा भरणा त्यांच्याकडे करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती पुरविली नाही. अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यास ते आज रोजी तयार आहेत.

अपील क्रमांक ३१५/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झाला नाही व आयोगाकडून व्दितीय अपिलाच्या सुनावणीची नोटीस आल्यानंतर त्यांना अपिलार्थीने अशा अर्थाच्या माहितीची मागणी केली असल्याचे प्रथमतः ज्ञात झाले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या अपील क्रमांक ३१४/०८, ३१५/०८ व ३१६/०८ शी संबंधित अनुक्रमे दिनांक २३-१०-२००७, दिनांक ०३-११-

२००७ व दिनांक २५-१०-२००७ रोजीचे प्रथम अपील अर्ज मूळात त्यांना प्राप्त न झाल्याने त्यावर निर्णय घेण्याचे कोणतेही कारण घडले नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अपील क्रमांक ३१४/०८ प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे. जन माहिती अधिकारी हे सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या अपील क्रमांक ३१५/०८ व ३१६/०८ शी संबंधित माहितीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज अनुक्रमे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाला नाही हे पाहता अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता, अद्यापही त्यांना या माहितीची आवश्यकता असल्यास नव्याने अर्ज करुन आपला मूळ अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त होईल याची खात्री करुन घ्यावी. अपिलार्थी यांच्या असेही निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणा-या माहितीवर त्यांचे काही आक्षेप असल्यास त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) / (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) नुसार प्रथम अपील करावे. या अपील निर्णयाने त्यांचे समाधान न झाल्यास त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे या प्रकरणांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपिले करावीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्रमांक ३१४/२००८ अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ३१५/०८ व ३१६/०८ निकाली काढण्यात येत आहेत.

३. मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती (अपील क्रमांक ३१४/०८ शी संबंधित) त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी, धर्माबाद मार्फत उर्दू प्राथमिक शाळा, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३१७/०८ व ३१८/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१७ व ३१८

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ३१७/०८ व ३१८/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका
धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी, धर्माबाद
मार्फत उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोनही अपिलाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली

असता त्यांनी प्रथमतः एक महिन्याची मुदतवाढ मागवून घेऊन व त्यानंतरही एक महिन्याने माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी प्रथम अपिले सादर केली असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलांची सुनावणी न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवले असल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, विचाराधीन दोनही अपील प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी त्यांच्या संस्थेच्या संदर्भात वेगवेगळी माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दोनही प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी तीस दिवसांची मुदतवाढ मागितली व तदनंतर दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १०७५ /- इतके या दोनही प्रकरणी भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी प्रथम अपिले केली. मात्र या अपिलावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

या दोनही प्रकरणांशी संबंधित जन माहिती अधिकारी एकच आहेत. त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीकडून मुदत वाढवून घेतली व तदनंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना दिनांक ०५-११-२००७ रोजी कळविले, मात्र या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या दोनही प्रकरणाशी संबंधित माहिती त्यांच्याकडे तयार असून त्या ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीची दिनांक २५-१०-२००७ रोजीची कथित अपिले त्यांना प्राप्त झालेली नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या दोन अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी एकाच सामाईक पत्राव्दारे प्रतिसाद दिला आहे. प्रथमतः त्यांनी अपिलार्थीकडून त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने तीस दिवसाची मुदतवाढ वाढवून घेतली जे सर्वथा अयोग्य आहे. माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीमध्ये जन माहिती अधिका-याने अर्जदाराकडून माहिती देण्यासाठी परस्पर मुदत वाढवून घेणे अशा प्रकारची कोणतीही तरतूद अस्तित्वात नाही. तदनंतर दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना दोनही प्रकरणी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १०७५ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याचा दिलेला प्रतिसाद हा अधिनियमाव्दारे असे शुल्क कळविण्यासाठी विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर दिला असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य देय ठरत आहे. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या पत्रामध्ये माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील अपिलार्थीस कळविलेला नाही हेही या प्रकरणी निदर्शनास येत आहे. आता जन माहिती अधिकारी, अपिलार्थीने त्यांच्या दोनही मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ३० दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त दोनही प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे दिसून आले आहे की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जांवर निर्णय

घेतला नाही असे नमूद केले आहे. मात्र आयोगाकडे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले सादर केल्याचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच ते आयोगासमोर सुनावणीसाठी देखील आज अनुपस्थित राहिले आहेत. या प्रकारावरुन अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित वर्तनाबद्दल आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे हे येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली व्दितीय अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३१७/२००८ व ३१८/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ३१७/२००८ व ३१८/०८ शी संबंधित मूळ अर्जाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी, धर्माबाद मार्फत उर्दू हायस्कूल, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३१९/०८ व ३२०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३१९ व ३२०

निर्णय दिनांक ११-०५-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, हिंगोली, जिल्हा हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ११-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांनी त्यांना उद्देशून लिहिलेली अपिलार्थीची दिनांक १२-०१-२००९ रोजीची दोन पत्रे आयोगास सादर केली असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली असून या माहितीव्दारे त्यांचे पूर्ण समाधान झाले असून याबाबत त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही व त्यांची प्रकरणे निकाली काढण्यासाठी अपिलार्थीची काहीही हरकत नाही. अपिलार्थीने कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, नांदेड यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रांचे अवलोकन करता अपिलार्थीस आवश्यक

ती माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३१९/०८ व अपील क्रमांक ३२०/०८, दिनांक ११-०१-२००८ खारीज करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मील कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १७०/०८,१७१/०८,१७२/०८ व १७३/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१७०,१७१,१७२ व १७३
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. शिंदे काशिनाथ नारायण, : अपिलार्थी
रा.इस्लापूर ता.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१ १ अपील क्र.१७०/२००८
जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मंडळ कृषि अधिकारी,बोधडी,
ता.किनवट जि.नांदेड

२ अपील क्र.१७१/२००८
जन माहिती अधिकारी तथा
मंडळ कृषि अधिकारी,इस्लापूर,
ता.किनवट जि.नांदेड

३ अपील क्र.१७२/२००८
जन माहिती अधिकारी तथा
मंडळ कृषि अधिकारी,किनवट,
ता.किनवट जि.नांदेड

४ अपील क्र.१७३/२००८
जन माहिती अधिकारी तथा
मंडळ कृषि अधिकारी,मांडवी,
ता.किनवट जि.नांदेड

२ अपील क्रमांक १७०/०८,१७१/०८,१७२/०८ व १७३/०८
जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, किनवट
जि.नांदेड

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी चारही प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.०१.२००८ रोजी नोंदविलेली चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने कोणत्याही विशिष्ट स्वरुपाची विनंती केली नसून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील त्यांनी या अर्जांमध्ये नमूद केलेला आहे.या तपशीलावरुन अपिलार्थीस सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहे मे ते सप्टेंबर, २००७ या कालावधीमधील गटनिहाय कामाचा व खर्चाचा तपशील आणि कामे केलेल्या मजूरांच्या हजेरीच्या झेरॉक्स प्रती व उचल केलेल्या रकमेचा तपशील ही माहिती अपेक्षित असावी, असे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या चारही प्रकरणी अपिलार्थीने दि. २५.१०.२००७ रोजी चार स्वतंत्र अर्ज करुन एकच माहिती किनवट तालुक्यातील चार वेगवेगळया मंडळ कृषि अधिकाऱ्यांकडे मागितली असून यासंदर्भात संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एकाच दिवशी चार स्वतंत्र प्रथम अपिले व त्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे एकाच दिवशी चार स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत. या साधर्म्यामुळे विचाराधीन चारही अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, दि. २५.१०.२००७ रोजीच्या चारही मूळ अर्जास कोणाही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला नाही. तसेच अपिलार्थीने दि. २८.११.२००७ रोजी या संदर्भात केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही आदेश पारित केले नाहीत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. उपस्थित सर्व जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपिलार्थीच्या दि. २५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देण्याची कारणे विचारली असता, कोणत्याही जन माहिती अधिकाऱ्यास, आयोगास ही कारणे स्पष्ट करता आली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांचे दि. २८.११.२००७ रोजीचे चार प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे न करता, आयोगाकडे सरळ दि. ३१.१.२००८ रोजीची द्वितीय अपील सादर केली आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा

आयोगास मान्य नाही कारण अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जांबरोबर चारही प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या संबंधित लिपीकाची पोचसही व शिक्का असल्याचे दिसून येते.

सुनावणीच्या वेळी चारही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना दि. २६.१२.२००७ रोजी विनामूल्य पुरविल्याचे आयोगास अवगत केले, याप्रित्यर्थ त्यांनी अपिलार्थीची माहिती मिळाल्यापृष्ठयर्थ पोचसही असलेली कागदपत्रे आयोगास दाखविली, यावरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना चारही जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २६.१२.२००७ रोजी विनामूल्य प्राप्त झाल्याचे दिसून येते. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीप्रमाणे या चारही प्रकरणी अपिलार्थीस दि. २४.११.२००७ रोजी अगर तत्पूर्वी माहिती प्राप्त होणे अभिप्रेत असताना त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.१२.२००७ रोजी म्हणजेच ३१ दिवसांच्या विलंबाने माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर करु शकत नाहीत. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती देऊन सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल आयुक्त (कृषि) यांना, सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस दि. २६.१२.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरवूनही अपिलार्थीने दि.३१.१.२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीसंदर्भात कोणतेही अभिप्राय व्यक्त केलेले नाहीत व आयोगास कोणत्याही स्वरुपाची विशिष्ट अशी विनंतीही केलेली नाही, हे पाहता, अपिलार्थीची विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १७०/०८,१७१/०८,१७२/०८ व १७३/०८ फेटाळण्यात येत आहेत.

२. आयुक्त (कृषि) यांना, उपरोक्त प्रकरणांतील संबंधित चारही जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शिंदे काशिनाथ नारायण,रा.इस्लापूर, ता.किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,बोधडी,ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट,ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी,मांडवी,ता.किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२४
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. अरुण रंगनाथ धोकटे, : अपिलार्थी
रा.बाबरगाव,ता.गंगापूर जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा परिषद,औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
कार्यालय जिल्हा परिषद,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष : श्री. डी.जी.भंडारे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी त्रयस्थ पक्ष, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याच्या विहित कालावधीत त्यांना माहिती देण्याऐवजी विसंगत माहिती देऊन माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०१.२००८ रोजी माहिती पुरविली.

तथापि पुरविलेली माहिती अस्पष्ट व वाचता न येण्यासारखी आहे. ही माहिती परिपूर्ण नाही व ती प्रमाणित केलेली नाही. तसेच कार्यालयीन टीपणीची प्रत उपलब्ध असूनही पुरविलेली नाही. त्यामुळे त्या माहितीच्या सत्यतेविषयी अपिलार्थीच्या मनात संभ्रम निर्माण होत आहे. या सर्व कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेशित करुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये अंतिमतः विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. डी.जी.भंडारे, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती,गंगापूर यांच्या चौकशीबाबत केलेल्या तकारीसंदर्भात एकूण तीन मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना जिल्हा शाखा,औरंगाबाद यांच्या दि. ०१.१२.२००६ रोजीच्या पत्रावर केलेली कार्यवाही, जिल्हा परिषद,औरंगाबाद यांच्या दि. २९.१२.२००६च्या कार्यालयीन आदेशाप्रमाणे चौकशी अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीचा जाब-जबाबासह चौकशी अहवाल प्रत व या चौकशी अहवालावर जिल्हा परिषद प्रशासनाने केलेली कार्यवाही टिपणीसह - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची तत्कालीन स्थिती त्यांनी अपिलार्थीस या पत्राद्वारे कळविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.१२.२००७ रोजी सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि.२१.१२.२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले व तसे आदेश दि. २६.१२.२००७ रोजी पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.

०३.०१.२००८ रोजी माहिती पुरविली होती. परंतु प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांचे अभिप्राय हाच त्यांचा युक्तिवाद समजून ही सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना दि. २९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी पुरविली आहे. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या तक्रार अर्जावरील कार्यवाहीच्या अनुषंगाने चौकशी सुरु केली होती व या प्रकरणी चौकशीचा अहवाल, चौकशीची कार्यवाही सुरु असल्यामुळे, त्यांच्याकडे अप्राप्त होता. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस तत्कालीन स्थिती दि. २९.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविली. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या त्यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या आदेशान्वये दि. ०३.०१.२००८ रोजी पूर्ण माहिती साक्षांकित करुन अपिलार्थीस पाठविली आहे.

त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याविषयी मागणी केलेली माहिती उघड करण्यासाठी त्यांची कोणतीही हरकत नाही, मात्र अपिलार्थी यांचा इतर कोणत्याही त्रयस्थ पक्षाविषयी अशाप्रकारची माहिती मागविण्यामध्ये कोणतेही व्यापक जनहित साधण्याचा उद्देश नसतो. अपिलार्थी हे अशाप्रकारची इतर व्यक्तिंशी निगडीत असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार मागत असतात. अपिलार्थीस प्राप्त होणाऱ्या माहितीचा अपिलार्थी हे दुरुपयोग करण्याची त्यांना जास्त शक्यता वाटते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने संदर्भित केलेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कार्यवाही व

चौकशी चालू होती. अपिलार्थीने प्रथम अर्ज केला त्या दिवशी चौकशीची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे पूर्ण केली गेलेली नव्हती, त्यामुळे अपिलार्थीस दि.२९.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आयोगास योग्य वाटतो. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या प्रकरणाची सद्यस्थिती कळविली आहे. मध्यंतरीच्या काळात ही चौकशीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.०३.०१.२००८ रोजी माहिती पुरविली आहे.जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी अपिलार्थीस सर्व प्रती साक्षांकित करुन पुरविल्या व या सर्व प्रती वाचनीय आहेत. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दि. ०३.०१.२००८ रोजी पुरविली आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. या सर्व बाबी, त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे, त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व विसंगत का वाटत आहे, हे सिध्द करण्यासाठी आयोगासमोर अपिलार्थीची आजच्या सुनावणीसाठी असलेली अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १२-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, मु.बाबरगाव पो.पेंडापूर व्हाया वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद-४३११३३.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२५
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. देविदास पांडुरंग वडगावकर, : अपिलार्थी
रा.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. एच.एस.शिंदे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.१०.२००७ रोजी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. परंतु कोणाकडे व किती दिवसात अपील करावे, याबाबत काहीही कळविलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख कक्षात माहिती शोध घेऊनही आढळून आली नाही, असे कळविले होते. मात्र माहिती गहाळ करणाऱ्याविरुध्द काही कार्यवाही केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती न पुरविण्यासाठी जबाबदार असणाऱ्या व्यक्तिवर कारवाई करण्याचा कोणताही प्रस्ताव दिला नाही. या पध्दतीने जन माहिती अधिकारी यांनी

माहिती अधिकाराचा विषय गांभीर्याने घेतला नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची देखील त्यांनी कोणतीही दखल घेतली नसल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्याबाबत आदेश देण्याची व माहिती उपलब्ध न होण्यासाठी जबाबदार असणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जानेवारी १९९१ ते १८.०७.२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. यामध्ये अपिलार्थीने, "त्रयस्थपक्ष श्री.एच.एस.शिंदे यांना जन माहिती अधिकारी यांच्या आदेश दि. ०६.०९.१९९१ अन्वये मौ.शिंगोली येथील गट नं.६६ मधील ९७ आर एवढया क्षेत्राचे अकृषिकरण मंजूर केले गेले आहे. श्री. शिंदे यांनी त्यांना अकृषिकरण प्रस्तावासोबत प्रस्ताव मंजूरीचे वेळी जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिकेचा शोध अभिलेख कक्षात घेतला असता, त्यांना संबंधित नस्ती आढळली नसल्याचे कळविले व या संचिकेचा शोध घेण्यासाठी तीस दिवसांचा कालावधी आवश्यक असल्याचे आणि संचिका प्राप्त होताच अपिलार्थीस कळविण्याचे या पत्रामध्ये शेवटी अपिलार्थीस आश्वासित केले.

जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०१.११.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस मोफत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व माहितीशी संबंधित संचिका गहाळ झाल्याप्रकरणी कोणावरही (कोणत्याही

अधिकारी/कर्मचाऱ्यावर) जबाबदारी निश्चित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी त्यांचा युक्तिवाद त्यांच्या दि. ०१.०५.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आयोगाकडे सादर केला आहे. या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत आदेश व्हावेत आणि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन ही माहिती असलेली संचिका गहाळ केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करण्याचे आयोगाने आदेश द्यावेत.

आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या वेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी श्री. रत्नदिप गायकवाड नावाचे तहसीलदार (सध्या जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड या पदावर कार्यरत ) जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात प्रथमतः दि. १७.०८.२००७ व तदनंतर दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे शोध घेऊनही आढळले नसल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शासकीय अभिलेख्यातील 'अ' प्रवर्गात मोडणारी आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाविषयी काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड करण्यास कोणतीही हरकत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहे. जानेवारी, १९९१ ते दि. १८.०७.२००७ या कालावधीशी संबंधित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित आदेश व माहितीसाठीचा प्रत्यक्षतः केलेला अर्ज यामध्ये १६ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी व्यपगत झाला असला तरी अपिलार्थीने मागणी केलेली

माहिती ही शासकीय अभिलेख्यांच्या 'अ' या प्रवर्गातील आहे. या प्रवर्गातील अभिलेखे जतन करुन ठेवण्याचा कालावधी कायमस्वरुपी आहे, म्हणून ही कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची आहेत आणि अशी कागदपत्रे जतन करण्यासाठी संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांनी गांभीर्यपूर्वक आपल्या कर्तव्याचे पालन करणे अपेक्षित आहे. मात्र या प्रकरणी असे दिसून येते की, कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्याच्या या अभिलेख्यातील, जमिनीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून गहाळ झाली आहेत. ती शोधण्याचा प्रयत्न करुनही ही कागदपत्रे आढळून आली नाहीत. अशाप्रकारच्या माहितीची कागदपत्रे गहाळ होऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाकडे विशेष गांभीर्याने पाहिले नसल्याचे दिसून येते. विशेषतः कायमस्वरुपी जतन करुन ठेवावयाची महत्त्वाची कागदपत्रे गहाळ झाल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अशाप्रकारचे अभिलेखे गहाळ झाल्याप्रकरणी सर्वसाधारण परिस्थितीत पोलीस यंत्रणेकडे आपली रितसर तक्रार नोंदविणे अभिप्रेत आहे. मात्र या प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अशाप्रकारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदार वृत्ती स्पष्ट केल्याचे सिध्द होत असल्याने सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

माहितीचे कायमस्वरुपी जतन करुन ठेवावयाचे अभिलेखे गहाळ झाल्याप्रकरणी जन माहिती अधिकारी यांना, ही जबाबदारी ज्या कर्मचाऱ्यावर/अधिकाऱ्यावर सोपविलेली आहे, त्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांवर, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती शोध घेऊनही न सापडल्यास, वरील मुदतीनंतर तीस दिवसांच्या आत फौजदारी कारवाई करावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देविदास पांडुरंग वडगावकर, 'देवघर', आदर्शनगर, तांबरी, उस्मानाबाद, ता. जि. उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२६
निर्णय दिनांक १२-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लक्ष्मीकांत भगवान दडके,<br>रा.पाथरी, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, परभणी. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,परभणी

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, तालुका आरोग्य अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांनाच परत पाठविला व वरिष्ठांचे आदेश असूनही माहिती देण्यास नकार दिला. या व्यतिरिक्त कोणतीही विनंती अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये केलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, "दंडात्मक कार्यवाही करुन त्याची सविस्तर माहिती द्यावी" ही माहिती त्यांना आवश्यक असल्याचे नमूद केले आहे व त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासोबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले एकूण ४ अर्ज त्यांनी जोडले आहेत. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या अर्जांवर झालेल्या कार्यवाहीचा तपशील त्यांना आवश्यक असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०१.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित विषयाची वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करुन दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.११.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तात्काळ देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जाबरोबर जोडलेल्या सर्व तक्रारींची चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जावरुन कोणतीही बाब निष्पन्न झाली नाही. आणि अपिलार्थीस त्यांनी दि. ०१.०९.२००७ रोजी ही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस यासंदर्भात मूळात आवश्यक असलेली माहिती दि. ०१.१२.२००७ रोजी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थीस ही माहिती तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती

अधिकारी यांच्याकडून दि. ०१.०१.२००६ ते ३१.१२.२००६ या कालावधीत झालेल्या शस्त्रक्रियांची संख्या व दि. १४.०४.२००७ ते २४.०४.२००७ या कालावधीत श्री. घुगे, वाहनचालक हे कोठे कार्यरत होते, या मुद्यांवर माहिती अपेक्षित होती. ही माहिती त्यांना जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून दि. ०१.१२.२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ही माहिती तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडून दि. २७.११.२००७ रोजी प्राप्त झालेली आहे. हे पाहता, अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. तसेच या अपिलाशी संबंधित मूळ माहितीच्या अर्जामध्ये अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, याचा कोणताही उल्लेख अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही, हे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीची मांडणी त्यांना माहिती मागताना व्यवस्थितपणे करता आली नसल्याचे सिध्द होत आहे व यासाठी अपिलार्थी हे स्वतःच जबाबदार असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत भगवानराव दडके, रा. चौधरी गल्ली, पाथरी ता.पाथरी जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२७
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. कर्णराज दिगंबरराव कोळेकर, : अपिलार्थी
रा.तरोड (खु), जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, : प्रतिवादी
जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,नांदेड
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २१.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ०८.११.२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेनुसार रु.१०४/- इतके शुल्क भरुनही त्यांना अद्याप माहिती अप्राप्त आहे. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज करुनही त्यांना अद्यापपावेतो माहिती उपलब्ध झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, परतपूर,देगावरोड,देगाव फाटा,ता.मुखेड जि.नांदेड येथील इंडियन ऑईल

कॉर्पोरेशन लिमिटेडचे किसान सेवा केंद्राची डीलरशीप या विषयावर दि. १२.१२.२००६ ते २७.०८.२००७ या कालावधीशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"ज्या कागदपत्राच्या आधारावर सदरील ठिकाणी किसान सेवा केंद्र उभारणीस आपण शिफारस पत्र दिले आहे, त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती कृपया देणेत यावे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करताना अपिलार्थीने माहितीचा विषय बदलला. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे दि. ०२.११.२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीने यानंतर संबंधितांकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०४/- इतक्या रकमेचा भरणा शासकीय कोषागारात केला. परंतु यानंतरही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने, वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी या प्रकरणी दोन वेळा माहितीचा विषय बदलला असून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क जरी त्यांनी शासकीय कोषागारात भरले असले तरीही या चलनाची मूळ प्रत त्यांनी स्वतःकडेच ठेवून ते माहितीची वाट पाहत राहिले. परंतु तदनंतर अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले असता त्यांनी दि. २७.०८.२००८ रोजी मूळ चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर केल्यानंतर दि. २८.८.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे किसान सेवा केंद्र

डिलरशीप संदर्भात माहिती मागितली होती व याच विषयावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.१०.२००७ रोजी केलेल्या अपील अर्जाद्वारे या ठिकाणच्या पेट्रोल पंपउभारणीबाबत माहिती मागविली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अशाप्रकारे प्रथम अपील करतेवेळी मूळ माहितीचा विषय बदलला आहे, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज ज्यावेळी प्राप्त झाला तोच अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज आहे, असे समजून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०४/- शासकीय कोषागारात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा शासकीय कोषागारात केला, परंतु त्यांनी चलनाची मूळ प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर न करता स्वतःकडेच ठेवून घेतली. तदनंतर ही प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दि. २७.०८.२००८ रोजी सादर केली असता,त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०८.२००८ रोजी माहिती पुरविली. हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली असून, माहिती वेळीच प्राप्त न होण्यासाठी, अपिलार्थी यांची ट्रेझरी चलनाची प्रत स्वतःकडे ठेवून घेण्याची कृती चुकीची असल्याने, ते या प्रकरणी स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कर्णराज दिगंबरराव कोळेकर, ज्ञानेश्वरी निवास, राजगडनगर,पूर्णारोड,माधवराव

पाटील शाळेजवळ,तरोड(खु) ता.जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३२९
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. मोईस खॉन युसुफ खॉन, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वन परिक्षेत्र अधिकारी,किनवट,
जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (जं.का.स.) किनवट,
जि.नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), किनवट,
जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून रोहयोशी संबंधित माहिती न मिळाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचे त्यांना उद्देशून लिहिलेले दि. २१.१.२००८ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,

त्यांनी दि. ०९.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे प्राप्त झाली असल्याने त्यांची याबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही.

यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे. मात्र ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्राप्त झालेली आहे. या विलंबासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३०२०/- इतके त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे बँकेमध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न केल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही. तदनंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.१०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती दि. २१.१.२००८ रोजी व्यक्तिशः विनामूल्य पुरविली आहे.

जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद व वरील वस्तुस्थिती पाहता, विशेषतः अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मोईस खॉन युसूफ खॉन,रा.आंबेडकर चौकजवळ,किनवट, जि.नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा),किनवट,जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.) किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३०
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. दंतलवाड नारायण सखाराम, : अपिलार्थी
मु.पो.इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,किनवट
जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,किनवट,
जि.नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,किनवट
जि.नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०८.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून इस्लापूर सर्कलमधील रोहयो कामाचे हिशोब व हजेरीपत्रकांची मागणी केली असता, त्यांना माहिती प्राप्त झाली नाही व त्यांनी लोकशाही दिनात तक्रार केल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाने त्यांना अर्धवट माहिती पुरविली. यामध्ये रोहयो मजूरांच्या माहितीचा समावेश नाही. त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये शासनाच्या पैशाची जन माहिती अधिकारी यांनी कशाप्रकारे विल्हेवाट लावली, याचा तपशील त्यांनी कळविला नाही म्हणून जन माहिती अधिकारी

यांच्यावर अपिलार्थीस माहिती प्राप्त होईपर्यंत दंडाची कारवाई करण्यात यावी. अशाप्रकारच्या विनंतीबरोबर त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील मजूरांच्या हजेरीपत्रकाची प्रतींच्या माहितीची मागणी या अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५-०७ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सन २००५-२००७ पर्यंत रोहयो अंतर्गत इस्लापूर सर्कलमधील कामावर झालेला खर्च, मजूरांच्या हजेरीपत्रकांच्या झेरॉक्स प्रती व अपिलार्थीने दि. ०३.१०.२००६ रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन माहिती मागितली होती, ती माहिती न देण्याचे कारण काय? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५२४०/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे निर्णय दिला नाही. तथापि मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.१२.२००७ रोजी अपिलार्थीस मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रतींव्यतिरिक्त इतर माहिती पुरविली. प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या सारखीच माहिती पूर्वी वेगळया संदर्भाद्वारे मागितली

असता, त्यांना ती देण्यात आलेली आहे व या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या (हजेरीपत्रकाच्या प्रतींसाठी)शुल्काचा भरणा त्यांनी अद्यापपावेतो केलेला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण दोन मुद्यांद्वारे काही माहिती विचारली होती. **त्यातील अपिलार्थीस, "दि. ०३.१०.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती न देण्याची कारणे" या मुद्यावरील माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे इतकीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल अर्जदाराने त्यांच्याकडे कारणे व खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारणे आणि अपेक्षित खुलासे,स्पष्टीकरणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशाप्रकारच्या प्रक्रियांचा या अधिनियमामध्ये समावेश नाही.** त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती त्यांना, ती अधिनियमातील तरतुदींशी वर स्पष्ट केल्याप्रमाणे सुसंगत होत नसल्याने, देय होत नाही. मात्र उर्वरित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि येथे असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच दि. ०८.१०.२००७ रोजी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे आवश्यक असलेला प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले आहे. मात्र या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अद्यापपावेतो केलेला नाही. त्यामुळे अर्थातच ही माहिती अपिलार्थीस, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे, शुल्काचा भरणा केल्याशिवाय प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावरुन त्यांना मजूरांच्या हजेरीपत्रकाच्या प्रती आवश्यक

असल्याचे दिसून येते परंतु या प्रती प्राप्त होण्यासाठी आवश्यक ते शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नाही किंवा या संपूर्ण घटनाक्रमामध्ये हे शुल्क भरण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही, हे पाहता, अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर हेतूतः नाकारलेले नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण सखाराम दंतलवाड,मु.पो.इस्लापूर,ता.किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३१
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री.रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, : अपिलार्थी
रा.अंबाजोगाई,जि.बीड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,
बीड
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,अंबाजोगाई
जि.बीड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांनी सात दिवसांत त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) नुसार कारवाई करावी , अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित ६ मुद्यांवरील माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये, - अपिलार्थीने विशिष्ट क्रमांक दिलेल्या आदेशाच्या प्रती, उपायुक्त सामान्य प्रशासन यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या तक्रार अर्जावर केलेली कार्यवाही, चौकशी अहवाल, कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव व पद, उपायुक्त, सामान्य प्रशासन व उपायुक्त, पुरवठा यांनी अनुक्रमे दि. ०३.०७.२००७ व दि. २१.०७.२००७ रोजी दिलेल्या पत्राच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, चौकशी अहवालाची प्रत, अंबाजोगाई शहरातील १९८२ ते २००६ या कालावधीतील केरोसिन हॉकर्स, किरकोळ रॉकेल विक्रेते यांचे परवानाक्रमांकासह परवानाधारकाचे नाव, परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व अपर जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि. ०७.०६.२००७ रोजीच्या अपील निर्णयामध्ये "अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे"असे सूचविले आहे, या सूचनेवर केलेली कार्यवाही,- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१२.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून यामध्ये अपिलार्थीने त्यांचे अपील मान्य करण्याची आयोगास विनंती केली असून आपली विनामूल्य माहितीची व जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची मागणी कायम ठेवली आहे. या युक्तिवादामध्ये त्यांनी असेही नमूद केले आहे की, जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी

जाणूनबुजून माहिती देण्याचे टाळले व अपिलार्थीस आर्थिक आणि मानसिक त्रास दिला. या सर्व त्रासाकरिता अपिलार्थीस रु.५०००/- इतकी नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची माहितीची मागणी केली, त्यावेळी ते या कार्यालयात कार्यरत नव्हते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाची कारणे त्यांना आता सांगता येणार नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ए' व मुद्दा क्र. 'ड' शी संबंधित माहिती त्यांच्याकडे आता उपलब्ध असून ते ती माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ब' व 'क' च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे, त्या प्रकरणाची सद्यस्थितीत चौकशी चालू आहे व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती उघड केल्याने त्यांच्या चौकशी कामात पुढे अडथळे येतील. चौकशी अद्याप पूर्ण न झाल्याने चौकशी अहवाल देखील अद्यापि पूर्ण झालेला नाही. मात्र या मुद्यावरील चौकशी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम ही माहिती ते अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विस्तृत प्रमाणात माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीनुसार, मुद्दा क्र. 'ब' व 'क' मधील "चौकशी अहवालाची प्रत" हा अंशतः भाग वगळता, देय होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. 'ए' व 'डी' शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे व उर्वरित, मुद्दा क्र. 'ब' व 'क' मधील वर नमूद केलेला अंशतः भाग वगळता, सर्व मुद्यांवरील माहिती ते अपिलार्थीस ८ दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. 'ब' व 'क' च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद तो अधिनियमातील कलम ८(१)(ज) मधील तरतुदींशी समांतर असल्याने आयोग मान्य करीत आहे.सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की,त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. 'ब' व

'क' मधील अंशतः भाग वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ६.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केला आहे. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.१२.२००७ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस आयोगाकडील सुनावणीच्या दिवसापर्यंत कोणतीही माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने य प्रकरणी त्यांना झालेल्या मानसिक व आर्थिक त्रासाकरिता रु.५०००/- इतक्या नुकसान भरपाईच्या मंजूरीची मागणी केली आहे. तथापि यासंदर्भात अपिलार्थीने कोणताही सबळ पुरावा आयोगाकडे सादर केला नसल्याने अपिलार्थीची सदर विनंती आयोग अमान्य करीत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. 'ब' व 'क' मधील अंशतः वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत,जेलकॉर्नर,अंबाजोगाई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३२
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. शेख नईम शेख लाल, : अपिलार्थी
रा.हिंगोली.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अपर विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती अप्राप्त असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"नगर परिषद,हिंगोली द्वारा सन २००४-०५ व आजपर्यंत निकृष्ठ दर्जाचे झालेल्या रोडच्या डांबरीकरणाच्या कामांची व नाली वरील पुलांच्या कामांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करणे बाबतची तक्रार समाजवादी पार्टी,हिंगोली जिल्हा तर्फे निवेदन पत्र क्र. एसपीएम/एचएनएल/३०४/०६,दि. ०७.०८.२००६ चे निवेदन सादर दि. २१.०७.२००६ रोजी निवेदनासोबत कामांच्या चित्रिकरणाची सीडी व फोटो सह मा.श्री. संजयकुमारजी,विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे सादर केली होती, त्या निवेदानावर एन्डॉर्समेंट करुन ती चौकशी तत्कालीन मा.श्री. मुगळीकर साहेब यांच्याकडे देण्यात आली होती. त्या एन्डॉर्समेंट केलेल्या निवेदनाची प्रत व त्या निवेदनासोबत दिलेल्या फोटोंची प्रत व चित्रिकरण करुन सोबत दिलेल्या सीडी देण्यात यावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०३.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.०२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीस या प्रकरणी निश्चित कोणती माहिती हवी आहे, हे त्यांना अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवरुन ज्ञात झाले. यानंतर त्यांनी विभागीय आयुक्त यांचे अभिप्राय असलेल्या अपिलार्थीच्या तक्रार अर्जाची प्रत अपिलार्थीस स्पीड पोस्टाद्वारे दि. २५.०२.२००८ रोजी पुरविली. मात्र अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद

केल्याप्रमाणे निवेदनासोबत दिलेल्या सी.डी.ची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध होऊ न शकल्याने त्यांना ती अपिलार्थीस पुरविता आली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम,जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या दि. ०७.०८.२००६ रोजीच्या निवेदनाबरोबर कामाचे चित्रीकरण केलेली सी.डी.ची प्रत व या निवेदनावर तत्कालीन विभागीय आयुक्त यांनी वर दिलेल्या अभिप्रायाची प्रत मागितली होती. मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही कार्यवाही करता आली नाही. मात्र अपिलार्थीने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज पाठविल्याची खाजगी कुरियर सेवेची दि. ३०.१०.२००७ रोजीच्या पावतीची प्रत द्वितीय अपील अर्जासोबत सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे माहितीची मागणी करणारा अर्ज पाठविल्याचे सिध्द होत आहे.मात्र अपिलार्थीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी, ज्यांनी स्वतः अपिलार्थीस ही माहिती देणे अभिप्रेत आहे, त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही. यावरुन विभागीय आयुक्त कार्यालयातील, अपिलार्थीच्या मागणी करणाऱ्या अर्जाची नोंद घेण्याकरिता कार्यरत असणारे आवक-जावक लिपीक या प्रकरणी जबाबदार आहेत, असे दिसून येते. जन माहिती अधिकाऱ्यास अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रथमतः अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर ज्ञात झाली व अपिलार्थीस कोणती माहिती आवश्यक आहे, हे जन माहिती अधिकारी यांना कळाल्यानंतर त्यांनी दि. २५.०२.२००८ रोजी अपिलार्थीस विभागीय आयुक्त यांना उद्देशून लिहिलेल्या तक्रार अर्जाची विभागीय आयुक्त यांचे अभिप्राय असलेली प्रत अपिलार्थीस पाठविली, हे पाहता अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी यांचा हेतू नव्हता, असे दिसून येते. अपिलार्थीने विभागीय आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जामध्ये सी.डी.ची

प्रत जोडत आहे, अशी टिप नमूद केलेली आहे. मात्र अपिलार्थीने ही सी.डी. कोणाकडे व कशी हस्तांतरित केली याचा कुठलाही उल्लेख त्यांनी तक्रार अर्जावर केलेला नाही. तसेच ही सी.डी. निश्चितपणे अपिलार्थीने कोणास दिली, हे स्पष्ट करण्यासाठी आज रोजी आयोगासमोर अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. तसेच या संदर्भातील कोणतेही इतर सबळ पुरावे त्यांनी आयोगाकडे सादर केलेले नाहीत, सबब आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात, विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी त्यांच्या कार्यालयातील संबंधित आवक-जावक लिपीकावर, आवश्यक वाटल्यास, प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख नईम शेख लाल,रा.नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त,विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३३
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. नारायण रामभाऊ आहिरे, : अपिलार्थी
रा. उंडणगाव, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद,औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे (दिनांक नमूद न केलेले) दि. १०.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील, अपिलार्थीने, त्यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी चुकीची व खोटी माहिती दिल्याबद्दल केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २३.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मुख्याध्यापिका,सावित्रीबाई फुले कन्या शाळा,उंडणगाव या शाळेतील इयत्ता ९ वी मधील बारा विद्यार्थिनींना परीक्षा न देता उत्तीर्ण केल्याबाबत झालेल्या चौकशीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२९.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि.१७.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये संपूर्ण वस्तुस्थिती कळवून त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामूल्य उपलब्ध करुन दिल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड तालुक्यामधील सावित्रीबाई फुले कन्या शाळा,उंडणगाव मध्ये इयत्ता ९ वी च्या बारा मुलींना परीक्षा न देता पास केल्याप्रकरणी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीवर त्यांनी कार्यवाही पूर्ण केली आहे. या प्रकरणी प्रथमतः त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिकेकडून या प्रकरणाचा खुलासा मागितला. तदनंतर संबंधित मुख्याध्यापिकेकडून खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही चौकशी अंतिमतः बंद केली. आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून असेही अवगत करण्यात आले की, अपिलार्थी हे या शाळेमध्ये शिक्षक असून ते या शाळेमध्ये हिंदी हा विषय शिकवतात. त्यांनी जाणूनबुजून काही विद्यार्थिनींना हिंदी या विषयात नापास केल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर या नापास विद्यार्थिनींच्या उत्तरपत्रिका शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी दुसऱ्या शिक्षकाकडून तपासून घेतल्यानंतर या विद्यार्थिनी उत्तीर्ण

झाल्याचे त्यांना आढळले. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी, संबंधित शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्यामध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०६.११.२००७ व १७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे विनामूल्य पुरविल्या आहेत. हे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी अर्जदारास अधिनियमातील तरतुदीनुसार पुरविणे, एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये अपेक्षिलेल्या माहितीबाबत जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ज्ञात करुन दिली आहे.अपिलार्थीस जर ही कार्यवाही चुकीची किंवा आक्षेपार्ह वाटत असेल तर त्यांनी शिक्षण खात्यातील सक्षम प्राधिकरणाकडे या प्रकरणाची तक्रार करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमापुरते या प्रकरणाकडे पहावयाचे झाल्यास या प्रकरणी योग्य ती कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. नारायण रामभाऊ आहिरे,मु.पो.उंडणगाव, ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.),जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३४
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. माधव भिवाजी बनसोडे, : अपिलार्थी
रा.मुखेड जि.नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०१.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे दि. ०७.०५.२००९ रोजीचे शपथपत्र आयोगास सादर केले असून, यामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील ते, त्यांना आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने, मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थी, आयोगाकडे केलेले द्वितीय अपील आता शपथपत्राद्वारे मागे घेत असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.३३४/०८, दि.१०.०१.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. माधव भिवाजी बनसोडे,रा.गौतमनगर, मुखेड, ता.मुखेड जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२९
निर्णय दिनांक १२-०५-२००९

१ श्री. रामनारायण मयारामजी बंग, : अपिलार्थी
नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
२ जन अपिलीय अधिकारी,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड
जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता,
नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०५.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.१०.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित, शामनगर,हर्षनगर,राजेंद्रनगर ॲड भाणेगावकर

यांच्या घराजवळुन ते ॲड. फटाले (जवाहरनगर) यांच्या घरापासून "गंगामाई" वसंतनगर व तेथून रुपा गेस्ट हाऊसपर्यंत बांधलेल्या गटारीसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गटारीचे मूळ अंदाजपत्रक, त्यासाठी किती व कोणत्या वर्तमानपत्रामध्ये जाहिराती दिल्या, त्या कामासाठी आलेल्या स्पर्धात्मक निविदांच्या छायांकित प्रती, काम घेतलेल्या व पूर्ण केलेल्या गुत्तेदारांचे नाव, बिलांची अदा झालेली रक्कम, मूळ अंदाजपत्रकाप्रमाणे गटार बांधलेली आहे किंवा अचानक बांधकाम करतेवेळी गटारीची बांधकामाची दिशा बदललेली आहे काय? ही गटार जेथून सुरु झाली आहे तेथून प्रत्येक २५' वरील लांबी,रुंदी व खोलीची माहिती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली व तुलनात्मक तक्त्याच्या सत्यप्रती,मूळ अंदाजपत्रकाची सत्यप्रत याकरिता अपिलार्थीस रु.१०/- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करावा,असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १३.०७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.११.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस निविदेची व अंदाजपत्रकाची प्रत देण्याचे त्यांच्या कार्यालयाकडून राहिलेले आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- इतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे केलेला आहे. मात्र त्यांना अद्यापही ही माहिती

पुरविली गेलेली नाही. त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाल्यामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. आता अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दि. १८.०५.२००७ रोजी मागणी केलेली माहिती त्यांना सर्वसाधारण परिस्थितीत दि.१७.०६.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७ (३)(क)प्रमाणे येणाऱ्या दिनांकापासून प्राप्त होणे अभिप्रेत होते. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली रक्कम रु.१०/- चा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दि.०३.०७.२००७ रोजी केला आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या दिवसापर्यंत अपिलार्थीस माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी असमर्थनीय विलंब लावल्याचे दिसून येत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्थलांतराबाबतची माहिती आयोगास अवगत करुन या स्थलांतरणामुळे अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, असे आयोगास सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही बांधकामविषयक माहितीच्या व्यवस्थापनामध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही परिस्थितीत ही माहिती जतन करुन ठेवणे हे जन माहिती अधिकारी यांचे प्रथम कर्तव्य आहे. तसेच ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ स्तरावरही उपलब्ध असते. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी केवळ जन माहिती अधिकारी यांच्या मनातील ईच्छाशक्तीचा अभाव हे एकमेव कारण या ठिकाणी असू शकते, असे आयोगास वाटते. त्यामुळे व तसेच अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत आता व्यपगत झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क इतके त्यांना परत करावे लागेल. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निविदेची व अंदाजपत्रकाची प्रत तीस दिवसांच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी व अपिलार्थीकडून त्यांनी पूर्वी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१०/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क प्राप्त करुन घेऊनही कोणतीही माहिती न देण्याच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव निःसंशयपणे सिध्द केला आहे. सबब आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीकडून त्यांनी पूर्वी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१०/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

३. आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रामनारायण मयारामजी बंग,घर नं.१-१२-२७,'गंगामाई',बाबानगर चौरस्ता, वसंतनगर, नांदेड-४३१६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१६९

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. बालासाहेब गणपतराव यादव, अपिलार्थी
मु. पो. लोणी (खुर्द), तालुका परतूर,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शाखाधिकारी, उपविभागीय अधिकारी,
जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्रमांक ३, तिर्थपुरी,
तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे
उपविभाग क्रमांक ३, तिर्थपुरी, तालुका घनसावंगी,
जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, उपविभागीय अधिकारी, कार्यालय जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्रमांक ३, तीर्थपुरी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वस्तुनिष्ठ व पूर्ण माहिती न दिल्याने विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित प्रचंड व्याप्ती असलेली माहिती एकूण २७ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भात आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, अपिलार्थी सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०१-११-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बालासाहेब गणपतराव यादव, मु. पो. लोणी (खुर्द), तालुका परतूर, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, उपविभागीय अधिकारी, कार्यालय जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्रमांक ३, तीर्थपुरी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्रमांक ३, तिर्थपुरी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३५

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, अपिलार्थी
गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद
शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, विहित मुदतीत कोणताही पत्रव्यवहार त्यांच्याशी केला नाही, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सादर केले होते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती भ्रष्टाचार प्रकरणाशी संबंधित असून ही माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरःस्सर टाळाटाळ केली आहे. त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी देण्याचे टाळून या प्रकरणाशी संबंधित लिपिकास वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी अंतीमतः अशी विनंती केली आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे दंडात्मक कारवाई व प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र शिक्षक संघटना तालुका शाखा गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांनी दिलेल्या निवेदनावर जिल्हा परिषद प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीची, दिनांक २१-०४-२००३ ते दिनांक ०८-१०-२००७ या कालावधीशी संबंधित, एकूण तीन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शिक्षण संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दिनांक २१-०४-२००३ रोजी सादर केलेल्या निवेदनावर प्रशासनाने केलेली कार्यवाही, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मा. आर. आर. पाटील, ग्रामीण विकास मंत्री, मा. सचिव, ग्रामविकास विभाग व मा. अध्यक्ष पंचायत राज समिती यांनी या निवेदनावर जिल्हा परिषद कार्यालयास दिलेल्या आदेशाच्या प्रती व पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद व विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी या निवेदनावर दिलेल्या आदेशाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २६-१२-२००७ रोजी परित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दिनांक ३१-१२-२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित दोन जन माहिती अधिकारी असून त्यापैकी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणी झाल्यानंतर दिनांक २८-१२-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील त्यांच्याशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही.

सामान्य प्रशासन विभागाचे जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे त्यांनी दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे कळवूनही अपिलार्थीने हे शुल्क रुपये ४ इतके त्यांच्या कार्यालयात भरले नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात झालेल्या सुनावणीमध्ये आदेशित केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याचे दिनांक २९-१२-२००७ रोजी कळविले होते. तथापि सदर कालावधी लोटून गेल्यानंतरही अपिलार्थी हे माहिती घेण्यासाठी उपस्थित न झाल्याने दिनांक २०-

०३-२००९ रोजीच्या नोंदणीकृत टपालाव्दारे त्यांच्या विभागाशी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोनही जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधींनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज सामान्य प्रशासन विभागाला उद्देशून केला होता. त्यांनी मागणी केलेल्या तीन मुद्दावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती ही शिक्षण विभागाशी संबंधित होती व मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहिती सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित होती. याबाबत सामान्य प्रशासन विभागाने अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा सामान्य प्रशासन विभागामध्ये केला नाही. तदनंतर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली असता जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाकडून ही माहिती रजिस्टर्ड टपालाने दिनांक २०-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे पुरविण्यात आली आहे. यावरुन सामान्य प्रशासन विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात कार्यवाही केल्याचे दिसून येते. मात्र शिक्षण विभागाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही अथवा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजीच्या आदेशानंतर, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, त्यांनी शिक्षण विभागाशी संबंधित मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीस ज्या विषयासंदर्भात माहिती हवी तो विषय म्हणजे अपिलार्थीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे लिपिक श्री. जोशी यांच्याविरुध्द केलेल्या तक्रार अर्जासंदर्भातील कारवाई हा होय. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने संबधितांना कारणे

दाखवा नोटीसा बजावलेल्या आहेत. या प्रकरणाची ॲन्टी करप्शन विभागाकडून चौकशी चालू आहे. एवढे असतांना या प्रकरणाचे मूळ म्हणजे संबंधीत तक्रार अर्जाची नेमकी प्रत शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाही, ही बाब अविश्वासनीय आहे. त्याचबरोबर या अर्जातील तीन मुद्दयापैकी एका मुद्दयावर जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने कारवाई केली मात्र उर्वरित दोन मुद्दयावर या तक्रारीच्या मूळ अर्जामध्ये या अर्जाच्या प्रती शिक्षण विभागाकडे उपलब्ध नाहीत ही बाब आयोग मान्य करत नाही. सबब जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांना शिक्षण संघटनेच्या दिनांक २१-०४-२००३ रोजीच्या पत्राची प्रत संबंधित संघटनेशी संपर्क साधून प्राप्त करुन घेता आली असती, तथापि या ठिकाणी अशी कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रयत्न संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेला नाही. अपिलार्थीस या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर माहिती देण्यासाठी शिक्षण विभागाच्या जन माहिती अधिका-याने कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जास अंदाजे दीड महिना इतका विलंबाने प्रतिसाद देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. या सर्व बाबी विचारात घेता संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक ज्यांना माहिती अधिकार अधिनियमामधील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, या सर्वांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभागाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या प्रकरणाशी संबंधित शिक्षण विभागातील संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३६

निर्णय दिनांक १३-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. संजय बाबुराव मैड,<br>रा. नूतन रोड, नूतन विद्यालयासमोर, सेलू,<br>तालुका सेलू, जिल्हा परभणी | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, हिंगोली | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (म), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली |
| | जन अपिलीय अधिकारी | : | निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतेही आदेश प्राप्त झाले नसल्याचे नमूद केले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी " जन माहिती

अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता लघुटंकलेखक या पदावर नियुक्ती करणारे सक्षम प्राधिकारी विभागीय आयुक्त आहे असे कळविणे व पाठपुरावा केल्यानंतर सदर माहिती हस्तगत करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे बोलाविणे याचाच अर्थ माहिती लपविण्याचा प्रयत्न करणे " असे आपले अभिप्राय दिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०५-२००७ रोजीच्या प्रथम माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित लघुटंकलेखकाच्या आस्थापनेसंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे स्पीड पोस्टाने माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, लघुटंकलेखक या पदावर नियुक्ती करणारे सक्षम प्राधिकारी विभागीय आयुक्त हे असल्याने त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे व माहिती हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना अडचणीचे जात असल्याचे नमूद केले व त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून हवी असलेली माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थी व जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाल्याचे दिसून येते. तथापि हा पत्रव्यवहार होऊनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दिनांक ०२-०१-२००८ रोजी पूर्ण माहिती पुरविली आहे. आयोगाच्या या प्रकरणाच्या अनुषंगाने विचारलेल्या इतर प्रश्नांचे स्पष्टीकरण उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगासमोर करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत स्पष्ट स्वरुपातील होती. अपिलार्थीने विचारलेली माहिती कोणत्याही दृष्टीने मोघम स्वरुपाची असल्याचे आयोगास वाटत नाही. मूळात अपिलार्थीच्या दिनांक ०८-०५-२००७ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रथम प्रतिसाद सर्वथा चूकीचा आहे, कारण अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित होती. केवळ कर्मचा-यांच्या नियुक्तीचे प्राधिकारी विभागीय आयुक्त असल्याने अपिलार्थीस विभागीय आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधण्याची जन माहिती अधिकारी यांनी दिलेली सूचना चूकीची आहे. त्यांना जर खरोखरच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे वाटत होते तर त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर तो पाच दिवसाच्या आत विभागीय आयुक्त कार्यालयास पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती, परंतु त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. या नंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे व त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी समक्ष हजर राहण्याचे अपिलार्थीस सूचित केले. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती अनाकलनीय आहे कारण मूळात अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये स्पीड पोस्टाने माहिती मागविली आहे त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरवाव्या लागणा-या माहितीपोटीचे शुल्क या प्रकरणी त्यांना

कळविणे भाग होते. मात्र त्यांनी या प्रकरणी अशी कोणतीही कार्यवाही केली नाही व अपिलार्थीशी बराच पत्रव्यवहार केल्यानंतर दिनांक ०२-०१-२००८ रोजी त्यांना विनामूल्य माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविलेली कथित माहिती सुसंगत आहे. अपिलार्थी आज रोजीच्या सुनावणीसाठी व जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे अथवा त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे खंडन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे असे अपिलार्थीस दिनांक ०६-०७-२००७ च्या पत्राने प्रथमतः कळविले नंतर दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस व्यक्तिशः हजर राहून जिल्हाधिकारी कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. अपिलार्थीने स्पीड पोस्टाने माहिती मागितली असता त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचे पूर्णतः वाचनही न करुन अपिलार्थीस जिल्हाधिकारी कार्यालयात हजर राहून माहिती घेऊन जाण्याच्या सूचना देण्याच्या जिल्हाधिकारी यांच्या कृतीचे मूळात कोणतेही समर्थन असू शकत नाही. जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयाने या घटनाक्रमामध्ये प्रत्येक टप्प्यावर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मर्यादित असूनही ज्या प्रकारे निरर्थक पत्रव्यवहार करुन कालापव्यय केला आहे त्यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम ज्या उद्देशाने तयार केला गेला आहे तो उद्देश संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या, या प्रकरणी त्यांनी दाखविलेल्या अशा प्रकारच्या वर्तनाने पूर्णपणे साध्य होईल, असे आयोगास वाटत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. सबब सचिव (महसूल व वन विभाग) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे तसेच संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्या या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती

अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती मिळाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (महसूल व वन विभाग) यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय बाबुराव मैड, रा. नूतन रोड, नूतन विद्यालयासमोर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल व वन विभाग) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३७

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. शेख अब्दूल गनी अब्दूल अजीज, अपिलार्थी
रा. पलटन मोहल्ला, हिंगोली,
तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
मराठवाडा विभाग मुख्यालय परिक्षेत्र नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे वडील नामे अब्दूल अजीज पिता पिर मोहंमद उर्फ (मोहमद अहेमद) हे इ. स. १९३४ मध्ये नांदेड जिल्ह्यात पोलीसमध्ये भरती झाले. काही कालावधीनंतर त्यांची शेवटीची ड्यूटी व सेवाकाळ पोलीस स्टेशन कुंडलवाडी

येथे होता. इ. स. १९४३ मध्ये त्यांना रिझर्वमध्ये घरी पाठविण्यात आले व त्यानंतर त्यांना परत बोलाविण्यात आले नाही. त्यांना त्यांच्या वडिलांच्या सेवा पुस्तकाची, भरतीची इत्यादी माहिती आवश्यक आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, निजाम काळातील फसलीप्रमाणे जुन्यात जुने म्हणजे १०० वर्षे जुने रेकॉर्ड मिळू शकते मग १९४३ चे पोलीस रेकॉर्ड का मिळू शकत नाही.

आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी श्री. दिदारसिंग, पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे वडील पोलीस सेवेत असल्याबाबतचा कोणताही वैध पुरावा अपिलार्थीने त्यांच्याकडे सादर केला नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही साठ वर्षापूर्वीची जुनी असून त्यांचे वडील आता मयत झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या सेवेसंदर्भात आहे. त्रयस्थ पक्ष आता हयात नसून त्रयस्थ पक्ष हे खरोखरच पोलीस सेवेत होते किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी अथवा आयोगासमोर सादर केलेला नाही. त्यामुळे आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अब्दूल गनी अब्दूल अजीज, रा. पलटन मोहल्ला, हिंगोली, तालुका जिल्हा

हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, पोलीस मुख्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३८

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, अपिलार्थी
माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई,
तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी या प्रकरणी प्रथम अपील दाखल केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. मात्र ही माहिती त्यांना मागची तारीख टाकून दिली असून त्यांना पाठविण्यात आलेले दस्तऐवज संशयास्पद आहेत. जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याकरिता टाळाटाळ करुन अर्जदाराचा वेळ व पैसा वाया

घालविला असल्याने त्यांच्यावर २५,००० रुपये इतकी नुकसानभरपाई आकारण्यात यावी व शासकीय दंड ५००० रुपये भरणा करण्याचे आदेश देण्यात यावे व कामकाजात निष्काळजीपणा व अनियमितता याबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०७-०७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण सात मुद्दयावर माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०२-११-२००७ रोजी विनामूल्य माहिती पुरविली. मात्र प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती तयार करुन पुरविली आहे व तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये, त्रयस्थ पक्ष, श्री. एस. जी. निर्मळे यांच्या सर्व्हिसबुकच्या पहिल्या पृष्ठाची प्रत प्राप्त झाली असून त्यांची जन्मतारीख ११-०५-१९५३ आहे मात्र त्यांनी एस. एस. सी. परीक्षा १९५२ साली पास केल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे याचबरोबर इतर माहितीमध्येही वेगळ्या तारखा टाकून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. तसेच त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक कागदपत्रामध्ये तारखेमध्ये खाडाखोड केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मूळात माहितीसाठीचा अर्ज करतांना या अर्जावर दहा रुपये इतक्या किंमतीचे न्यायालयीन मुद्रांक चिकटविले नव्हते त्यामुळे त्यांचा अर्ज दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस परत पाठविला. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर दिनांक ०२-११-२००७ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात यावे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात दहा रुपये इतक्या मुद्रांक शुल्काबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतल्याचे दिसून येते व या निर्णयानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती देखील पुरविली आहे त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या या मुद्दयावर विचार करण्याचे कोणतेही कारण आता आयोगास राहिले नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे काही आक्षेप नोंदविले आहेत व या आक्षेपासंदर्भात भ्रष्टाचार निर्मुलन, पोलीस यंत्रणेमार्फत या कागदपत्रांची चौकशी करण्याची आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस असे सूचविण्यात येते की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणाशी संबंधित प्राप्त झालेल्या माहितीवरील त्यांचे सर्व आक्षेप एका तक्रार अर्जाव्दारे संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे योग्य त्या पुराव्यासह पाठवावे. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना असे सुचविण्यात येते की, अपिलार्थीचा या प्रकरणाशी संबंधीत तक्रार अर्ज त्यांना प्राप्त झाल्यास त्यावर त्यांनी त्वरेने कार्यवाही करुन आपला निर्णय अपिलार्थीस कळवावा. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला दाखविलेल्या त्रुटीमध्ये सकृतदर्शनी तथ्यांश आढळून आल्याने हे आदेश संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रमेशचंद्र श्रीरामजी रामावत, माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३३९

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. शंकर मारुती इंगळे, अपिलार्थी
आनंदनगर चौक,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,
तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपावेतो माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा करण्यासाठी गेले असता त्यांचे रोख पैसे स्वीकारले नाहीत असे नमूद करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे व जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० नुसार कारवाई करण्याचे आदेशित करण्याची विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केंद्र पुरस्कृत कडधान्य व गळीत धान्य विकास कार्यक्रम खरीप हंगाम २००७ मध्ये मोफत वाटप केलेल्या खताचे बॅग, जैविक खते, फेरोमन सापळा व कृषि सहायकाच्या दौरा कार्यक्रमाची प्रत ही माहिती वेगवेगळया एकूण आठ मुद्दयाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०० इतके चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले. सदर शुल्क अपिलार्थीने निश्चित कोठे भरावयाचे याचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये केलेला नाही. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे निर्णय देऊन अपिलार्थी हे सुनावणीच्या दिवशी त्यांच्याकडे उपस्थित राहिले नाहीत या कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला नाही. त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करण्यासाठी तयार

आहेत असे म्हटले आहे तथापि अपिलार्थीने कधीही व कोणत्याही प्रकारे अशी तयारी दर्शविली नाही त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-११-२००७ रोजीच्या अर्जास दिनांक २८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १०० इतके भरण्याचे त्यांना सूचित केले. या शुल्काचा चलनाने भरणा अपिलार्थीने कोठे करावयाचा याचा उल्लेख त्यांनी या पत्रामध्ये केलेला नाही. जो अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे करणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. या कारणाने जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस दिनांक २८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रथम प्रतिसाद अवैध ठरत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता या अर्जातील मुद्दा क्रमांक ७ मधील " रिपोर्ट तयार नसल्यास कारणाची माहिती " हा भाग वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबाबतची कारणे त्यांनी अर्जदारास देण्याची प्रक्रिया या अधिनियमा-मध्ये मुळात अभिप्रेत नाही. अशा प्रकारची माहिती, अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट नसल्याने अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ७ मधील " कारणे " ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याचे सिध्द होत नाही व परिणामी ती अपिलार्थीस देय होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ मधील " कारणे " हा भाग वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे ही माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थीस स्वतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य आहे, अपिलार्थीच्या प्रतिनिधीमार्फत ही माहिती अपिलार्थीस देय असणार नाही.

अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, याच कालावधीत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतः उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घ्यावी. या प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्याचे नाकारल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी दुष्ट हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द न होऊ शकल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील विनंतीनुसार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ अंशतः वगळता उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शंकर मारुती इंगळे, आनंदनगर चौक, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, तालुका मुदखेड,

जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४०

निर्णय दिनांक  १३-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अशोकराव सोपानराव जिंतपूरे,<br>मु. पो. तालुका भूम,<br>जिल्हा उस्मानाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>उपविभाग, भूम, जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>मंडळ, उस्मानाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती नगरपरिषद व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आजतागायत त्यांना दिली नाही. नगरपरिषद भूम व सार्वजनिक बांधकाम विभाग, भूम यांनी संगनमताने अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व ८ व्दारे मागणी केलेली माहिती देण्याचे जाणुनबुजून टाळले असल्याने त्यांनी विचाराधीन

अपील आयोगाकडे केले आहे. त्यांच्या या अभिप्रायाबरोबरच त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधितांना शासन करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १७-०४-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगरपरिषद भूम यांच्या हद्दीतील सर्वे नंबर ३२३ मधील घर क्रमांक २४००/१ आणि २४२१/१ मधील रस्त्याच्या संदर्भात ०१ एप्रिल २००५ ते दिनांक १२-०४-२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व्दारे ' सदरील रस्त्याचा नकाशा आपणाकडे उपलब्ध आहे काय ? असल्यास त्याची सत्यप्रत मिळावी ' व मुद्दा क्रमांक ८ व्दारे ' सदरील रस्त्याचे काम चालू करण्यापूर्वी आपणास मा. मुख्याधिकारी, नगरपरिषद, भूम यांनी सदर रस्त्याची मोजणी करुन खुणा दाखवून दिल्या होत्या किंवा नाही ? ' अशी माहिती विचारली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०७-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. या माहितीमध्ये त्यांनी मुद्दा क्रमांक ४ संदर्भात नगरपरिषद भूम यांच्याकडे त्यांनी नकाशाची मागणी केली असल्याचे व मुद्दा क्रमांक ८ च्या वरीलप्रमाणे नोंदविलेल्या संदर्भात ही बाब नगरपरिषदेच्या अखत्यारितील असल्याचे अपिलार्थीस कळविले. या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-१०-२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी लेखी युक्तिवाद सादर केला असून अपिलार्थीने या युक्तिवादामध्ये जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना योग्य ते शासन

करण्याची आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०५-२००७ रोजी माहिती पुरविल्याचे नमूद केले आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने ज्या रस्त्याविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे तो रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा नाही. मात्र या रस्त्यावर नगरपरिषद, भूम यांच्या विनंतीवरुन सार्वजनिक बांधकाम विभागाने नगरपरिषदकडून तो निधी प्राप्त करुन घेऊन त्या रस्त्यावर नगरपरिषदेच्या सूचनेप्रमाणे काम केले आहे. या रस्त्याची मालकी सार्वजनिक बांधकाम विभागाची नसल्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधित माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडे उपलब्ध असणे संभवत नाही, कारण अशा प्रकारची नगरपरिषदेची रस्त्याची कामे करतांना या रस्त्याच्या मोजणी नकाशाची सहसा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उपभोक्त्या विभागाकडे विचारणा केली जात नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दल कारणे, खुलासे व स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये त्यांना अनुज्ञेय नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ८ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

वरील प्रकरणाचे मूळ शोधले असता असे आढळून येते की, अपिलाथी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या खाजगी जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचे अनधिकृत बांधकाम करुन अतिक्रमण केले आहे. यासंदर्भात मुख्याधिकारी, नगरपरिषद, भूम यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या मुद्दयाशी संबंधात असलेल्या रस्त्याची मोजणी करुन घेऊन या रस्त्याच्या हद्दी प्रथमतः सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित करुन घ्याव्यात म्हणजे या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती सर्व संबंधिताच्या निदर्शनास येईल. मुख्याधिकारी, नगरपषिद भूम यांनी ही

कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने अथवा दृष्ट हेतूने दडविल्याचे अथवा माहिती गहाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व मूळात ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शासन करण्याची मागणी आयोग मान्य करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगरपरिषद भूम यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन महिन्याच्या आत या प्रकरणाशी संबंधित रस्त्याची सक्षम प्राधिकरणाकडून मोजणी करुन हद्दी निश्चित करुन घ्याव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अशोकराव सोपानराव जिंतपूरे, मु. पो. तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्याधिकारी, नगरपरिषद भूम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२५

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. पंडित शेषराव चव्हाण, अपिलार्थी

व्दारा, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,

श्री. तुळजाभवानी जिल्हा स्टेडिअम, उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा जिल्हा क्रीडा अधिकारी,

नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा,

लातूर विभाग, लातूर

त्रयस्थ पक्ष : श्री. आर. डी. माहादावाड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी व त्रयस्थ पक्षाशी संबंधित एकूण बारा मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक १५-०१-२००९ रोजी पारित करुन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०८-२००७ रोजी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती प्राप्त झाली तिच्या प्रती पुरविल्या आहेत, तथापि जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती ही चुकीची आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-११-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्या-नंतर अपिलार्थीस काही माहिती देण्याचा प्रयत्न केला. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडून देण्यात आलेली माहिती म्हणजे संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी, श्री. बोबडे यांचे अपिलार्थीस उद्देशून दिनांक ३१-०७-२००७ रोजीचे एक पत्र आहे, या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सहज लक्षात येते. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नांदेड येथे व्यक्तिशः उपस्थित राहण्याचे सूचित केले व अपिलार्थीस माहिती देण्याचे आश्वासीत केले. अपिलार्थीने मूळात त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाव्दारे माहिती मागविली असता त्यांना आठ महिने इतक्या विलंबाने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात बोलाविणे म्हणजे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळाटाळ करणे असेच म्हणावे लागेल. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या स्वरुपाचा अंदाज करुन जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्यापोटीचे अंदाजे शुल्क अपिलार्थीस तपशीलवार कळविणे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) व ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी कधीही केली नाही. याउलट अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची विनंती केली होती. परंतु तरीही अपिलार्थीच्या या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही कळविण्यात आलेले नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, स्वतः त्यांनी त्यांच्या पातळीवरुन वेळोवेळी पाठपुरावा करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ही सर्व वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी हेतूपूर्वक टाळाटाळ केल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपूर्वक टाळले असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती न

पुरविल्यामुळे त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. अन्यथा अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी हेतूपूर्वक टाळले असल्याचा आयोगाने काढलेला निष्कर्ष त्यांना मान्य असल्याचे गृहीत धरण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली पूर्ण माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना ती अपिलार्थीस देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितली आहे. तथापि ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड केल्यास माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८ (१) अथवा ९ चा कोणताही भंग होणार नाही त्यामुळे या मुद्दयावरील माहिती देखील अपिलार्थीस देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. बोबडे) यांनी उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांना

एकूण २५००० रुपये इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंडित शेषराव चव्हाण, व्दारा, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, श्री. तुळजाभवानी जिल्हा स्टेडिअम, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नवीन इनडोअर हॉल, श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडिअम, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२६

निर्णय दिनांक  १३-०५-२००९

१ श्री. यादव नरसिंग माधवराव, अपिलार्थी
मु. तुळशिराम तांडा पो. गंगाहिप्परगा,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, तुळशिराम तांडा, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक व माध्यमिक शाळा

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये

अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित कालावधी संपल्यानंतर मोघम, अपूर्ण व अस्पष्ट आणि साक्षांकीत न केलेल्या स्वरुपात प्राप्त झाली आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदत संपून गेल्यानंतरही निर्णय न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळ हिप्परगा (काजळ) व्दारा संचलित सुधाकरराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, तुळशीराम तांडा, तालुका अहमदपूर येथील शाळेच्या मान्यतेपासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अप्रुव्हलच्या प्रतीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र पोस्टाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने प्रथम अपील अर्ज केल्यानंतर या अपील अर्जावर सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या स्तरावरुन दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली. मात्र प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या शिक्षण संस्थेतील शिक्षकांच्या संदर्भात माहिती मागविली आहे त्या शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत त्यामुळे अपिलार्थीचा दिनांक २१-११-२००६ रोजीचा प्रथम अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो, या प्रकरणी ज्यांची जन माहिती अधिकारी म्हणून प्रत्यक्षतः नेमणूक

केली गेली आहे त्या मुख्याध्यापकांकडे दिनांक २७-११-२००६ रोजी त्यांनी पाठविला व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि संबंधित मुख्याध्यापकाकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी केलेल्या अपिलावर, अपिलाच्या अनुषंगाने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन ती दिनांक २३-०२-२००७ रोजी अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी हे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक होते व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे जन अपिलीय अधिकारी आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीचा अर्ज विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-यास प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे त्या प्राधिकरणाकडे अपिलार्थीचा अर्ज, अधिनियमातील कलम ६ (३ ) (एक) च्या तरतुदीनुसार पाच दिवसाच्या आत पाठवून अधिनियमातील कलम ६ (३) (एक) ची पुर्तता केली आहे. मात्र संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाने अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर कोणतीही कार्यवाही केली नाही. तदनंतर अपिलार्थीने विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-याकडे प्रथम अपील केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक २३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली आहे व ही माहिती त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस दिली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने ही माहिती मोघम, अपूर्ण व अस्पष्ट असल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती उपलब्ध झाली ती आयोगास दाखविण्यासाठी अथवा यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील हे मुद्दे आयोग विचारात घेऊ

शकत नाही. या प्रकरणी एवढे मात्र निश्चित सिध्द झाले आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी मुख्याध्यापकाने एकूण ५९ दिवसांचा विलंब लावला आहे. या विलंबाचे स्पष्टीकरण संबंधित मुख्याध्यापिकेने आयोगास असे केले आहे की, अपिलार्थीने ज्या काळात माहितीची मागणी केली त्या काळात दिपावली हा सण आल्यानंतर तदनंतर त्यांनी १५ दिवस रजा घेतल्याने त्या अपिलार्थीस वेळेत माहिती पुरवू शकल्या नाहीत. दिपावलीची सुट्टी एकूण किती दिवस होती असे त्यांना विचारले असता त्यांनी दिवाळीसाठी त्यांच्या शाळेस १५ दिवस सुट्टी असल्याचे सांगितले. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीस संबंधित मुख्याध्यापिकेने मूळात विलंबाने माहिती पुरविण्याचे कोणतेही कारण समर्थनीय होत नाही. तरीही केवळ वादाप्रीत्यर्थ जरी त्यांचे म्हणणे ग्राह्य धरावयाचे झाले तरी मुख्याध्यापिकेने जास्तीत जास्त ३० दिवसाच्या विलंबाचे कथित समर्थन होऊ शकेल परंतु उर्वरित २९ दिवसांचे समर्थन त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही हे पाहता संबंधित मुख्याध्यापिकेने अपिलार्थीस माहिती देण्यास २९ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याचे या ठिकाणी सप्रमाण सिध्द होत असल्याने त्या अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब अध्यक्ष, तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळ हिप्परगा (का), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना, या प्रकरणी संबंधित मुख्याध्यापिकेने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात लावलेल्या असमर्थनीय विलंबाबाबत व त्याव्दारे स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळ, हिप्परगा (का), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १३-०५-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. यादव नरसिंग माधवराव, मु. तुळशिराम तांडा, पो. गंगाहिप्परगा, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुधाकरराव नाईक प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, तुळशिराम तांडा, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळ हिप्परगा (का), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६२८

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. बालाजी कामाजीराव दासरवाड, अपिलार्थी
रेंज फॉरेस्ट ऑफिसजवळ, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनक्षेत्र
कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहायक वन संरक्षक (तेंदूपाने) नांदेड
वन विभाग, कार्यालय, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने व जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे

टाळले असल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व त्यांची चौकशी करुन योग्य कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयांतर्गत काम करणा-या रोहयो मजुरांच्या संदर्भात, दिनांक ०१-०८-१९९५ ते ३१-०८-२००७ या कालावधीशी संबंधित एकूण पाच मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. मात्र या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-१०-२००७ रोजी आपले निर्णय पारित केले. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांच्या विभागीय कार्यालयात उपलब्ध असून ते ती अपिलार्थीस सात दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००७ रोजी पुरवली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००७ रोजी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्यतिरिक्त उर्वरित मुद्दयांवरील माहिती दिली आहे. ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना अद्यापपावेतो दिली नसल्याचे सांगितले. त्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर त्यांनी या माहितीचा त्यांच्या कार्यालयात कसोशीने शोध घेतला असता ती माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास या मुद्दयासंदर्भात असे अवगत केले की, ही माहिती उपवनसंरक्षक यांच्या कार्यालयात असण्याची शक्यता आहे. ती उपवनसंरक्षक कार्यालयाकडून मागवून ती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे आयोगास जन माहिती अधिकारी यांनी आश्वासीत केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती त्यांच्यापासून दृष्ट हेतूने दडविल्याचे अथवा त्यांना माहिती देण्यासाठी असद्हेतूने टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे दिसून न आल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बालाजी कामाजीराव दासरवाड, रेंज फॉरेस्ट ऑफिसजवळ, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), वनक्षेत्र कार्यालय, मुखेड तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक (तेंदूपाने), नांदेड वन विभाग, कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३१

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. वडजे माधवराव रामराव, अपिलार्थी
मु. खंडगांव (ह) पोस्ट बोमनाळी, तालुका कंधार,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार,
तालुका कंधार, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास कोणत्याही विशिष्ट प्रकारची विनंती न करता फक्त त्यांनी या प्रकरणी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती सोबत जोडल्या असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बाराव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांची तपशीलवार माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी काही माहिती पंचायत समिती स्तरावरील होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे ती ग्रामसेवकाकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उर्वरित माहिती हवी असल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहितीपैकी पंचायत समिती स्तरावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २७-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिनाक ०३-०५-२००७ रोजी पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्याप्रमाणे संबंधित ग्रामसेवकाने अपिलार्थीस उर्वरित माहिती दिली किंवा कसे याची विचारणा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे केली असता त्यांनी उर्वरित माहिती अपिलार्थीस संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकामार्फत दिल्याचे सांगितले. मात्र यासंदर्भातील कोणताही सबळ पुरावा जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हे आयोगासमोर उपलब्ध करु शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती प्राप्त झाली आहे. प्राप्त माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थीने नमूद केलेल्या माहितीतील काही भाग ग्रामपंचायत स्तरावरील असल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज ग्रामपंचायतीकडे, सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठविणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे गरजेचे होते. मात्र त्यांनी तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. अशा प्रकारे त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने व अपूर्ण माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येते. तसेच आजमितीस देखील अपिलार्थीस उर्वरित माहिती मिळाली आहे किंवा कसे हे आवश्यक त्या पुराव्याअभावी आयोगास कळण्यास काहीही मार्ग नाही. कारण संबंधित ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाने त्यांच्याकडील ग्रामपंचायत स्तरावरील माहिती अपिलार्थीस दिल्यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही. अपिलार्थीस उर्वरित माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली आहे किंवा कसे याचा त्यांच्या स्तरावर व्यक्तिशः आढावा घेऊन, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नसल्यास, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत उर्वरित माहिती विनामूल्य प्राप्त होईल याची खात्री करुन घ्यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना अधिनियमातील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वडजे माधवराव रामराव, जिल्हा सदस्य भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन शाखा नांदेड मु. खंडगांव (ह) पोस्ट बोमनाळी, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३२

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्री. संतोष संग्राम पाटील, अपिलार्थी
मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै),
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगांव (खै),
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. श्रीराम बाबाराव भाकरे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहितीची कागदपत्रे दिली नाहीत. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्याची व्यवस्था

अद्यापपावेतो न केल्याने व जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक व शिस्तभंगाची कार्यवाही न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गडगा ते मुखेड रोडवरील दोन क्रॉसिंग व गडगा ते कहाळा रोडवरील दोन क्रॉसिंग या रस्त्यावरील श्री. श्रीराम बाबाराव भाकरे यांना दिलेल्या क्रॉसिंग मंजुरीची सत्यप्रत व याकरिता श्री. श्रीराम बाबाराव भाकरे यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा केलेल्या रकमेच्या पावत्यांच्या चलनाची सत्यप्रत ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२००७ रोजी अनधिकृत क्रॉसिंग केल्याबद्दल संबंधितांवर फौजदारी करण्याचे आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची वस्तुस्थिती आयोगास अवगत केली. यावरुन व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या दोन क्रॉसिंग मंजुरीची सत्यप्रत मागितली होती ती क्रॉसिंग अधिकृत क्रॉसिंग नव्हती. या रस्त्यावर त्यांनी ती अनधिकृतरित्या घेतली होती. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात अस्तित्वात नव्हती व त्यामुळे ती उपलब्धही नव्हती. परंतु अपिलार्थीने दिनांक ०९-०२-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस यासंदर्भातील

वस्तुस्थिती कळविली नाही. त्यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेले क्रॉसिंग अनधिकृत आहे, हे दिनांक ०६-०६-२००७ रोजी प्रथम कळविले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देत असतांना ती क्रॉसिंग अनधिकृत असल्याचे सिध्द झाले. श्री. श्रीराम बाबाराव भाकरे यांनी अनधिकृतपणे रस्ता खोदून घेतलेल्या कनेक्शनच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती कारवाई करुन दिनांक १०-०८-२००७ रोजी ते कनेक्शन तोडून व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविले. अपिलार्थीने या अपील अर्जाच्या संदर्भात मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये मागणी केलेली माहिती मूळात अस्तित्वात नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचा संबंध पोहोचत नाही. तथापि ही माहिती उपलब्ध नसल्याचे अथवा या प्रकरणातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस स्पष्ट करणे गरजेचे होते. परंतु त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता अंतीमतः अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००७ रोजी हे अनधिकृत कनेक्शन काढून टाकल्याचे कळविले. या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०६-२००७ रोजी म्हणजेच माहिती अधिकार अधिनियमामध्ये विहित केलेल्या कालावधीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास विलंबाने प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी सिध्द केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात या प्रकरणाची वस्तुस्थिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १४-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे स्पष्ट केली असल्याने व मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अस्तित्वातच नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष संग्राम पाटील, मु. पो. गडगा, तालुका नायगांव (खै), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, नायगांव (खै), जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६३३

निर्णय दिनांक १३-०५-२००९

१ श्रीमती रुक्मीनबाई भ्र. कै. सटवाजीराव खंडेराय, अपिलार्थी
नाईकवाडी गल्ली, बिलोली, तालुका बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांच्या वकिलासह, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती पुरविली नसल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पतीच्या रजेसंदर्भात व सेवापुस्तकाच्या प्रतीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. परंतु प्राप्त प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २३-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना त्यांच्या पतीच्या सेवापुस्तकाच्या संपूर्ण पानांच्या प्रतीची व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात केलेल्या विहित नमुन्यातील रजेच्या अर्जाच्या प्रतीची त्यांना आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती सात दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी सेवा पुस्तकाच्या सर्व पानांच्या प्रती दिल्या आहेत. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः १६ पानांच्या व त्याच्या शेवटच्या अशा एकूण २२ पानांच्या प्रती दिल्या आहेत. त्यांच्या पतीची रजा किती आहे हे जाणून घेण्यासाठी त्यांना त्यांच्या पतीच्या सेवा पुस्तकाच्या सर्व पानांची आवश्यकता आहे. अपिलार्थीने यासंदर्भात केलेल्या अर्जाच्या प्रतीची

देखील त्यांना आवश्यकता आहे. आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एकदाच न पुरविता वेगवेगळ्या टप्प्यावर व अर्धवट स्वरुपात पुरविली आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या प्रकरणाच्या सर्व मुद्दयांचा परामर्श जन अपिलीय अधिकारी यांनी वर संदर्भित केलेल्या निर्णयामध्ये घेतलेला आहे. त्यामध्ये या अपील निर्णयावरुन देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती पुरविली नसल्याचे तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील दाखल झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती पुरविली नसल्याचे सप्रमाण सिध्द होत असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने संबंधित जन माहिती अधिकारी हे अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत असल्याचे दिसून येत आहे. सबब संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मनातील, अथवा सेवापुस्तकातील अर्धवट माहिती दिली हा संभ्रम दूर होण्यासाठी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयामध्ये हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत बोलावून घ्यावे व अपिलार्थीस त्यांच्या पतीच्या सेवापुस्तकाची मूळ प्रत दाखवावी. अद्यापही मूळ सेवापुस्तकाच्या काही पानांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस दिली गेली नसल्यास ती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना दिली नसल्यास ती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्रीमती रुक्मीनबाई भ्र. कै. सटवाजीराव खंडेराय, नाईकवाडी गल्ली, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७७
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. वामनराव भिमराव पाटील, : अपिलार्थी
रा.उदगीर जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ३१.०३.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना, त्यांच्या सेवापुस्तिकेची सत्यप्रत देण्यात आलेली नाही. त्यांना सेवापुस्तिकेची खोटी प्रत देण्यात आली, ती सत्यप्रत देण्यात यावी. सिलींग प्रकरणी मा.उच्च न्यायालय खंडपीठ,नागपूर यांच्या निकालाची प्रत देण्यात आलेली नाही. ती त्यांना पुरविण्यात यावी व तसेच या प्रकरणी त्यांना माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी नियमबाहय रक्कम आकारली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २३.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या स्वतःच्या सेवापुस्तिकेची सत्यप्रत, सेवानिवृत्तीची रक्कम ज्या रेकॉर्डप्रमाणे काढली आहे त्या रेकॉर्डची सत्यप्रत व सिलींग प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,नागपूर यांच्या निकालाची सत्यप्रत- या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी ऑगस्ट १९९७ असा आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ३४०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या या शुल्कामध्ये जुने रेकॉर्ड शोधण्याकरिता लागणारे मनुष्यबळ,टाईपिंग खर्च याही बाबींचा समावेश केल्याचे या पत्रामध्ये नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.१८.०६.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर नेमकी काय कार्यवाही झाली याच्याशी संबंधित कागदपत्रे सुनावणीसाठी उपस्थित जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाकडेही उपलब्ध नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे. तथापि हा प्रतिसाद अवैध आहे. कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे कळविलेले शुल्क हे चुकीचे आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणाही अर्जदारास माहिती द्यावयाची झाल्यास जन माहिती अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचना क्र. आर.टी.आय. २००५/सी.आर.३१५/०५/५,दि.११.१०.२००५च्या तरतुदींचे पालन करुन त्यांनी अपिलार्थीस माहितीपोटी शुल्क आकारणे अपेक्षित आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून फक्त प्रतिपृष्ठ रु.२/- इतके

शुल्क आकारणे गरजेचे होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरले किंवा कसे यासंबंधीची कोणतीही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमधील मुद्दा क्र.१ व २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत आहे. मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. मा. उच्च न्यायालय,नागपूर खंडपीठाने नेमक्या कोणत्या तारखेस, कोणता निकाल दिला आहे, याच्या संदर्भात त्यांनी या प्रकरणाविषयी मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये स्पष्ट उल्लेख केला नाही.त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या मते त्यांनी अपिलार्थीस सेवापुस्तिकेची प्रत साक्षांकित करुन दिली आहे. ती त्यांनी अपिलार्थीस केव्हा पाठविली, हे कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे त्यांना सांगता येत नाही. अपिलार्थीचे आयोगाकडील द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस त्याच्या सेवापुस्तिकेची प्रत देण्यात आली असून त्यावर 'सत्यप्रत', असे साक्षांकित केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने ही माहिती सत्यप्रत म्हणून साक्षांकित करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिली आहे, असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती साक्षांकित करुन पाठविली किंवा कसे या संदर्भातील कोणतेही पुरावे, आज रोजी आयोगास सादर करण्यासाठी उपलब्ध नाहीत. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही खोटी आहे, असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केले आहे, ही माहिती खोटी कशी आहे, हे सिध्द करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत व तसेच यासंदर्भात कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये केलेले नाही. अपिलार्थीस येथे असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास, अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे, देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच प्रक्रिया अर्जदाराने माहिती मागणे व माहिती अधिकाऱ्याने ती अर्जदारास देणे अथवा न देणे यामध्ये

अभिप्रेत आहे. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती खोटी असल्याचे वाटत असेल तर त्यांनी या संदर्भातील आवश्यक ते पुरावे राज्य परिवहन महामंडळाच्या सक्षम प्राधिकरणाकडे सादर करुन, या संबंधीच्या आपल्या गाऱ्हाण्याची तड लावून घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपील अर्जामध्ये त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांनी नियमबाहय शुल्क भरुन घेऊन माहिती दिल्याचे नमूद केले आहे, यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या दि. १५.०५.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिलेला नाही. तसेच रु.३४०/- इतक्या शुल्कामध्ये जन माहिती अधिकारी यांनी माहिती शोधण्याचा खर्च, मनुष्यबळ,टाईपिंग खर्च अशाही खर्चाची आकारणी केलेली आहे, ती सर्वथा अवैध आहे.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रु.२/- या प्रमाणे शुल्क आकारावयास हवे होते, मात्र जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांचे दि. १५.०५.०२००७ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र हे आता अवैध ठरत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीस माहिती देण्याच्या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ सेवापुस्तिकेची प्रत त्यांना कार्यालयात बोलावून घेऊन दाखवावी व अपिलार्थीस त्यांची पूर्ण माहिती दिल्याचे दाखवावे व अद्यापही त्यांना सेवापुस्तिकेच्या काही पृष्ठांच्या सत्यप्रती द्यावयाचे राहीले असेल तर त्या प्रती त्यांनी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात व याचबरोबर त्यांच्या सेवानिवृत्ती रकमेचा तपशील त्यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित संपूर्ण माहिती व सेवापुस्तिकेची प्रत यापूर्वी साक्षांकित करुन दिली नसल्यास साक्षांकित करुन, त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटी स्वीकारलेल्या शुल्काची संपूर्ण रक्कम त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वामनराव भिमराव पाटील, नई आबादी,देगलूर रोड, कुमारस्वामी हॉस्पीटलमागे, मु.पो.ता.उदगीर जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७८
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
मु. पो. सताळा (खूर्द), ता.अहमदपूर,
जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
अहमदपूर जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर
जि. लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
अहमदपूर जि. लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.०३.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत बुध्दीपूर्वक माहिती उपलब्ध करुन न दिल्याने व त्यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई न केल्याने व्यथित होऊन त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे - "माहे जून २००७ मध्ये मौजे सताळा (खूर्द) ता. अहमदपूर येथील प्रति लाभार्थी २२५ रुपये लोक वर्गणी घेऊन तीस लाभधारक शेतकऱ्यांना सुधारीत तुर बियाणांचा व जिवाणु खतांचा आणि राखत व औषधांचा कृषी खात्यामार्फत वस्तुरुपाने पुरवठा केलेला असल्याची बनावट (खोटे) दस्तऐवज शासनास सादर करुन, वरील साहित्य- सामुग्रीचा परस्पर अपहार केलेला उघडकीस येऊ नये ?, म्हणून तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील सक्रीय अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १४ सप्टेंबर २००७ पासून मा. तालुका कृषि अधिकाऱ्यांनी वैयक्तिक जबाबदारीवर सुधारित तुर बियाणे वाणाची पेरणी व पिकवाढ पाहणी करुन, अतिदक्ष कार्यवाहीस्तव केलेल्या लिखीत कार्यवाहीची सत्यप्रतीत माहिती मला न्यायालयात सादर करण्यास अत्यंत आवश्यक आहे."- ही माहिती मागितली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३१.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्यांचे या संदर्भातील आदेश दि. ३१.०१.२००८ रोजी पारित केले. सदर आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती क्षेत्रीय तपासणी करुन तयार करावी लागणार होती, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ती देण्यासाठी १६ दिवसांचा विलंब झाल्याचे व यासाठी जन माहिती अधिकारी जबाबदार नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील त्यांनी निकाली काढले.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित असून त्यांनी असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणी विहित मुदतीत माहिती दिली नाही. त्यांना माहिती न मागण्यासाठी जन

माहिती अधिकारी यांनी आमिष दाखविले तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे सदर आमिष नाकारले व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. त्यांना जन माहिती यांच्याकडून दि. १३.११.२००७ रोजी सशुल्क माहिती प्राप्त झाली आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचा भंग केल्याने त्यांच्यावर प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात यावी अशी त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास अखेरीस विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. २०.९.२००७ रोजीचा मूळ अर्ज त्यांना दि. २७.९.२००७ रोजी प्राप्त झाला. तदनंतर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी दि. १५.१०.२००७ रोजी अपिलार्थीस, माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रु. ३१/- त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे कळविले व तदनंतर परत अपिलार्थीस दि. १३.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ४७/- भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने रु. ४७/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात दि. २६.११.२००७ रोजी केला. तथापि यापूर्वीच त्यांना दि. १३.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून माहिती दिली गेली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे काम किती अव्यवस्थितपणे चाललेले आहे, याचा प्रत्यय येतो. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस दि.१५.१०.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिल्याचे आयोगास सांगितले. तथापि दि. १५.१०.२००७ रोजी अपिलार्थीस पत्र पाठविल्यापृष्ठर्थ्य त्यांच्याकडे कोणताही पुरावा उपलब्ध नाही. अपिलार्थीस शुल्क भरण्यासाठी ज्या दिवशी पत्र लिहिले, त्याच दिवशी त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांना माहिती प्राप्त झाल्यानंतर केला. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी आहे, याचा स्पष्ट बोध होत नाही.

आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारी अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेल्या अहवालाच्या प्रतीची त्यांना

आवश्यकता होती व ती प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे,असे आयोगास सांगितले. अपिलार्थीची या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाली एवढीच हरकत आहे व याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगाने शास्ती लावावी, अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे. या प्रकरणाशी संबंधित वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १६ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन करण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून १६ दिवस इतक्या विलंबाने माहिती प्राप्त झाली, हा दावा सिध्द होत आहे. सबब या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, आयुक्त (कृषि) यांना त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर,मु.पो.सताळा (खुर्द), ता.अहमदपूर जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर,पुणे-५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७९
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. ससाणे प्रविण सुग्रीव, : अपिलार्थी
रा. अहमदपूर, जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
महात्मा फुले महाविद्यालय,
अहमदपूर, जि. लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
किसान शिक्षण प्रसारक मंडळ,
विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर
जि. लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : प्राचार्य,
महात्मा फुले महाविद्यालय,
अहमदपूर, जि. लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण,खोटी व दिशाभूल करणारी आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी रु.६७/- शुल्काचा तपशील उपलब्ध करुन दिला नाही. इ.बी.सी. मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांचे नाव व पत्ता, इ.बी.सी.मंजूर

झालेल्या विद्यार्थ्यांची वर्गनिहाय यादी, फ्रीशीप वाटप यासंदर्भात शासनाचे नियम, त्यांच्या प्रथम सत्र परीक्षा, सराव परीक्षा, घटक चाचणी याबद्दल त्यांनी भरलेल्या फीची, माहिती दिली नाही तसेच अपिलार्थीस मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम व शिष्यवृत्ती वाटप रजिस्टरमधील त्यांच्या नावाचा उल्लेख असलेल्या पृष्ठाची सत्यप्रत, ही माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची अपिलार्थीने अंतिमतः आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. ६७/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ११.०३.२००८ रोजी केला यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्याकडून रु. ६७/- इतके शुल्क भरुन घेऊन अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा कथित दि. २६.०३.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीच्या

प्रथम अपील अर्जावर ते सुनावणी घेऊ शकले नाहीत अथवा यासंदर्भात आपले कोणतेही निर्णय देऊ शकले नाहीत.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.६७/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. मात्र या पत्रामध्ये त्यांनी या रकमेचा तपशील, जो त्यांना अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे अपिलार्थीस देणे अनिवार्य आहे, तो त्यांनी अपिलार्थीस दिलेला नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने दि. ११.०३.२००८ रोजी रु.६७/-इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दि. १३.०३.२००८ रोजी अगर तत्पूर्वी देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. १८.०३.२००८ रोजी म्हणजेच पाच दिवसांच्या विलंबाने दिलेली आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची कृती पाच दिवस इतक्या विलंबाने केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय होत आहे. अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ६७/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांच्या आत परत करावे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. तथापि ही माहिती खोटी व दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती यांची तुलना करता जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीस अद्यापपावेतो अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील विद्यार्थ्यांचे पत्ते व त्यांना शिष्यवृत्तीचे वाटप कशाप्रकारे करण्यात आले, या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी ही माहिती अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून याप्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.६७/- त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**लातूर**
**दिनांक : १५-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. प्रविण सुग्रीव ससाणे, रा. सिध्दार्थनगर, नांदेड रोड, अहमदपूर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,महात्मा फुले महाविद्यालय,अहमदपूर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,किसान शिक्षण प्रसारक मंडळ,विद्यावर्धिनी हायस्कूल उदगीर, जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८०
निर्णय दिनांक १५-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. चक्रधर श्रीहरी मोरे,<br>मु.पो.पोहरेगाव ता.रेणापूर,<br>जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्राम विकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय, पोहरेगाव ता.रेणापूर,<br>जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती रेणापूर,जि.लातूर | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती,रेणापूर जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.११.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती मिळाली असून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. या प्राप्त झालेल्या माहितीमध्ये लोकवाटयासंदर्भातील अपेक्षित माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही, तसेच झालेल्या कामाच्या मोजमापपुस्तिकेची आणि महिला सक्षमीकरण योजनेच्या हिशोबाची त्यांना जन माहिती

अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झालेली नाही.त्यामुळे ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देण्याचे व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची त्यांनी आयोगास अपील अर्जाच्या अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि.२०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जल स्वराज्य प्रकल्पांतर्गत झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.०५.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३१.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली प्रकल्पाची माहिती पंचायत समिती रेणापूर पंचायत विभागात संकलीत केली असून सदर माहिती स्वतः उपस्थित राहून हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. तथापि दि.३०.०१.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी एकूण दोन टप्प्यात दि. ७.१२.२००७ व दि.१०.१२.२००७ रोजी आवश्यक त्या माहितीपैकी बरीचशी माहिती पुरविली असून अपिलार्थीस त्यांनी लोकवाटयासंदर्भातील माहिती दिली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आतापर्यंत न दिलेली माहिती ते दहा दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

खुद्द जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीने दि. २०.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीमधील काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ७.१२.२००७ व १०.१२.२००७ रोजी पुरविली असून उर्वरित माहिती ते अपिलार्थीस आता सात दिवसांत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये महिला सक्षमीकरण योजनेची माहिती त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही, असे म्हटले आहे, परंतु अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने या मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात मागितलेली नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावरील माहिती आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेगळया अर्जाद्वारे अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त करुन घ्यावी लागेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. चक्रधर श्रीहरी मोरे, मु.पो.पोहरेगाव ता.रेणापूर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत कार्यालय, पोहरेगाव ता.रेणापूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती,रेणापूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८१
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, : अपिलार्थी
रा.उदगीर,जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

त्रयस्थ पक्षः श्री. मारोती रामचंद्र जाधव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०२.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे टाळाटाळ करीत असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. मारोती रामचंद्र जाधव, सेवानिवृत्त शिक्षक यांची मूळ सेवापुस्तिकेप्रमाणे

जन्मतारीख व त्यांनी जोडलेल्या पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रती यांच्या साक्षांकित प्रतींची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०१.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अभिलेख्यात उपलब्ध असलेली कागदपत्रे अपिलार्थीस दिलेली आहेत व जी कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत, ती देणे माहिती अधिकाराखाली अपेक्षित नाही, असे अभिप्राय नोंदवून अपिलार्थीचे अपील त्यांच्या दि. १०.०३.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी ज्या त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे, ते त्रयस्थ पक्ष श्री.मारोती रामचंद्र जाधव हे याच शाळेचे माजी विद्यार्थी असून त्यांनी स्वतःच्या जन्मतारखेमध्ये बदल केल्याबाबत त्यांच्याविरुध्द तक्रार प्राप्त झाली असता, या शाळेतील जन्मतारखेशी संबंधित प्रवेशनिर्गम रजिस्टर गहाळ केले गेले, याचा परिणाम आता असा झाला आहे की, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वाढवणा बु. जि.लातूर या शाळेतील कोणत्याही माजी विद्यार्थ्यास जातीचे अथवा जन्म तारखेचे प्रमाणपत्र आता मिळू शकत नाही. त्यांनी संदर्भिय अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाल्यास व्यापक जनहित साध्य होणार आहे. त्यामुळे या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्रयस्थ पक्षाच्या जन्मतारखेसंदर्भात त्यांनी एस.एस.सी.बोर्डाकडे विचारणा केली असता, एस.एस.सी.बोर्डाने त्रयस्थ पक्षाच्या जन्मतारखेचे वर्ष १९४२ असे कळविले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तिकेची प्रत प्राप्त झाली आहे, त्यामध्ये त्यांच्या जन्मतारखेचे वर्ष १९४६ असे दर्शविले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे, ती कागदपत्रे पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडे उपलब्ध असावीत. १९८२ साली उस्मानाबाद जिल्हयाचे विभाजन होऊन उस्मानाबाद व लातूर असे दोन जिल्हे अस्तित्त्वात आले. मात्र त्यांच्याकडे अपिलार्थीने ज्या कागदपत्रांची माहिती मागितली आहे, ती कागदपत्रे जिल्हा परिषद उस्मानाबादकडून हस्तांतरित झालेली नाहीत. त्यामुळे ते अपिलार्थीस माहिती देऊ शकले नाहीत.

त्रयस्थ पक्ष आज त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत सूचना देऊनही आजच्या सुनावणीस उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १.२.२००८ रोजी प्रथम अपील अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दि. १४.०२.२००८ रोजी अपिलार्थीस पुरविली. मात्र यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या त्रयस्थ पक्षाच्या शैक्षणिक पात्रतेच्या सत्यप्रती अपिलार्थीस पुरविल्या नाहीत, ज्यांची त्यांना आज आवश्यकता आहे. वास्तविकतः प्रत्येक कर्मचाऱ्यांचा सेवाविषयक तपशील व सेवापुस्तिकेची प्रत कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे ही जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाची जबाबदारी आहे. त्यामुळे जरी उस्मानाबाद जिल्हयाचे १९८२ मध्ये विभाजन झाले असले तरी ज्या वेळी विभाजन झाले,त्यावेळी लातूर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील सर्व प्राथमिक शिक्षकांच्या सेवापुस्तिका व प्रमाणपत्राच्या प्रती शिक्षणाधिकारी (प्रा) जि.प.लातूर यांनी उस्मानाबाद जिल्हा परिषदेकडून हस्तगत करुन त्या जतन करुन ठेवावयास हव्या होत्या, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केलेली नाही. केवळ सध्याच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे अभिलेखे उपलब्ध नाहीत म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती सरसकट नाकारण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती आयोगास मान्य नाही. आता अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी उस्मानाबाद जिल्हा

परिषदेशी संपर्क साधून, त्रयस्थ पक्षाची पी.यु.सी व डी.एड्. परीक्षा ज्या प्राधिकरणाने घेतली आहे, त्या प्राधिकरणाकडे जन माहिती अधिकारी यांनी संपर्क साधून संबंधित प्राधिकरणाने त्रयस्थ पक्षास दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत प्राप्त करुन घेऊन, अपिलार्थीस देणे, या प्रकरणी अपिलार्थीस न्याय देण्याच्या दृष्टीने उचित राहिल, असे आयोगाचे मत आहे. अशाप्रकारे वेगवेगळया यंत्रणांशी संपर्क साधून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांना मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**लातूर**
**दिनांक : १५-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, गोविंदराज प्रिटींग प्रेस,बसवेश्वर चौक,रेल्वेस्टेशन रोड,उदगीर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८२
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. बी. एन.हारनूळे, : अपिलार्थी
रा. लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,मांजरी
ता.मुखेड,
जि. नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,मुखेड ता.मुखेड,
जि.नांदेड

त्रयस्थ पक्षः श्रीमती बेबी मुरली उमाटे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ११.०४.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो त्यांना आवश्यक ती माहिती दिली नसल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१०.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्रयस्थ पक्ष श्रीमती बेबी मुरली उमाटे यांची जन माहिती अधिकारी यांच्या शाळेतील विद्यार्थी प्रवेश-निर्गम नोंद रजिस्टरची विहित नमुन्यातील प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०४.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती साध्या टपालाद्वारे पाठवून दिली होती, ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. २१.०४.२००८ रोजी अपिलार्थीस परत अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य माहिती पाठविली. तथापि या पूर्वीच अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०४.२००८ रोजी द्वितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०७.०४.२००८ व १५.०४.२००८ रोजी माहिती पाठविल्यापृष्ठर्थ्य आयोगासमोर आवश्यक तो पुरावा सादर केला आहे, हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावर वेगळयाने विचार करण्याचे प्रयोजन आयोगास दिसून येत नाही. मात्र या ठिकाणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या माहितीसाठीच्या प्रत्येक अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करणे त्यांना अनिवार्य आहे, अशी समज त्यांना आयोगातर्फे देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील, त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांना आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज केल्यानंतर मिळाली असल्याने, निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बी. एन.हारनुळे,केशवनगर,जुना रेणापूर नाका,अंबाजोगाई रोड,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,मांजरी ता.मुखेड,जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती,मुखेड ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ३८३/०८,३८४/०८,३८५/०८ व ३८६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८३,३८४,३८५ व ३८६
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
रा.उदगीर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ व २ अपील क्र.३८३/०८ व ३८५/०८

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>आगार प्रमुख (वरिष्ठ),<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ,उदगीर,जि.लातूर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ, लातूर विभागीय<br>कार्यालय,लातूर | : प्रतिवादी |

३ अपील क्र.३८४/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>विधी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ,लातूर जि.लातूर | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ, लातूर विभागीय<br>कार्यालय,लातूर |

४ अपील क्र.३८६/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>कर्मचारीवर्गअधिकारी (से.मं.),<br>कर्मचारीवर्ग खाते,<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय<br>मुंबई. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>महाव्यवस्थापक (क. व औ.सं.),<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन<br>महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय मुंबई. |

त्रयस्थ पक्ष : अपील क्र.३८५/०८
श्री. बी.जी.माने
अपील क्र.३८६/०८
श्री. श्रीधर भिमराव पाटील

**निर्णय**

वरील प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्र. ३८३/०८, ३८४/०८ व ३८५/०८ या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच अपील क्र.३८६/०८ या प्रकरणातील जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व संबंधित त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०४.२००८ रोजी नोंदविलेली अपिले, क्र. ३८३/०८ व ३८६/०८ आणि दि. १३.०५.२००८ रोजी नोंदविलेली अपिले, क्र.३८४/०८ व ३८५/०८ ही चार स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. अपिलार्थीने ही सर्व अपिले राज्य परिवहन महामंडळाविरुध्द आयोगाकडे केली असल्याने या सर्व अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

**<u>अपील क्र.३८३/०८ :</u>**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी फक्त ४ मुद्यांची माहिती दिली असून ती माहिती खोटी आहे. अपिलार्थीस, "राज्य परिवहन आगार उदगीर यांनी जेष्ठ नागरीक ओळखपत्र वाटप बंद झाल्यानंतर शिल्लक जेष्ठ नागरीक ओळखपत्र विभागीय कार्यालयात ज्या पत्राद्वारे पाठविली, त्या पत्राची सत्यप्रत,शिल्लक जेष्ठ नागरीक ओळखपत्राचा पहिला ते शेवटचा क्रमांक याची सत्य माहिती व जेष्ठ नागरीक ओळखपत्र नागरीकांना वाटप करण्यात आलेल्या रजिस्टरची सत्यप्रत" ही माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांना अद्यापपावेतो त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती द्यावयाची राहिली असल्याची जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूली दिली व ही माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याची त्यांनी तयारी दर्शविली. यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही संबंधित कागदपत्रे उपलब्ध नाहीत अथवा त्यांना आयोगास कोणत्याही प्रश्नाची समाधानकारक

उत्तरे देता आली नाहीत. अपिलार्थीस प्रथमतः या प्रकरणी अपूर्ण माहिती मिळाल्याचे येथे सिध्द होत आहे, मात्र ही माहिती खोटी कशी आहे, हे आयोगासमोर सिध्द करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आता उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जाप्रमाणे त्यांना संपूर्ण माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मुंबई यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्र.३८४/०८ :**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिली असून त्यांना पत्रव्यवहाराच्या सत्यप्रतीची माहिती देण्यात आली नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने दुसरा असा मुद्दा उपस्थित केला आहे की, विभाग नियंत्रक यांनी मा. न्यायालयाच्या नावाखाली प्रतिवादी क्र.४ च्या विरुध्द असणाऱ्या तक्रारीच्या प्रती मागवून घेण्याचे कारण काय होते, याची लेखी सत्य माहिती देण्यात आली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध सर्व माहिती 'सत्यप्रत' अशी साक्षांकित करुन पुरविली आहे. अपिलार्थीने आयोगाकडे विभाग नियंत्रक यांनी प्रतिवादी क्र.४ च्या विरुध्द असणाऱ्या तक्रारीच्या प्रती मागवून घेण्याचे कारण काय होते, या मुद्यावर त्यांनी मूळात त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये माहिती मागितली नाही आणि जरी ही माहिती त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितली असती तरी ती अपिलार्थीस देय होत नाही, कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार कोणत्याही अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्या कोणत्याही निर्णयासंदर्भात अथवा कृतीसंदर्भात कारणे अथवा त्यांचे खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी

माहिती विचारणे हेच मूळात, माहिती अधिकार अधिनियमातील, अर्जदाराने माहिती मागणे व जन माहिती अधिकारी यांनी ती अर्जदारास पुरविणे, या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील दुसऱ्या मुद्यावरील माहिती त्यांना देय होत नाही. अशारितीने अपिलार्थीने आयोगाकडे उपस्थित केलेले दोनही मुद्दे, वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे आढळल्याने अपिलार्थीचे अपील क्र. ३८४/०८ फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

**अपील क्र.३८५/०८ :**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या त्रयस्थ पक्ष श्री. बी.जी.माने यांच्यासंदर्भात नेमकी मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही व त्यांनी मागणी केलेली माहिती न देता त्यांचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांनी निकाली काढले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना त्यांनी मागितलेली माहिती, "कार्यालयाकडून घेऊन जाणार" असे अभिप्राय त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये दिले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केल्यापासून अपिलार्थी ही माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न झाल्याने ही माहिती अपिलार्थीस प्राप्त होऊ शकली नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून अपिलार्थीस ती सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास ते तयार आहेत. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवून देखील ते ही माहिती त्यांच्याकडून घेऊन गेले नाहीत. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच

तीस दिवसांच्या आत कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून विनामूल्य व व्यक्तिश: हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

**अपील क्र. ३८६/०८:**

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सत्यप्रत करुन देण्याचे नाकारल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. श्रीधर भिमराव पाटील यांच्यासंदर्भात काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्यालयात उपलब्ध होती, ती राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई येथील कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१२.०२.२००८ रोजी पुरविली आहे, ती माहिती साक्षांकित करुन देण्यासाठी ते तयार असून अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सत्यप्रतीतील माहिती त्यांनी आयोगास दाखविली. ही माहिती सर्वसाधारणपणे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये सत्यप्रतीमध्ये माहिती मागविली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती सत्यप्रतींच्या स्वरुपात प्रथमत: देणे अनिवार्य होते, तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी सत्यप्रतीत केलेली माहिती आयोगास दाखविली. सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीच्या उपरोक्त चारही द्वितीय अपिलांवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. ३८३/०८ व क्र. ३८६/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र.३८३/०८ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. अपील क्र.३८६/०८ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सत्यप्रतीच्या स्वरुपात व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,मुंबई यांना अपील क्र.३८३/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

५. अपील क्र.३८४/०८ फेटाळण्यात येत आहे.

६. अपील क्र.३८५/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १५-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर, बीदररोड, मु.पो.ता.उदगीर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार प्रमुख (वरिष्ठ),महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,लातूर

जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा कर्मचारीवर्गअधिकारी (से.मं.), कर्मचारीवर्ग खाते,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय, वाहतुक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, लातूर विभागीय कार्यालय,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (क. व औ.सं.), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय, वाहतुक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय, वाहतुक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई-८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८७
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ श्री.पांडुरंग रामराव कदम, : अपिलार्थी
मु.पो.देवणी ता.देवणी जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,देवणी,
जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,लातूर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, तत्कालीन व सध्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, पंचायत समिती,देवणी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती दोन महिन्यांनंतर टपालाद्वारे दि. २४.०३.२००८ रोजी पाठविली. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबामुळे त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई करण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जवाहर विहिर अनुदानासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.२.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जवाहर विहिर योजनेच्या निकषाच्या प्रती तीस दिवसांच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. मात्र जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई आदेशित न केल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवाद केला. सुनावणीच्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ. यु.पी.बिरादार याही उपस्थित आहेत. उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करता अपिलार्थीस जी माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दि. २४.०२.२००८ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होते, ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि. १९.०३.२००८ रोजी म्हणजेच २२ दिवसांच्या विलंबाने प्राप्त झाली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना या विलंबाचे कारण विचारले असता, त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी त्यांच्याकडे केली, त्यावेळी देवणी तालुक्याची नव्याने निर्मिती झाली होती, तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कृषि विस्तार अधिकारी यांच्या ताब्यात होती, ते श्री. बाजगे हे मयत झाल्याने अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती त्यांना देण्यास विलंब झाला. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विनामूल्य प्राप्त झाली आहे. मात्र ही माहिती

देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडून २२ दिवसांचा विलंब झालेला असल्याचे दिसून येते.अशाप्रकारे अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व याद्वारे स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १५-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पांडुरंग रामराव कदम,मु.पो.देवणी (जिवणे गल्ली) ता.देवणी जि.लातूर-४१३५१९

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,देवणी जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३८८
निर्णय दिनांक १५-०५-२००९

१ सौ. भारती अनंतराव स्वामी, : अपिलार्थी
रा.उदगीर,जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
शिरुर अनंतपाळ,ता.शिरुर अनंतपाळ,
जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
शिरुर अनंतपाळ,ता.शिरुर अनंतपाळ,
जि.लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
शिरुर अनंतपाळ,ता.शिरुर अनंतपाळ,
जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २०.०५.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित डिसेंबर २००७ ते २००८, २००९ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या मौ. थेरगाव, तळेगाव,सुमठाणा व डिगोळ येथील कामांच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये- मजूरांची देयक पत्रके, रेट लिस्ट, कामाच्या कार्यारंभ आदेशाच्या प्रती, मजूरांच्या सुखसोयींवर केलेला खर्च, तहसीलला पाठविलेल्या साप्ताहिक अहवालात व प्रत्यक्ष हजेरीमध्ये तफावत आहे काय? किती हेक्टरचा एक गट असतो. सबंध गटातील काम पूर्ण की अपूर्ण ? सदरील कामावरील वेगवेगळया गावातील कामावर मजूर स्थानिकचेच आहेत काय,का बाहेरचे आहेत, काम अंगावर की हजेरीवर याबाबतची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १९.३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दि. ०३.०७.२००८ रोजी प्राप्त झाला. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भातील आपला निर्णय अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २३.०७.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थी हे सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याने त्यांचा अर्ज फेटाळल्याचे, अपिलार्थीस कळविले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने दि. २६.०५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीचा व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ ते ९शी संबंधित माहिती अपिलार्थीस देय होत नाही.कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीशी सुसंगत नाही. मुद्दा क्र.५ ते ९ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे वैयक्तिक अभिप्राय व मते मागितल्याचे दिसून येते. अशाप्रकारची माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नाही. मात्र उर्वरित माहिती म्हणजेच मजूरांची देयकपत्रके, रेटलिस्ट,कामाचा कार्यारंभ आदेश व मजूरांच्या सुखसोयींवरील खर्चाची माहिती, ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीने दि.११.०२.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून डिसेंबर, २००७ ते २००८, २००९ या कालावधीतील माहिती मागविली आहे. यावरुन अपिलार्थीस भविष्यकाळातील माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते, जी जन माहिती अधिकारी यांना विहित मुदतीत देता येणे शक्य नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केलेल्या दिनांकापर्यंतचीच माहिती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस देऊ शकतात. जन माहिती अधिकारी हे त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही, असे आयोगास अवगत करुन देत आहेत, तथापि यासंदर्भात अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाची जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची पोचपावती सादर केल्याने जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, हा युक्तिवाद आयोग फेटाळून लावत आहे.

वरील सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ मध्ये अपिलार्थीस ज्या जागेवरील कामाच्या माहितीची अपेक्षा आहे, त्या स्थळांची नावे व मुद्दा क्र.२ ते ४ शी संबंधित दि. ०१.१२.२००७ ते ११.०२.२००८ या कालावधीतील वरील मुद्यांवरील संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशःव विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, या कालावधीमध्ये त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन संबंधितांकडून व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. या कालावधीनंतर ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जाच्या संदर्भाने देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. २ ते ४ च्या संदर्भातील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १५-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ.भारती अनंतराव स्वामी,ब्राम्हणगल्ली (पेठ दरवाजा) उदगीर, ता.उदगीर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय शिरुर अनंतपाळ,ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,शिरुर अनंतपाळ,ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६६
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सूर्यकांत काशिनाथ सगर,<br>रा.मु.पो.वलांडी,ता.देवणी,जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर विभाग,लातूर | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०४.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, शिक्षण उपसंचालक,लातूर यांच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, असे दि. ०३.०९.२००७ रोजी शिक्षणाधिकारी यांनी त्यांना पत्र दिले व दि. ११.९.२००७ रोजी शिक्षण उपसंचालक यांनी पत्र देऊनसुध्दा त्यांना आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे,शिक्षण उपसंचालक यांच्या दि. ३०.१०.२००६ रोजीच्या पत्रावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.अपिलार्थीस ही माहिती न्यायालयाच्या कामासाठी आवश्यक आहे, असे अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. ०३.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन शिक्षण उपसंचालक यांच्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे आदेश निर्गमित केल्याचे अथवा या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार अपिलार्थीशी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये शिक्षण उपसंचालक यांच्या ज्या पत्राचा उल्लेख केला आहे, त्या पत्रावर त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस दि. ०३.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने अपिलार्थी हे ही माहिती स्वतः घेऊन जातील, अशी संबंधित जन माहिती अधिकारी यांची अपेक्षा होती. तथापि माहिती घेण्यासाठी अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध न झाल्याने शेवटी त्यांनी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरित केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.०९.२००७ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अपिलार्थी यांचे होते. या प्रकरणी अपिलार्थीने या उत्तरदायित्त्वाचे पालन केले असल्याचे आयोगास आढळून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज व आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना दि. ०३.०१.१९९३ च्या सुधारित संच मान्यतेनुसार त्यांना सेवाजेष्ठतेप्रमाणे पदोन्नती न देता अपिलार्थीपेक्षा कनिष्ठ कर्मचाऱ्यांना दिली असल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. अपिलार्थीस त्यांच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे कार्यवाही करुन हवी आहे. तथापि अशाप्रकारच्या प्रशासकीय बाबीतील कार्यवाही करण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या स्तरावरुन आदेश देणे व त्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या प्रशासकीय कामात अनावश्यकरित्या हस्तक्षेप करणे आयोग या ठिकाणी उचित समजत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेतल्या असता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यकांत काशिनाथ सगर,रा.मु.पो.वलांडी,ता.देवणी,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६७
निर्णय दिनांक   १६-०५-२००९

१ श्री. गणेश किसनराव हणमंते, : अपिलार्थी
रा.अहमदपूर जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर,जि.लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,
महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर
जि. लातूर.

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : सचिव,
विचार विकास मंडळ,अहमदपूर,जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत व अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.०३.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०२.२००८ रोजीच्या पत्राची प्रत न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १९.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयातून सन २००० सालापासून विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषाखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते व त्याचा पुरावा म्हणून त्यांच्या रेशनकार्डची झेरॉक्स प्रत मूळ अर्जासोबत जोडली होती.

अपिलार्थीच्या, या मूळ अर्जासोबत जोडलेल्या दारिद्रयरेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधतेविषयी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या दि. ०७.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, वैध पुरावा महाविद्यालयाकडे सादर करण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने उलट याबाबत जन माहिती अधिकारी यांना तहसीलदार,अहमदपूर यांच्याकडे परस्पर संपर्क साधण्याचे सूचित केले. यानुसार जन माहिती अधिकारी यांनी तहसीलदार,अहमदपूर यांच्याशी संपर्क साधला असता, तहसीलदार, अहमदपूर यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचे जन माहिती अधिकारी यांना कळविले.

अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द न झाल्याने जन माहिती अधिकारी यांनी स्वाभाविकत: अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे नाकारले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारलेले नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त करुन घ्यावयाची आहे. ही माहिती सशुल्क घेण्याची अपिलार्थीची तयारी नाही. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नसल्याचा जन माहिती अधिकारी यांना तहसीलदार,अहमदपूर यांनी दाखला दिला आहे आणि याही उपर अपिलार्थीने दि. १४.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेली माहिती पाहून त्यांचे समाधान झाले असल्याचे त्यांच्या दि. १४.०५.२००९ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये कबूल केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे,  त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देखील मानले आहेत. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत, या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार केल्यास, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त

करुन घेण्यामध्ये थोडेसेही स्वारस्य असल्याचे आयोगाच्या निदर्शनास येत नाही, हे पाहता, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश किसनराव हणमंते,रा.समतानगर कोर्टाच्या पाठीमागे, अहमदपूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, विचार विकास मंडळ, अहमदपूर जि. लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६८
निर्णय दिनांक १६-०५-२००९

१ श्री. सूर्यभान वामनराव चिखले, : अपिलार्थी
मु. शेल्हाळ,पो.तोंडचिर,ता.उदगीर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,उदगीर जि.लातूर

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्राम पंचायत शेल्हाळ,ता.उदगीर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,उदगीर जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १२.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वेळीच माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ०२.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००६-०७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदरचा अर्ज गट विकास अधिकारी यांना उद्देशून केला होता. मात्र या प्रकरणी गट विकास अधिकारी हे माहिती अधिकारी नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा हा अर्ज या प्रकरणाशी संबंधित माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केलेल्या ग्रामसेवक यांच्याकडे त्यांच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पाठविला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.१२.२००७ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नियमानुसार तात्काळ माहिती देण्याचे गट विकास अधिकारी यांना सूचित केले. तदनंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केले, तथापि या माहितीमध्ये त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीतील धान्यवाटप मजूरांची यादी त्यांना प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये ही यादी असल्याचे आयोगास दाखविले, मात्र अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे पडले. तेव्हा उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्याचे मान्य केले. अशाप्रकारे अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर प्राप्त झाली आहे आणि ही माहिती देण्यासाठी संबंधित ग्राम सेवकास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंब लागला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत संबंधित ग्रामसेवक जबाबदार असल्याचे दिसून येते. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित ग्रामसेवकावर, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या

अभावाबद्दल प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सूर्यभान वामनराव चिखले, मु. शेल्हाळ,पो.तोंडचिर,ता.उदगीर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, शेल्हाळ, ता.उदगीर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३६९
निर्णय दिनांक १६-०५-२००९

१ श्री. शेषेराव संभाजी अनसरवाडे, : अपिलार्थी
रा.तांबरवाडी ता.औसा,
जि.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.
उपविभाग, किल्लारी,जि.लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.
विभागीय कार्यालय,निलंगा,जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०५.०१.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले असून, अपिलार्थीने आयोगाकडे विचाराधीन अपील अर्ज त्यांच्या घरच्या विजेच्या बीलाची रक्कम रु.३०,००० वरुन एकदम ४,००० कशी करण्यात आली, हे जाणून घेण्यासाठी त्यांनी केला असल्याचे अपिलार्थीने यामध्ये शेवटी नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १६.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीमध्ये, त्यांचे मीटरचे कनेक्शन केव्हा घेतले, दि. २६.८.२००५ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत बिलाच्या झेरॉक्स प्रती, मीटर कोणत्या तारखेला जन माहिती अधिकारी घेऊन गेले त्याचा दिनांक व मीटर नेण्याच्या अगोदर अपिलार्थीस देण्यात आलेल्या नोटीसची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु.४/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २३.०८.२००७ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२४.८.२००७ रोजी काही माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निरर्थक पत्रव्यवहार केला व यासंदर्भात कोणताही अंतिम निर्णय अपिलार्थीस कळविला नाही. या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती आयोगास दाखविली. त्यांनी दाखविलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २४.८.२००७ रोजी दिलेली कथित माहिती यामध्ये फरक आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी यापूर्वी पुरविलेल्या दि. २४.०८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, या मुद्याद्वारे अपिलार्थीचे कनेक्शन तोडण्याबाबत त्यांना देण्यात आलेल्या नोटीसच्या प्रतीची झेरॉक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नाही,

यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत कले की, ग्रामीण भागामध्ये बऱ्याच वेळा अशाप्रकारच्या नोटीस संबंधित ग्रामस्थ स्वीकार करीत नसल्यामुळे अथवा सदर नोटीस स्वीकारण्यास संबंधित ग्रामस्थ प्रत्यक्षात जागेवर उपस्थित नसल्यामुळे ग्रामीण भागात नोटीस देण्याची पध्दत नाही. वास्तविकतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अशाप्रकारची नोटीस अपिलार्थीस दिली नाही, असे स्पष्टपणे कळविणे आवश्यक होते. मात्र अशाप्रकारची कोणतीही माहिती या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०८.२००७ रोजी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये उपलब्ध नाही, यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती न दिल्यामुळे, आता अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांनी या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४/- इतके त्यांना परत करावे लागेल. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पाठविली आहे. मात्र अपिलार्थीस जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अपिलार्थीचे प्रतिनिधी सांगत आहेत, ती माहिती पूर्णपणे वेगळी आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी आज रोजी आयोगास दाखविलेली माहिती व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ शी संबंधित माहिती अशी संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु. ४/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडील अपील अर्जामध्ये त्यांच्या बिलाची रक्कम रु.३०,०००/- वरुन रु.४,०००/- ही का झाली, हे त्यांना जाणून घ्यावयाचे आहे, असे म्हटले आहे. तथापि या मुद्याचा समावेश अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये, 'आवश्यक माहिती' या सदराखाली केला नसल्याने अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग विचारात घेत नाही. या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने प्रथमतः चुकीचे बील दिले होते, तदनंतर अपिलार्थीच्या विजेच्या

सरासरी वापराच्या निकषाचा आधार घेऊन त्यांना त्यांनी रु.३०,०००/- वरुन रु.४,०००/- इतके वीजबिल आकारले गेले आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.४/- इतके त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेषेराव संभाजी अनसरवाडे,रा.तांबरवाडी ता.औसा,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.उपविभाग, किल्लारी,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.विभागीय कार्यालय,निलंगा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७०
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. विजय मन्मथप्पा जनगावे,<br>रा.इंदिरानगर, काळेगावरोड,<br>अहमदपूर, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापिका,<br>व्यंकटेश हायस्कूल,लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद,लातूर. | | |

त्रयस्थ पक्ष : १. श्री. दिगंबर भास्करराव आळंदकर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १३.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे,त्रयस्थ पक्ष श्री. विजय मन्मथप्पा जनगावे व श्री. दिगंबर भास्करराव आळंदकर यांच्या शाळा सोडल्याच्या निर्गम उताऱ्याची झेरॉक्स प्रत व त्रयस्थ पक्ष हे जन माहिती

अधिकारी यांच्या शाळेत येण्यापूर्वी कोणत्या शाळेत होते, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.१.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दि.२०.०२.२००८ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १९.०२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने ही माहिती प्राप्त होण्यापूर्वी राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहिती मागतेवेळी त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाले होते व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या कपाटात होती, त्या कपाटाचा वेळीच शोध न लागल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी उशिर झाला. परंतु अपिलार्थीस त्यांनी आता त्रयस्थ पक्ष श्री. जनगावे यांच्यासंदर्भात माहिती दिली असून अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेले दुसरे त्रयस्थ पक्ष, श्री. दिगंबर भास्करराव आळंदकर हे त्यांच्या विद्यालयाचे विद्यार्थी नसल्याचे त्यांना आढळले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दि. १९.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीस माहिती पोस्टाने पाठविल्यापृष्ठयर्थ त्यांनी योग्य तो पुरावा आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि. १९.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाल्याचे अनुमान आयोग काढत आहे. अपिलार्थीस जरी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता प्राप्त झाली असली तरी अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिली असून त्यांनी वरील परिच्छेदात विलंबाच्या समर्थनार्थ केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करीत

आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय मन्मथप्पा जनगावे,रा.इंदिरानगर काळेगावरोड,अहमदपूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,व्यंकटेश हायस्कूल,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७१
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अलिमोद्दीन मेहताबसाब,<br>रा.मुर्गीचौक, देवणी ता.देवणी, जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>गुलशन ए अतफाल,<br>ऊर्दू प्राथमिक शाळा देवणी,<br>ता.देवणी जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद,लातूर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. ०८.०२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मुख्याध्यापक,गुलशन ए अतफाल, ऊर्दू प्राथमिक शाळा,देवणी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागील तीन वर्षामध्ये जन माहिती अधिकारी यांनी गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती,देवणी यांच्याकडे शाळेच्या विद्यार्थ्यांकरिता मिळत असलेल्या शालेय पोषण आहारासाठी तांदूळाची त्यांनी मागणी केली होती काय? केली असेल तर मागणीपत्राची नक्कल व मागणी केली नसेल तर मागणी न करण्याची कारणे ही माहिती मागितली होती, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो त्यांना माहिती प्राप्त झाली नाही. यासंदर्भात त्यांनी

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले असता, त्या अपिलावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०९.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केलेली माहिती मागितली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद,लातूर यांच्याकडे केल्याचे दिसून येते. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने माहितीसाठीचा त्यांचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्यावेळी केला होता, त्यावेळी श्री. मोमिन अब्दुल अजीज नावाचे मुख्याध्यापक कार्यरत होते, ते सध्या अनधिकृतरित्या गैरहजर असून त्यांनी श्री. मोमिन अजीज यांच्या, या अनधिकृत गैरहजेरीबाबत संस्थेच्या सचिवांना कळविले आहे, परंतु संस्थेचे सचिव त्यावर कोणतीही कारवाई करीत नाहीत. अपिलार्थीच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज हा, संबंधित मुख्याध्यापक यांच्याकडे शाळेचे सर्व रेकॉर्ड (कागदपत्रे) असल्याने, आता तो उपलब्ध होऊ शकत नाही. या कारणामुळे त्यांना अपिलार्थीस ही माहिती देता आली नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थी हे संबंधित शिक्षण संस्थेच्या गलथान कारभारामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित राहिले आहेत. सबब सध्याचे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत प्रथमतः अपिलार्थीकडून प्राप्त करुन घ्यावी व तदनंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित गट शिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये जाऊन उपलब्ध करुन घेऊन अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी व मागणी केली नसल्यास

अपिलार्थीस तसे वरील परिच्छेदात दिलेल्या सूचनेप्रमाणे कळवावे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, तत्कालीन मुख्याध्यापकाने गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे शालेय पोषण आहाराची मागणी केली होती का, असल्यास त्या मागणीपत्राची नक्कल, एवढीच माहिती त्यांना देय होत आहे. या अर्जातील उर्वरित माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

प्रसंगावशात, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीला विचाराधीन अर्जाशी संबंधित शिक्षण संस्था कोणत्याही प्रकारे प्रतिसाद देत नाही. संबंधित संस्थेस शासनाकडून शिक्षकांच्या वेतनाचे अनुदान प्राप्त होत असते, मात्र या संस्थेमध्ये माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी कितपत केली जाते,याची तपासणी देखील संबंधित शिक्षणाधिकारी यांनी केल्याचे दिसून येत नाही. सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना अशी शिफारस करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी खाजगी प्राथमिक शाळा अधिनियम १९८१ नुसार या संस्थेवर कारवाई करावी. त्याचबरोबर त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व शाळांमध्ये माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी कशाप्रकारे होत आहे, याची तपासणी त्यांनी त्यांच्या अधिपत्त्याखालील शाळांची वार्षिक तपासणी करताना करावी, असेही त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शेख अलिमोद्दीन मेहताबसाब,रा.मुर्गीचौक, देवणी ता.देवणी, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,गुलशन ए अतफाल ऊर्दू प्राथमिक शाळा देवणी,ता.देवणी जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७२
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अंकुश रामचंद्र चामे,<br>मु.पो.चिखली, ता.अहमदपूर,जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>श्रीनिवास निवासी मतिमंद विद्यालय,औसा,<br>ता.औसा,जि.लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>समाजकल्याण अधिकारी गट-अ,<br>जिल्हा परिषद,लातूर. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वकील व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०३.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. २९.१०.२००७ रोजी त्यांच्या संस्थेशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी व काही कागदपत्रांची माहिती मागितली होती. तथापि त्यांच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी दि. १८.१२.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

प्रथम अपील केले असता, त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे काही माहिती व काही अभिलेखे तपासणीकरिता मागितली होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी वर्ग-अ जिल्हा परिषद लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते, सबब अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन जन अपिलीय अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले अंतिम निर्णय पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१८.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब

क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अंकुश रामचंद्र चामे,मु.पो.चिखली ता.अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,श्रीनिवास निवासी मतिमंद विद्यालय,औसा,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी गट-अ,जिल्हा परिषद,लातूर यांना अपिलार्थीच्या दि.१८.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७३
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. भास्कर नारायणराव लहाने,<br>रा. भाग्यनगर,नांदेडरोड,अहमदपूर,जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अहमदपूर,<br>जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी ,अहमदपूर,<br>जि.लातूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती दिली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१०.२००७ रोजी घेतलेल्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची विनामूल्य माहितीची मागणी मान्य केली होती, त्यांच्याकडे माहिती देण्यासाठी लागणारा खर्च रु. २२४०/- भागविण्यासाठी अनुदान शिल्लक नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दि. १६.११.२००७ रोजी अनुदान प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविली जाईल, असे आश्वासित केले. तथापि अद्यापपावेतो त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. त्यांना माहिती प्राप्त न होण्यासाठी सर्व संबंधित जन माहिती

अधिकारी जबाबदार असल्याने त्या सर्वांवर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे शास्ती लावावी व शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शासनास शिफारस करावी, अशी त्यांनी या अर्जामध्ये अखेरीस आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०६.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - मौजे सताळा गट क्र. १/१, १/२, १/३ स.पा.बं., गुंजोटी गट क्र.१/४,१/७,१/९ स.पा.बं., किनगाव गट क्र.४/७,८/१,स.पा.बं.,चिलखा गट क्र.२/१, २/२ मा.ना.बं., या गटांतील कामांशी संबंधित मजूरांचे हजेरी पत्रक व मापन पुस्तिकेतील नोंदीच्या छायांकित प्रती, किनगाव मंडळ कृषि अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व सज्ज्यातील कृषि सहायकांनी दिलेल्या मजूरांच्या अहवालाच्या छायाप्रती- अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु. २२४०/- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २१.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक ते अनुदान प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविण्याचे आश्वासित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने युक्तिवाद केला. अपिलार्थीने त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे युक्तिवाद केला. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधित मंडळ कृषि अधिकारी व तसेच लेखा विभागाशी संबंधित होती. संबंधितांकडून आवश्यक ती माहिती वेळेत प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीस वेळेत माहिती पुरविता आली नाही. संबंधितांकडून त्यांना जी काही अपूर्ण स्वरुपात

माहिती उपलब्ध झाली होती, त्या माहितीकरिता लागणारे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.९.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयातील १८८० या क्रमांकाच्या पत्रान्वये कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना हे पत्र प्राप्त झालेले नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, याप्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २००५ मधील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी पूर्णतः सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. मूळात अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०९.२००७ रोजी अगर तत्पूर्वी अपिलार्थीस कळविणे भाग असताना त्यांनी आवश्यक त्या शुल्काची कल्पना अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्याकडील दि.१८.०९.२००७ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच, अधिनियमातील माहिती देण्यासाठीचा विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिली आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निःसंशयपणे विनामूल्य माहिती देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस देण्यासाठी आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी न दिल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही, असा युक्तिवाद केला. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व कर्मचारी/अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, ही तरतुद पाहता, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थीस अद्यापपर्यंत माहिती न पुरविण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी हे एकत्रितपणे, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल ो जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक आयोगासमोर उपस्थित नाहीत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल या सर्वांना एकत्रितपणे प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक जबाबदार असल्याचे त्या सर्वांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्या सर्वांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकत्रितपणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा एकत्रित खुलासा या सर्वांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने,रा. भाग्यनगर,नांदेडरोड,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.(आर.पी.ए.डी.द्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७४
निर्णय दिनांक १६-०५-२००९

१ श्री. भास्कर नारायणराव लहाने, : अपिलार्थी
रा. भाग्यनगर,नांदेडरोड,अहमदपूर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग अहमदपूर
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपअभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग अहमदपूर
जि.लातूर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०२.२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत माहिती दिली नाही. त्यांना हवी असलेली माहिती न देता, दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी माहितीशी संबंधित असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांवर अधिनियमातील कलम २०(१) अन्वये प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे शास्ती लावण्यात

यावी, तसेच त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी, २००७ ते दि.२७.०९.२००७ या कालावधीतील लातूर-नांदेड रस्त्याच्या डांबरीकरण व खड्डे बुजविण्याच्या कामाशी संबंधित मासिक लेख्याच्या छायांकित सत्यप्रती व संबंधित ठेकेदाराची यादी आणि मोजमाप पुस्तिकेच्या छायाप्रती - या माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१२.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत मोजमापपुस्तिकेच्या छायाप्रती देण्याचे सूचित केले होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील त्यांच्या लेखी म्हणण्याशी सुसंगत असा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. ०३.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.११.२००७ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे दि. १५.११.२००७ रोजी आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि अपिलार्थीचे असे म्हणणे आहे की, ही माहिती अपूर्ण आहे. अद्यापही त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही मोजमापपुस्तिकेच्या प्रती व ही कामे करणाऱ्या ठेकेदाराची नावे प्राप्त व्हावयाची आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने एकूण दोन मुद्यांद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी एका मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.११.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे व दुसऱ्या मुद्याद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी अद्यापही काही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना द्यावयाची आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपलब्ध कागदपत्रांची तपासणी करता अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिध्द झाले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेली माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील ठेकेदारांच्या रजिस्टरवरुन व उपअभियंता यांच्या कार्यालयातील मोजमापपुस्तिकेवरुन अपिलार्थी यांना देणे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य होते, तथापि, व विशेषतः जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही संबंधित उपअभियंता यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती पुरविलेली नाही, हे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरवून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या सर्व संबंधित सहायक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

तसेच अपिलार्थीस अद्यापपर्यंत न दिलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस आता उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने,रा. भाग्यनगर,नांदेडरोड,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३७५
निर्णय दिनांक १६-०५-२००९

१ श्री. विजयकुमार गुरनाथ पवार, : अपिलार्थी
रा. सोमनाथपूर ता.उदगीर,जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,उदगीर
जि.लातूर.

२ जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,ग्रामपंचायत,सोमनाथपूर, ता.उदगीर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती,उदगीर जि.लातूर.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी संबंधित जन माहिती अधिकारी, विद्यमान व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या दि.

२७.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहितीसाठीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२६/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या पत्राचा स्वीकार अपिलार्थीने केला नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी याबाबतचा पंचनामा केला आहे. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २०.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २३.१०.२००७ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळल्यानंतर अपिलार्थीने दि. ०४.१२.२००७ रोजी मनिऑर्डरने माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. ०५.१२.२००७ रोजी उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या कथित माहितीवर अभिप्राय व्यक्त करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच त्यांनी आयोगास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर कोणतेही अभिप्राय लेखी स्वरुपात कळविले नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**लातूर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०५-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजयकुमार गुरनाथ पवार,रा. सोमनाथपूर ता.उदगीर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, सोमनाथपूर,ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिति,उदगीर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/४१६
निर्णय दिनांक १६.०५.२००९

१ श्री भास्कर नारायणराव लहाने, : अपिलार्थी
भाग्य नगर, नांदेड रोड,
अहमदपूर, जि. लातूर

**विरुध्द**

१ सार्वजनिक बांधकाम उप विभाग, : प्रतिवादी
चाकूर जिल्हा लातूर.
२ कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उप विभाग चाकूर जि. लातूर
त्रयस्थ पक्ष : श्री एस. एस. स्वामी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपीलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दिनांक १२.०६.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या दिवशी म्हणजेच ४३ व्या दिवशी देण्यात आली. त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुन घेण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दोन वेळा नकार दिला. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती विनाशुल्क द्यावी असे सूचित केले असूनही त्यांना माहिती विनाशुल्क मिळाली नाही. शुल्क देखील परत मिळाले नाही. त्यांनी भरलेले शुल्क

त्यांना परत द्यावे व जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास विलंब केल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४.०३.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे कार्यालयातील श्री. एस.एस.स्वामी यांच्या कार्यकाळातील दिनांक ३०.०६.२००३ ते १६.०६.२००६ या कालावधीतील मासिक लेख्यांच्या व कॅश बुकच्या छायांकीत प्रतीची मागणी केलेली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७३१९/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. यानंतर अपीलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९.०४.२००८ रोजी केला. शुल्क भरणा करुनही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.०५.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. तथापि या निर्णयामध्ये अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलामधील मुद्यांसंदर्भात दिलेला निर्णय मान्य नसल्याने, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून वेळेत माहिती प्राप्त झाली नसून जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक त्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडून करुन घेतला नाही. त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली गेली. जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती प्राप्त करुन दिल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नुकतेच रुजू झाले असून अपिलार्थीने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीस दिनांक ०९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने

त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचे व माहितीच्या दर्जाबाबत त्यांचे आक्षेप नसल्याचे आयोगास सांगितले.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज दि. ०४.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला होता. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरणा करण्याचे सूचित केले. अपिलार्थीने दि. १९.०४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्काचा भरणा केला. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचा दिनांक, अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क भरणा करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या पत्राचा दिनांक व अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा ज्या तारखेस जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला तो दिनांक पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०३.०५.२००८ रोजी अगर तत्पूर्वी माहिती देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस दि. ०९.०५.२००८ रोजी म्हणजेच विहित मुदतीनंतर पाच दिवस विलंबाने माहिती दिल्याचे सप्रमाण सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे शुल्क रु. ७३१९/- स्वीकारले आहे. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीपेक्षा विलंबाने अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविली असल्याने, व अशाप्रकारची कार्यवाही अधिनियमामध्ये कोणत्याही प्रकारे अभिप्रेत नसल्याने जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क त्यांना परत करावे लागेल.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये ते माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दोन वेळा गेले असता, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपीकाने हे शुल्क स्वीकृत केले नाही, असे म्हणणे मांडले आहे, तथापि या संदर्भातील कोणताही सबळ पुरावा ते आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि.०९.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झाली असल्यामुळे, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत, तथापि अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीपेक्षा पाच दिवस विलंब लावल्याचे निःसंशयपणे सिध्द झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेले शुल्क रु ७३१९/- इतके त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावे.

३. सचिव, (सार्वजनिक बांधकाम) मुंबई यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**लातूर**
**दिनांक : १६.०५.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. भास्कर नारायणराव लहाने, भाग्यनगर, नांदेडरोड, अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग चाकूर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७०३
निर्णय दिनांक १६-०५-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. लक्ष्मण गणपतराव दासरे,<br>रा.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण उपसंचालक,<br>लातूर विभाग,लातूर. | | |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०५.२००९ रोजी लातूर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०७.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्यांद्वारे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दि. २२.३.१९९६ रोजीचे मुख्याध्यापक अहिल्यादेवी कन्या प्रशाला,लातूर यांचे शिक्षणाधिकारी (मा) यांना दिलेल्या हमीपत्राची प्रत, शिक्षणाधिकारी

(मा) यांचे दि. १०.०६.२००३ रोजीचे पत्र, शिक्षण उपसंचालकांचे दि. २३.०४.२००३ रोजीचे पत्र व उपसंचालक यांचे दि. २३.०१.२००७ रोजीचे पत्र - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.०३.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस फक्त एका मुद्यावरील माहिती देऊन उर्वरित माहितीसंदर्भात राज्या माहिती आयोग औरंगाबाद यांनी यापूर्वीच निर्णय दिला असल्याने माहिती देण्याची गरज नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.०५.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. याच आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्ष शाळेत जाऊन माहिती संकलीत करुन ती अपिलार्थीस द्यावी, असे निर्देश दिलेले आहेत. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या चार मुद्यांपैकी तीन मुद्यांवरील माहिती त्यांना दि. ०५.०३.२००९ व दि. २९.०५.२००७ रोजी दिली आहे.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असून ती माहिती मिळाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यावर पोचसही देखील दिलेली आहे. तथापि अपिलार्थी ही माहिती त्यांना प्राप्त झाली नसल्याचे आयोगासमोर सांगत

आहेत. तेव्हा अपिलार्थीस प्रत्यक्षात माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २,३ व ४ द्वारे त्यांनी मागणी केलेल्या पत्राच्या प्रती विनामूल्य दिल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती न देण्याचे कारण विचारले असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांच्या कार्यालयाचे स्थलांतर झाल्याने अपिलार्थीस ते ही माहिती देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती म्हणजे मुख्याध्यापक,अहिल्यादेवी कन्या प्रशाला,लातूर यांनी शिक्षणाधिकारी (मा) जि.प.लातूर यांना उद्देशून लिहिलेल्या दि. २२.०३.१९९६ रोजीच्या त्यांच्या पत्राद्वारे दिलेले हमीपत्र होय. ही माहिती संबंधित शाळेने शिक्षणाधिकारी (मा) यांना पुरविली आहे परंतु ती शिक्षणाधिकारी (मा) यांच्या कार्यालयात आता उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आहे.ही माहिती संबंधित शाळेकडे असण्याची शक्यता आहे, व ही शक्यता शिक्षणाधिकाऱ्यांनी पडताळून पाहिलेली नाही, हे पाहता, शिक्षणाधिकारी (मा) यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी स्वतः अहिल्यादेवी कन्या प्रशाला, लातूर यांच्याशी संपर्क साधून अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन या हमीपत्राची सत्य झेरॉक्स प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील प्रथम सुनावणीमध्ये दि. ०८.०५.२००७ रोजी अशाच प्रकारचे आदेश दिले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती देण्यासंदर्भात कोणतेही जादाचे सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या थंड प्रतिसादामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिल्याचे दिसून येत आहे. वास्तविकतः जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी संबंधित शाळेकडील उपलब्ध अभिलेख्यांची तपासणी त्यांच्या कार्यालयातील अधिकाऱ्यांमार्फत जर वेळीच करुन घेतली असती तर एव्हाना अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली असती. त्यामुळे इतःपर अशाप्रकारांची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे यापुढे जे अर्ज प्राप्त होतील, त्या सर्व अर्जांवर त्यांनी येथून पुढे सकारात्मक प्रतिसाद

देऊन अर्जदारास त्यांनी मागणी केलेली माहिती त्वरेने पुरविता येईल, असे पहावे, अशा सूचना जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

**लातूर**
**दिनांक : १६-०५-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण गणपतराव दासरे,रा.हेंगणे निवास,शिवनगर,लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,लातूर विभाग,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०३

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, अपिलार्थी
गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष : | श्री. रविंद्र जोशी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरःस्सर टाळाटाळ केली. त्यांनी मागणी केलेली माहिती भ्रष्टाचाराशी

संबंधित असल्याने ही माहिती लपविण्याचा, नष्ट करण्याचा व भ्रष्ट कर्मचा-यास वाचविण्याचा प्रयत्न केला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-१२-२००७ पूर्वी माहिती देण्याचा आदेश दिला असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करेपर्यंत दिली नसल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे दंडात्मक कारवाई करावी व त्यांना विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, श्री. आर. पी. जोशी तत्कालीन कनिष्ठ लिपीक, गट शिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती, गंगापूर यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या चौकशीच्या संदर्भाने एकूण चार मुद्दयाव्दारे दिनांक ०२-०२-२००१ ते डिसेंबर २००१ अखेरपर्यंतच्या कालावधीतील माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - ॲन्टी करप्शन ब्युरो यांनी श्री. रविंद्र जोशी यांच्याविरुध्द केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी श्री. रविंद्र जोशी यास शिस्तभंगाची कार्यवाहीसंदर्भात पाठविलेली नोटीस वगैरे संदर्भात पत्रव्यवहार, श्री. रविंद्र जोशी यांनी सादर केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या प्रक्रियेत प्रशासनाने केलेली कार्यवाही, दिलेल्या निर्णयाची प्रत कार्यालयीन टिपणीसह - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६ इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील

कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००७ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीस दिनांक २८-१२-२००७ पूर्वी माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त न होऊ शकल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी हजर असतांना त्यांनी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना ही माहिती दिली नाही. तसेच ते दिनांक २९-१२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी हजर होऊनही त्यांना माहिती देण्यात आली नाही. आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाली असून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये संबंधितांच्या जबाबाच्या प्रती नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या अर्जास त्यांनी दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरणा करण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने ते शुल्क भरले नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सामान्य प्रशासन विभागात हजर राहून माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी सूचित केले. अपिलार्थीस सूचना देऊनही प्रस्तावित कालावधीत ते हजर न झाल्याने अंतीमतः त्यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना कधीही भेटले नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०८-१०-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले होते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या शुल्काचा भरणा केला नाही. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागात हजर राहून माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांची दिनांक १८-१०-२००७ व दिनांक २९-१२-२००७ रोजीची पत्रे त्यांना प्राप्त झाली नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी अपिलार्थीस ही दोनही पत्रे पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला व तसेच तदनंतर अपिलार्थीस विनाशुल्क माहिती देण्याची तयारी दर्शविली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीमध्ये ॲन्टी करप्शन ब्युरो विभागाने संबंधितांच्या घेतलेल्या जबाबाच्या प्रतीचा समावेश नाही, असे अपिलार्थीने आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात ॲन्टी करप्शन ब्युरो विभागाने जबाबाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचा कोणता सबळ पुरावा अपिलार्थीकडे आहे काय याची त्यांना विचारणा केली असता, अपिलार्थीकडे अशा प्रकारचा कोणताही पुरावा सुनावणीच्या वेळी उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. सर्वसाधारणपणे ॲन्टी करप्शन ब्युरो विभागाची अहवाल पाठविण्याची कार्यपध्दती लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांच्या विभागाकडे सर्वसाधारण परिस्थितीत संबंधितांच्या जबाबाच्या प्रती उपलब्ध असणे संभवत नाही, त्यामुळे जर अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित जबाबाच्या प्रती अपेक्षित असतील तर त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो विभागाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रतीसंदर्भात वेगळयाने अर्ज करुन ही माहिती ॲन्टी

करप्शन ब्युरो विभागाकडून प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने माहिती देण्याचे टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने, अपिलार्थीने व्दितीय अपील अर्जामध्ये आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची केलेली विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील सर्व बाबीं एकत्रितपणे पाहता अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०५

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, अपिलार्थी
यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १७-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची पेन्शन ऑर्डर दिली असल्याने त्यांना सेवानिवृत्ती वेतनासंदर्भात कमी रक्कम प्राप्त झाली असून अद्यापही काही रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना येणे आहे. त्यांना दिलेली पेन्शन ऑर्डर चुकीची असल्यामुळे त्यावर आधारित वेतननिश्चिती, ग्रॅच्युईटी, अंशराशीकरण इत्यादी रक्कम त्यांना चुकीची येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पेन्शन ऑर्डरसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन अपिलार्थीने " पेन्शन बाबत " असे केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस पेन्शन ऑर्डरची प्रत पुरविली आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१२-२००७ रोजी निर्णय देऊन या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील अमान्य केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एकूण तीन वेळा एकूण तीन पेन्शन ऑर्डर दिल्या असून अंतीमतः पेन्शन ऑर्डरव्दारे त्यांना नगरपरिषदेकडून देय असलेली रक्कम अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी विहित मुदतीत पुरविल्याचे आयोगास सांगितले. तसेच अपिलार्थीस त्यांच्या निवृत्ती वेतनातील फरक त्यांच्याकडील अनुदानाच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात आले असल्याचेही त्यांनी आयोगास अवगत केले आहे. यापुढेही अपिलार्थीस संदर्भित प्रकरणी, प्राधान्याने कार्यवाही करुन उर्वरित फरकाची रक्कम लवकरच देण्याचे अपिलार्थीस व आयोगास आश्वासीत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीचे या प्रकरणी असे म्हणणे आहे की, त्यांना दिलेले पेन्शन आदेश चुकीचे असून या आदेशामध्ये दुरुस्ती करुन त्यांना फरकाची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्वरित प्राप्त व्हावी. तथापि या बाबी पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत. त्या आदेशासंदर्भात कोणतीही दुरुस्ती करुन जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्याची अधिकारिता राज्य माहिती आयोगास नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अर्जदाराने त्यांच्याकडे मागणी केलेली माहिती, अर्जदारास अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविण्यासंदर्भात कार्यवाही करणे, अशाच प्रकारच्या प्रक्रियेचा फक्त समावेश आहे. विचाराधीन प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य अधिनियमातील तरतुदीनुसार पार पाडले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित असलेली कार्यवाही करुन घेण्याकरिता त्यांना नगरपरिषदेच्या वरीष्ठ प्राधिकरणाकडे आपल्या गा-हाण्याची दाद मागावी लागेल. माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार या प्रकरणाकडे पाहावयाचे झाल्यास आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती द्यावयाची राहिली नाही व मूळात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली " पेन्शन बाबत " हीच माहिती इतकी मोघम स्वरुपाची आहे की यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे याचा अर्थबोध होत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या आदेशाच्या प्रती वेळोवेळी पुरवल्या आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश सुदामराव गायकवाड, यशवंतनगर, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०७

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. सावळे संजयकुमार मोतीराम, अपिलार्थी
माऊली निवास, हनुमान मंदिर परिसर, स्वामी विवेकानंद
नगर, तरोडा (खु) तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा,
चौफाळा, तालुका जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, नांदेड जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. के. टी. आमदूरकर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीचे दिनांक १६-०५-२००९ रोजीचे निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने त्यांना विचाराधीन अपील प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे आता विचाराधीन अपिलाबाबत

काहीही म्हणणे नाही असे नमूद करुन अशी विनंती केली आहे की, त्यांना अपिलाशी संबंधित सर्व माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात यावे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्याची विनंती केली असल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक २०७/२००८, दिनांक ०९-०१-२००८ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २०७/२००८, दिनांक ०९-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सावळे संजयकुमार मोतीराम, माऊली निवास, हनुमान मंदिर परिसर, स्वामी विवेकानंद नगर, तरोडा (खु) तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, चौफाळा, तालुका जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२०८

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. पंडित सुहास वाल्मिक, : अपिलार्थी
" सुरेख भवन " प्लॉट नं. ३२, गणेशनगर, सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी

जन अपिलीय अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जाची जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही व तसेच त्यांनी या प्रकरणी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोटारसायकल (टू व्हिलर) पासिंग करण्यासाठी आवश्यक नियम काय आहेत व गाडी नं. एम. एच. २२ के १२३९ या मोटारसायकल गाडीच्या पेपर्सच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी दिनांक ०१-०७-२००७ ते ३१-०८-२००७ असा होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके त्यांना त्यांच्या कार्यालयात मनीऑर्डरने अथवा डिमांड ड्राफ्टव्दारे भरण्याचे सूचित केले. त्यानुसार अपिलार्थीने ७४ रुपयांची मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविली असता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधितांनी ती मनीऑर्डर स्वीकारली नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी हे जन अपिलीय अधिकारी असल्याने नांदेड कार्यालयाने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली, मात्र या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्यामुळे व अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या मोटारसायकल संबंधात असून त्यांना संबंधित मोटारसायकलच्या एजन्सीकडून त्यांच्या मोटारसायकल संदर्भातील विम्याची कोणतीही कागदपत्रे न मिळाल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी आवश्यक त्या माहितीसाठी संपर्क साधावा लागला. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. तथापि संबंधित कार्यालयाने अद्यापपावेतो त्यांना माहिती दिली नसल्याने अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी व त्यांना अपेक्षित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके प्रादेशिक परिवहन कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांनी आज बरोबर आणली असून ते ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने या प्रकरणी ज्यावेळी प्रथम अपील त्यांच्या कार्यालयात केले होते त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७० इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे मनीऑर्डरने पाठवून दिले होते. तथापि या मनीऑर्डरच्या फॉर्मवर अपिलार्थीने संदर्भित शुल्क कशापोटी, कशासाठी पाठविले याचा कोणताही उल्लेख केला नाही. कोणताही विशिष्ट संदर्भ नसलेली, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झालेली ही मनीऑर्डर संबंधित लिपिकाने स्वीकारली नाही. अंतीमतः ती अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००७ रोजी पोस्ट खात्याकडून परत पाठविली गेली. याचबरोबर अपिलार्थी हे त्यांना आवश्यक

असलेली माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण वंचित राहिले. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय घेतला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेण्याची कारणे आज रोजी उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी आयोगास सांगू शकत नाहीत. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती आयोगास दाखविली, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस आयोगासमोर विनामूल्य हस्तांतरीत केली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे कोणत्याही असद्हेतूने टाळले नाही. त्यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस योग्य ते शुल्क आकारण्याची प्रक्रिया पार पाडली. या प्रकरणी अपिलार्थीने पाठविलेली मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधित लिपिकाने न स्वीकारल्याने अपिलार्थीस माहितीपासून वंचित राहावे लागले असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या मनीऑर्डरच्या फॉर्मवर त्यांनी सदरची मनीऑर्डर कोणत्या प्रयोजनार्थ केली आहे त्याचा कुठल्याही प्रकारचा उल्लेख त्या फॉर्मवर नाही. वास्तविक पाहता अपिलार्थीने ही मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवितांना त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाच्या संदर्भाचा अथवा जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०६-०९-२००७ रोजीच्या पत्रासंदर्भाचा या फॉर्मवर उल्लेख करणे आवश्यक होते. तथापि अशी कृती अपिलार्थीने केली नाही. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीकडून आलेली मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील लिपिकाने काही गैरसमजुतीतून स्वीकारली नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही संदर्भाशिवाय मनीऑर्डर पाठविली आहे हे पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती

देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर टाळले अथवा कोणत्याही दुष्टहेतूने अपिलार्थीपासून माहिती दडविल्याचे सिध्द होत नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे आयोग शास्ती आदेशित करत नाही, मात्र कोणत्याही माहिती व्यवस्थापनेच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त होणारे शुल्क स्विकारण्यासाठी त्यांनी एखाद्या जबाबदार व्यक्तीची नेमणूक करुन अशी स्वीकृती करण्यापूर्वी येथून पुढे गांभीर्याने व जबाबदारीने कर्तव्य पार पाडण्याच्या सूचना त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचा-यांना द्याव्यात.

अपिलार्थीस आता आयोगाच्या उपस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती विनामूल्य माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही स्वतंत्र आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पंडित सुहास वाल्मिक, " सुरेख भवन " प्लॉट नं. ३२, गणेशनगर, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३४२

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, अल्लामा एकबाल उर्दू कनिष्ठ
महाविद्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी मार्फत
अल्लामा एकबाल उर्दू कनिष्ठ महाविद्यालय,
धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी या हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती मागविली असता त्यांनी

ती विहित मुदतीत न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले असता या अपील अर्जावर निर्णय घेण्यासाठी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित विस्तृत स्वरुपाची माहिती त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा संबंधित संस्थेचे सचिव यांच्याकडे दिनांक २५-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपिलावरही संबंधित सचिवांनी कोणताही निर्णय घेतला नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांच्या शाळेकडे अथवा त्यांच्या संस्थेकडे मूळात प्राप्त झाले नाहीत. अपिलार्थीस आवश्यक असलेली नेमकी माहिती त्यांना आयोगाच्या आज रोजीच्या सुनावणीच्या पत्राबरोबर असलेल्या अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रतीवरुन ज्ञात झाली. यानंतर त्यांनी आवश्यक ती माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे दिनांक १४-०५-२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे पुरावा सादर केला आहे. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नांदेड येथील पोस्टाच्या १५५६ या क्रमांकाच्या पावतीव्दारे दिनांक १६-०५-२००९ रोजी माहिती पाठविली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते.

याचबरोबर असेही आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केला होता किंवा कसे हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास कोणताही

मार्ग नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या मूळ अर्ज व प्रथम अपील अर्जाच्या प्रतींचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची पोच सही अथवा शिक्का त्यावर आढळून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी वरील केलेल्या युक्तिवादास पुष्टी मिळत आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अल्लामा एकबाल उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, उर्दू एज्युकेशन सोसायटी मार्फत अल्लामा एकबाल उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/३५२

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, अपिलार्थी
रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार) तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

वरील अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिले दिनांक १८-०५-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आता संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांचे समाधान झाले असून ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे आज रोजीचे अपील क्रमांक ३५२/२००८ मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील क्रमांक ३५२/२००८, दिनांक २५-०४-२००८ हे खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील क्रमांक ३५२/२००८, दिनांक २५-०४-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार) तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४८

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. सौदागार महंमद वसीम महंमद एकबाल, अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिति अधिकारी
तथा कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०७-२००७ रोजी पोस्टामार्फत अर्ज सादर करुनही त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००७ रोजी प्रथम अपील सादर केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा दिनांक ०२-०७-२००७ रोजीचा माहितीसाठीचा कथित अर्ज मूळात त्यांना प्राप्त झाला नाही. मात्र अपिलार्थीचे दिनांक १०-०८-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांना दिनांक १०-०८-२००७ रोजी प्राप्त झाला आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहितीसाठी अर्ज केल्याचे ज्ञात झाले. हा अर्ज त्यांना प्राप्त होताच त्यांनी दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३०८ इतके भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. हे पत्र अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००७ रोजी प्राप्त झाले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादा-प्रीत्यर्थ आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांच्या दिनांक ०२-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत जोडली आहे. तथापि हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील करतांना अथवा आज रोजी सुनावणीच्या वेळेपर्यंत सादर केलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या संबंधित लिपिकाची सही व शिक्का नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा या प्रकरणी त्यांना, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही, हा युक्तिवाद आयोग ग्राह्य धरत आहे. अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क अधिनियमाव्दारे विहित केलल्या मुदतीत, त्यांची जबाबदारी नसतांनाही, कळविले आहे. त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर अपिलार्थीशी संपर्क साधून अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि वेळोवेळी विनंती करुनही अपिलार्थी हे त्यांच्या

कार्यालयात हजर झाले नाहीत या जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे अपिलार्थीने कोणत्याही प्रकारे आजतागायत खंडन केलेले नाही.

वरील सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कळवूनही अपिलार्थीने हे शुल्क भरण्याची या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे तयारी दर्शविल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सौदागार महंमद वसीम महंमद एकबाल, रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६४९

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",

सरस्वती कॉलनी, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय अहमदपूर,

तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहायक वनसंरक्षक कार्यालय, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मु. उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासाठी धान्य योजने अंतर्गत व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अहमदपूर वनपरिक्षेत्रातील मृद व जलसंधारण कामाची सन २००५-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही एका ३२ कलमी प्रपत्रामध्ये आहे. अपिलार्थीने ज्या योजनेसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली आहे त्या योजना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत राबविल्या जात नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील दिनांक १५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे निरंक माहिती कळविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील मात्र सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या योजनांसंदर्भात त्यांच्याकडे माहिती मागविली होती त्या योजना त्यांच्या कार्यालयामार्फत राबविल्या जात नाहीत. तसेच अपिलार्थीचा कथित दिनांक १०-१०-२००७ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजे दिनांक १५-०९-२००७ रोजी योग्य तो प्रतिसाद दिला आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस ज्या योजनांसंदर्भातील माहिती हवी होती त्या योजनाच त्यांच्या कार्यालयातर्फे राबविल्या जात नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले उत्तर, आयोगास सर्वसाधारणपणे योग्य वाटते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात देखील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यापृष्ठ्यर्थ कोणताही सबळ पुरावा सादर केला नाही. सबब आयोगासमोरील अपिलार्थीची अनुपस्थिती, सबळ पुराव्याअभावी केलेली विधाने व अपिलार्थीस माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेला सबळ पुरावा (जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याप्रीत्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवही आयोगास दाखविली) याचे अवलोकन करता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून क्रमांक ३६९, दिनांक १५-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली गेल्याचे सिध्द होते. यावरुन अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, तुळजापूर, मु. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५०

निर्णय दिनांक १८-०५-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जि. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,<br>सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य वनसंरक्षक कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००७ या कालावधीतील सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्या नावाची व पदांची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने हा अपील अर्ज मुख्य वन संरक्षक कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे केला होता. या प्रकरणी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती केली गेली नसल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे या प्रकरणी नांदेड वन विभागाचे उप वनसंरक्षक हे जन अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले असल्याने अपिलार्थीस त्यांच्याकडे परस्पर अर्ज करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचा अपील अर्ज या पत्राव्दारे निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची नांवे व पदे ही माहिती मागविली होती. हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०८-

०६-२००७ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०७-२००७ रोजी दिलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण आहे. या माहितीमध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या नावांचा उल्लेख नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०७-२००७ रोजी तयार करुन ठेवले होते, तथापि त्यावर दिनांक १६-०७-२००७ ही तारीख जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने टाकली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीचे निरीक्षण करता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक १६-०७-२००७ रोजीचे पत्र जावक लिपिकाने दिनांक १९-०७-२००७ रोजी पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या प्रशासनातील अशा प्रकारच्या ढिसाळपणाची नोंद करणे अगत्याचे आहे. मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने तर जन माहिती अधिकारी यांच्यावर कडी करुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती अर्जासंदर्भात उप वन संरक्षक, नांदेड हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे त्यांना कळवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. वास्तविक पाहता उप वन संरक्षक, नांदेड हे कार्यालय मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहे, त्यामुळे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांनी सरळ उप वन संरक्षक, नांदेड यांच्याकडे जर प्रथमतः पाठविला असता तर कदाचित या प्रकरणी अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची आवश्कता वाटली नसती. अपिलार्थीने देखील या प्रकरणी मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता सरळ आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीची अशा प्रकारची कृती ही चुकीची आहे असे त्यांच्या येथे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व मुख्य वन संरक्षक, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे माहितीसाठीच्या मूळ अर्जाची व प्रथम अपील अर्जाची अक्षम्य अशी अवहेलना केल्याचे आयोगास या ठिकाणी प्रतीत होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविली होती. संबंधित लिपिकाने हे पत्र १९ तारखेला पोस्टात टाकले. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत दिनांक ०७-०७-

२००७ रोजी व्यपगत होत होती, त्यामुळे निदान विहित मुदत संपत आल्यानंतर तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही साधी व मर्यादीत व्याप्तीची माहिती द्यावयाची तत्परता दाखविणे या प्रकरणी आवश्यक होते, मात्र अशी तत्परता त्यांनी दाखविली नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप इतके सरळ होते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी अर्धा तासाहून जास्त कालावधी लागला नसता. परंतु प्रत्येक अर्जावर तीस दिवसांची वाट पाहून नंतर प्रतिसाद द्यावयाचा अशा प्रकारची वृत्ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिका-यांमध्ये वाढीस लागल्याचे दिवसेंदिवस आयोगास दिसून येत आहे. वास्तविक अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम ४ (१) (ख) (सोळा) प्रमाणे स्वतःहून सार्वजनिक प्राधिकरणाने स्वंयप्रेरणेने घोषित करावयाची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्याने संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) नुसार जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे, हे सर्व जण अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जबाबदार ठरत आहेत.

उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस ८ दिवस एवढ्या विलंबाने माहिती पुरविली आहे. या विलंबाचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्वात असू शकत नाही हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक हे अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती अधिकारी आयोगासमोर उपस्थित आहेत. या प्रकरणी त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता त्यांना एक संधी देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ८ दिवसाच्या विलंबाबद्दल त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २००० (अक्षरी रुपये दोन हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी ८ दिवसाच्या विलंबाने माहिती पुरविल्याचे

असल्याचा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी जन माहिती अधिकारी यांची नावे असलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायक यांना एकत्रितपणे एकूण रुपये २००० (अक्षरी रुपये दोन हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जि. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, उप वनसंरक्षक कार्यालय, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन), मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५१

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक संचालक,
सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप संचालक,
सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी केलेल्या प्रथम अर्जातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी, यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित, सन २००५ ते २००७ या कालावधीतील, राष्ट्रीय योजने अंतर्गत कामासाठी धान्य व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत केलेल्या व चालू असलेल्या सर्व कामांची नांवे, प्रशासकीय मान्यता दिनांक, कामाची अंदाजीत रक्कम, झालेला खर्च, मजूरांच्या हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, मजुरांचे उपस्थित अहवालाची छायांकीत प्रत, मजूरांना दिलेल्या धान्य कुपनाची माहिती व स्वस्त धान्य दुकानदारांची नांवे ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील आठ अधिका-यांच्या ताब्यात होती. त्यामुळे अपिलार्थीचा हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सर्व संबंधितांना दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविली व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सादर करण्याचे सूचित केले. यानंतर संबंधित अधिका-यांनी ही माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०६-२००७ ते ०३-०७-२००७ या कालावधीत पुरविली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०९-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचा जन अपिलीय अधिकारी यांनी निष्कर्ष काढला आहे. या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यक्षेत्रातील वेगवेगळ्या आठ लागवड अधिका-यांच्या कार्यक्षेत्रांशी संबंधित असल्याने अपिलार्थीचा दिनांक ०४-०६-२००७ रोजीचा अर्ज त्यांनी सर्व संबंधितांना दिनांक १८-

०६-२००७ रोजी पाठविला. अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दिनांक ११-०६-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीस अद्यापपावेतो मजूरांच्या उपस्थिती अहवालाच्या छायांकीत प्रती संबंधितांकडून पुरविल्या गेल्या नाहीत, तसेच मस्टरच्या प्रती देखील अपिलार्थीस अद्यापपावेतो त्यांच्या अधिपत्याखालील लागवड अधिका-यांनी पुरविल्या नाहीत असे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील स्वस्त धान्य दुकानदाराच्या नावाची व धान्य कुपनाची माहिती संबंधित तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध असल्याने तीही त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस पुरविली नसल्याचे सांगितले.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्या जन माहिती अधिका-याकडे माहितीची मागणी केली होती त्या संबंधित जन माहिती अधिका-याने या प्रकरणी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या व इतर वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित असल्याने, अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे होते, तथापि त्यांनी असे न करता अपिलार्थीच्या अर्जाची प्रत संबंधितांकडे पाठवून स्वतः अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला. एवढे असूनही आजतागायत अपिलार्थीस मजुरांच्या मस्टरची व उपस्थिती अहवालाची झेरॉक्स प्रत मिळाली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधित तहसीलदाराकडे उपलब्ध असल्याने अपिलार्थीच्या अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तहसीलदाराकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे या प्रकरणी भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीचा अर्ज त्यांनी ज्या पत्राव्दारे त्यांच्या नियंत्रणाखालील लावगड अधिका-यांकडे पाठविला त्या पत्राची प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस दिली नाही. जे अधिनियमातील वरील कलमातील तरतुदीप्रमाणे करणे त्यांना अनिवार्य होते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ६ (३) (एक) चा निःसंशयपणे भंग केला असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस सशुल्क माहिती द्यावयाचा कालावधी व्यपगत झाला असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल, तसेच

अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील मागणी केलेल्या ज्या भागाशी संबंधित माहिती तहसीलदाराकडे उपलब्ध आहे त्या भागाची माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तहसीलदाराकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती आता त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. सबब संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे यांना या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे यांना या प्रकरणाशी संबधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्ताहिक धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५२

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी
मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",
सरस्वती कॉलनी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००० ते २००७ या कालावधीतील

त्यांच्या कार्यालयातर्फे लावण्यात आलेल्या सायन कॉशन बोर्डासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामाच्या जन माहिती अधिकारी यांनी काढलेल्या टेंडरची माहिती व केलेल्या जाहीर प्रगटनाची प्रत, ठेकेदारांची माहिती, प्रत्येक वर्षी टेंडर दिलेल्या ठेकेदारांची माहिती, कामाची अंदाजपत्रकीय किंमत - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क रुपये २४३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक १४-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी दिनांक १०-०९-२००७ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २४३० संपूर्ण तपशीलासह भरण्यासाठी कळविले. त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जे दिनांक १०-०९-२००७ रोजी अपिलार्थीस पाठविण्यात आले, त्याव्दारे कळविले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न केल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे केल्यास ते ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यास तयार

आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २४३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केलेला नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावरुन अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती नसल्याने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०९-२००७ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये या शुल्काचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस दिला आहे. हे पत्र पाठविल्यापृष्ठ्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक तो पुरावा आयोगाकडे अवलोकनासाठी सादर केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस आजही या माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्रात सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करुन, त्यांच्याकडून हस्तगत करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. ही सर्व वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीस अद्यापपावेतो माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नकार दिलेला नाही. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## **आदेश**

१.    अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद                                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक    १८-०५-२००९                                        राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१    श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२    जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३    जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४    निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२६५३

निर्णय दिनांक १८-०५-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, अपिलार्थी

मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ",

सरस्वती कॉलनी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०५-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००७ या कालावधीतील काही माहिती

मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - पंचायत समिती कार्यालय किनवट मध्ये कार्यरत असलेल्या संपूर्ण ग्रामपंचायतीची नावा गावासहीत माहिती, ग्रामसेवकाची नांवा गांवासह माहिती, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायती-मध्ये झालेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती, कामाचे नांव, गांव, प्रशासकीय मान्यता दिनांक, अंदाजपत्रकीय किंमत, कामावर उपस्थित मजुराच्या अहवालाची छायांकीत प्रत, मजुराच्या हजेरी मस्टरच्या छायांकीत प्रतीची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क एकूण रुपये २४० इतके त्यांना बँकेमध्ये भरण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १७-०८-२००७ रोजी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविली. यासंदर्भातील आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीस कळवितांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही प्रतीसंदर्भात प्रतिपृष्ठ दहा रुपये इतका दर आकारला आहे तर काही प्रतीसंदर्भात प्रतिपृष्ठ दोन रुपये इतका दर आकारला आहे. या दरातील तफावतीबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी शासनाचा २००३ सालचा निर्णय दाखविला, त्यामध्ये १० रुपये इतका दर दर्शविला आहे. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांनी आयोगास दाखविलेला शासन निर्णय हा महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ शी संबधित आहे. सदर अधिनियम आता निरसीत

झाला असून शासनाने माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कोणत्याही अर्जदारास माहिती देण्यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक आर. टी. आय. २००५/सी.आर. ३१५/०५/५, दिनांक ११-१०-२००५ च्या अधिसूचनेमध्ये प्रसिध्द केलेला दर सध्या प्रचलीत आहे. त्याप्रमाणे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रतिपृष्ठ रुपये दोन प्रमाणे माहितीपोटीच्या शुल्काची आकारणी करणे गरजेचे होते. इतःपर अशा प्रकारच्या चूका त्यांनी टाळाव्यात असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पोस्टाने विनामूल्य माहिती पाठविली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी उपस्थित नाहीत. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्जाविषयी कोणताही उल्लेख केलेला नाही. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अपिलार्थीवर आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः गेले असल्याचा कोणताही पुरावा आयोगासमोर सादर केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीचे वर्तन प्रत्यक्षतः वस्तुस्थितीशी विसंगत आढळून येत आहे. या सर्व बाबी एकत्रितपणे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १८-०५-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक "धुमाकूळ", सरस्वती कॉलनी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.